# द्वितीय वर्ष कला

## सत्र - III (CBCS)

# मराठी अभ्यासपत्रिका क्र. - III

## विषय कोड : UAMAR302

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्राध्यापक सुहास पेडणेकर**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक रवींद्र द. कुलकर्णी**
प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवार**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रकल्प समन्वयक** : **श्री. अनिल आर. बनकर**
कला आणि मानव्य विद्याशाखा प्रमुख,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक व संपादक** : **प्रा. बालाजी ग्यानोबा कांबळे**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**लेखक** : **डॉ. सीमा मुसळे**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

: **प्रा. मनिषा बनकर**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

: **प्रा. बालाजी ग्यानोबा कांबळे**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

: **प्रा. डॉ. निधी पटवर्धन**
सहाय्यक प्राध्यापक, गोगटे-जोगळेकर महाविद्यालय,
रत्नागिरी, जि. रत्नागिरी

: **प्रा. डॉ. मीनाक्षी बऱ्हाटे**
सहाय्यक प्राध्यापक, के.जे. सोमैया महाविद्यालय,
विद्याविहार, मुंबई

: **प्रा. डॉ. बाळासाहेब सुतार**
सहाय्यक प्राध्यापक, प्रा. डॉ. डी.एन. पाटील महाविद्यालय,
मलकापुर, जि. कोल्हापूर

**ऑगस्ट २०२१, मुद्रण - १ ISBN 978-93-91735-12-8**

**प्रकाशक :** संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

**अक्षर जुळणी व मुद्रण :** मुंबई युनिव्हर्सिटी प्रेस,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०००९८

## अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १अ. | मानवी भाषेचे स्वरूप - प्रा. डॉ. सीमा मुसळे | ०१ |
| १आ. | भाषेची विविध कार्ये - प्रा. मनिषा बनकर | १७ |
| २अ. | भाषा, समाज आणि संस्कृती - प्रा. बालाजी कांबळे | २७ |
| २आ. | भाषेचा विकास आणि ऱ्हास संकल्पना विचार - डॉ. निधी पटवर्धन | ३६ |
| ३अ. | भाषा, प्रमाण भाषा आणि बोली संकल्पना विचार - प्रा. मिनाक्षी बऱ्हाटे | ५१ |
| ३आ. | बोली अभ्यासाची गरज व महत्त्व - प्रा. बाळासाहेब सुतार | ७० |


❖❖❖❖

# द्वितीय वर्ष कला
## सत्र - III, मराठी अभ्यासपत्रिका क्र. III

द्वितीय वर्ष, कला (मराठी) अभ्यासपत्रिका क्र. ३ च्या अभ्यासक्रमातील तिसऱ्या व चौथ्या सत्रासाठी एकूण चार नव्या अभ्यासपत्रिका - "३०१ भाषा आणि भाषाभ्यास", "मराठीच्या बोलीचा अभ्यासः आगरी बोली", ४०२ "मराठीच्या बोलीचा अभ्यासः मालवणी बोली", ४०३ "मराठीच्या बोलीचा अभ्यासः वाडवळी बोली" नेमण्यात आल्या आहेत. यापैकी तिसऱ्या सत्रासाठी अभ्यासपत्रिका क्र. "३०१ भाषा आणि भाषाभ्यास" ही सर्व महाविद्यालयांसाठी अनिवार्य असून, चौथ्या सत्रासाठी तीन पर्यायी स्वरूपाच्या अभ्यासपत्रिका नेमल्या आहेत; या अभ्यासपत्रिकांपैकी कोणतीही एक अभ्यासपत्रिका संबंधित महाविद्यालयाने निवडायची असून आगामी तीन वर्षांसाठी संबंधित महाविद्यालयाने विशिष्ट अभ्यासपत्रिकेची केलेली निवड अपरिहार्य राहील, त्यांना आपल्या निवडीत बदल करता येणार नाही. या अभ्यासक्रमाची श्रेयांकन पद्धतीनुसार रचना करण्यात आली आहे. वरील अभ्यासक्रम दोन सत्रांत विभागलेला असून, नेमलेल्या विशिष्ट तासिकांमध्ये तो शिकविला जाणे आवश्यक आहे.

सत्र चारसाठी महाविद्यालयांना ४०१ मराठीच्या बोलीचा अभ्यासः आगरी बोली; ४०२ मराठीच्या बोलीचा अभ्यासः मालवणी बोली किंवा ४०३ मराठीच्या बोलीचा अभ्यासः वाडवळी बोली या चार अभ्यासपत्रिकांपैकी कोणत्याही एकाच अभ्यासपत्रिकेची निवड करावी लागेल. संबंधित महाविद्यालयाच्या यापूर्वी निर्धारित व मान्य झालेल्या तासिकांमध्ये कोणत्याही प्रकारची वाढ करता येणार नाही.

**सत्र ३, अभ्यासपत्रिका क्र. ३, एकूण व्याख्याने ४५, श्रेयांकने ३**

**भाषा आणि भाषाभ्यास :**

**घटक १**

**अ) मानवी भाषेचे स्वरूप, एकूण व्याख्याने १५, श्रेयांकने १**

संप्रेषण - मानवी आणि मानवेतरांचे, मानवांचे भाषिक व भाषेतर संप्रेषण, मानवी भाषेची लक्षणे किंवा स्वरूप विशेष (ध्वन्यात्मकता, चिन्हात्मकता, यादृच्छिकता, सर्जनशीलता, प्रत्यक्षातीतता, सामाजिकता, परिवर्जनशीलता इ.) मानवी भाषेच्या व्याख्या

**आ)भाषेची विविध कार्ये - रोमान याकबसनचे संप्रेषणाचे नमुनारूप व ६ भाषिक कार्ये**

(निर्देशात्म, आविष्कारात्म, परिणामनिष्ठ, सौंदर्यात्म, संपर्कनिष्ठ, अतिभाषात्म)

**घटक २**

**अ) भाषा, समाज आणि संस्कृती - एकूण व्याख्याने १५, श्रेयांकने १**

भाषा - एक सांस्कृतिक संचित, सांस्कृतिक जडणघडणीचे, संक्रमणाचे माध्यम एडवर्ड सपीर - बेंजामीन वोर्फ यांचा भाषिक सापेक्षतावादाचा अभ्युपगम भाषेकडे पाहण्याचा समाज भाषावैज्ञानिक दृष्टिकोण, समाजातील भाषावैविध्य आणि भाषेचा बहुजिनसीपणा, भाषिक-सांस्कृतिक विविधता परस्परसंबंध.

**आ) भाषेचा विकास आणि ऱ्हास - संकल्पनाविचार : एकूण व्याख्याने १५, श्रेयांकने १**

जागतिकीकरण आणि भाषिक-सांस्कृतिक विविधता - परिणाम, भाषिक ध्रुवीकरणाचे धोके, भाषेच्या 'विकासा'ची संकल्पना, भाषेच्या प्रगतीचे निकष किंवा मापदंड, भाषिक ऱ्हासाची संकल्पना, भाषिक ऱ्हासाच्या विविध अवस्था किंवा टप्पे, भाषिक ऱ्हासाची कारणे, भाषानियोजन आणि भाषेचा विकास.

**घटक ३**

**अ) भाषा, प्रमाण भाषा आणि बोली-संकल्पना विचारः एकूण व्याख्याने १५, श्रेयांकने १**

'प्रमाण भाषा' म्हणजे काय, प्रमाण भाषेची आवश्यकता, प्रमाण भाषा व बोली यांच्यातील संबंध, त्यांचे वापरक्षेत्र, बोलीवैविध्य - उपबोली, स्थानिक बोली - प्रादेशिक बोली - जातिनिष्ठ बोली - सामाजिक बोली इ., बोलींविषयीचे गैरसमज (शुद्धाशुद्धता, श्रेष्ठकनिष्ठता, अंगभूत क्षमता इ.) व तथ्ये, मराठीच्या विविध बोली.

**आ) बोलींच्या अभ्यासाची गरज व महत्त्व :**

बोलीविज्ञान (Dialectology), बोलींच्या अभ्यासाची दिशा - बोलींचा विजनात्मक

अभ्यास, सामाजिक-सांस्कृतिक अभ्यास, बोलींच्या अभ्यासाची साधने, क्षेत्रीय कार्य (Field Work) बोलींची व्याकरणे व कोशरचना यांचे महत्त्व, बोलींसमोरील आव्हाने व त्यांचे जतन व संवर्धन यांसाठी करावयाच्या प्रयत्नांची दिशा.

**तृत्रीय सत्रांत परिक्षेचे स्वरूप :**

प्रश्न क्र. १ घटक १ वर अंतर्गत पर्यायासह एक प्रश्न (गुण २०)
प्रश्न क्र. २ घटक २ वर अंतर्गत पर्यायासह एक प्रश्न (गुण २०)
प्रश्न क्र. ३ घटक ३ वर अंतर्गत पर्यायासह एक प्रश्न (गुण २०)
प्रश्न क्र. ४ घटक १, २ व ३ यांवर अंतर्गत पर्यायासह तीन टिपा (गुण ३०)
प्रश्न क्र. ५ घटक १, २ व ३ यांवर वस्तुनिष्ठ स्वरूपाचे ९ पैकी कोणतेही ५ प्रश्न सोडविणे (गुण १०)

❖❖❖❖

# १अ

# मानवी भाषेचे स्वरूप

**घटक रचना :**

१अ.० उद्देश
१ अ.१ प्रस्तावना
१ अ.२ मानवी भाषेचे स्वरूप
१ अ.३ मानवी आणि मानवेतरांचे संप्रेषण
१ अ.४ मानवांचे भाषिक व भाषेतर संप्रेषण
१ अ.५ मानवी भाषेची लक्षणे किंवा स्वरूप विशेष
१ अ.६ मानवी भाषेची व्याख्या
१ अ.७ सारांश
१ अ.८ प्रश्न
१ अ.९ संदर्भग्रंथसूची

## १ अ.० उद्देश

१. मानवी भाषेचे स्वरूप समजून घेणे.
२. हे स्वरूप समजून घेत असताना मानवी व मानवेतरांचे संप्रेषण ध्यानात घेणे.
३. मानवी भाषेच्या भाषिक व भाषेतर संप्रेषणाचा आढावा घेणे.
४. तसेच मानवी भाषेची लक्षणांना ध्यानात घेणे.
५. याबरोबरच मानवी भाषेचे स्वरूप स्पष्ट करणाऱ्या विविध अभ्यासकांनी केलेल्या व्याख्यांचा साकल्याने विचार करणे.

## १ अ.१ प्रस्तावना

भाषा हे मानवी संदेशवहनाचे एक प्रभावी साधन आहे. मानव व इतर प्राण्यांमध्ये असणारा भेद हा भाषेतून अधिक अधोरेखित होतो. हा भेद ठळक करणारा मानवी बुद्धीमत्ता हा एक घटक असून त्याचा आविष्कार भाषेतूनच असतो. मानवाने आतापर्यंत जी आश्चर्यकारक प्रगती केलेली आहे त्याचे श्रेय भाषेला द्यावे लागते. कारण हजारो वर्षापूर्वी लिहिलेल्या वैदिक ऋषींच्या रचना, विविध प्राचीन आधुनिक विचारवंतांनी मांडलेले विचार, तत्त्वज्ञान, संशोधने यांचे वाचन हे या भाषेच्या आधारानेच आत्ताच्या काळात समजावून घेतले जाऊ शकते. मनुष्य हा

चिंतनशील प्राणी आहे. हे ज्ञानात्मक चिंतन एक व्यक्ती दुसऱ्याला आपल्या बोलण्यातूनच प्रदान करत असते आणि बोलण्यासाठी भाषा अवगत असली पाहिजे, म्हणजेच भाषा ही विचार मांडण्याचे व ते मांडण्याचे माध्यम आहे.

भाषा हा शब्द आपण विविध प्रकारे वापरतो. म्हणजे लेखकाची भाषा, कवीची भाषा, डोळ्यांची भाषा, पशूपक्षांची भाषा, मूकभाषा इ. आपल्याशी कोणीतरी उद्धटपणे बोलत असेल तर आपण त्याला तुझी भाषा सांभाळ किंवा वाणी सांभाळ अशी ताकीद देतो. इथे भाषा म्हणजे आपण जे बोलतो ते असा अर्थ सूचित होतो. म्हणजे भाषेचा अर्थ बोलण्याशी आणि त्यातून निघणाऱ्या अर्थाशी असतो. पण भाषा या घटकाच्या भाषाशास्त्राच्या (भाषेचा अभ्यास करणारे शास्त्र) संदर्भात विचार केला असता तो केवळ बोलण्याशी ठेवून चालत नाही. तर त्याच्या विविध अंगांचा विचार या अभ्यासात करावा लागतो.

मानव हा समाजशील प्राणी आहे. समाजनिर्मिती ही अनेक माणसांच्या एकत्रिततेतून घडत असते. हे एकत्रिकरण विचार, व्यवहार, देवाणघेवाण, भावना आदींच्या देवाणघेवाणीतून होत असते. या घटकांची देवाणघेवाण वस्तूरूप नसून त्याचे स्वरूप अस्पर्शी होते. असे असताना भाषा हा केवळ एकच घटक असा होतो जो याची देवाणघेवाण करुन समाजनिर्मितीसाठी पूरक ठरेल. या शक्तीच्या जोरावरच मानव परस्परांच्या योगक्षेमासाठी नवनवी निर्मिती करु शकला. त्यासाठी नवनवे शोध लावू लागला. विविध कलांची निर्मिती या मूलतत्त्वाच्या आधारानेच होऊ लागली. त्यामुळे भाषा हा घटक मनुष्यनिर्मित असूनही पुढच्या काळात भाषेच्या आधाराने नवा मनुष्य, समाज घडू लागला. म्हणजे भाषेचे आणि मानवाचे नाते हे परस्परावलंबी असे आहे. या सर्वांचा विचार भाषाशास्त्रात केला जातो. भाषेचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे भाषाशास्त्र होय. भाषेचा अभ्यास करताना मानवी भाषा स्वरूपाचा आपण इथे विचार करू.

## १ अ.२ मानवी भाषेचे स्वरूप

मानवी भाषेचे कार्य केवळ संदेशवहन व दळणवळण इतकेच मर्यादित नाही. तर त्याच्या उपयोजनात याच्यासोबतच भावनाप्रकटन, विचारप्रकटन, संस्कृतीसंक्रमणाची कार्येही सिद्ध केली जातात. कोणता ना कोणता आशय, भावना एका व्यक्तीपासून दुसऱ्या व्यक्तीपर्यंत पोहोचवणे हे मानवी भाषेचे आशयवाही स्वरूप आहे. पुढील काही मुद्यांच्या आधारे मानवी भाषेचे स्वरूप स्पष्ट करता येते.

### १ अ.२.१ मानवनिर्मित भाषा :

भाषा ही कोणी निर्माण केली असा प्रश्न अनेकदा उपस्थित केला जातो. भाषेतील ध्वनी आणि त्यांना मिळालेला, प्रस्थापित झालेला अर्थ हा कोणी निश्चित केला ? हे प्रश्न इथे अप्रस्तुत आहेत. कारण भाषानिर्मिती ही केवळ एक मानवाच्या आवाक्यातील गोष्ट नाही. तसेच ती काळाच्या नेमक्या टप्प्यावर निर्माण झाली असे नाही. पण भाषा ही मानवनिर्मित असून भाषेतील ध्वनी आणि त्यांना प्राप्त होणारा अर्थ हा काळाच्या प्रवाहाबरोबर निश्चित होत गेला. मानवाच्या शारीरिक व इतर विकासाचे टप्पे भाषेच्या विकासाच्या समांतरतेचे सूचक आहेत. भाषा अर्जित असणे, यादृच्छिक असणे ही तिची वैशिष्ट्ये भाषा मानवनिर्मित असल्याचे सिद्ध करतात. जर तो निसर्ग निर्मित असती तर ती शिकावी लागली नसती. ती मुळातच मानवी मेंदूमध्ये अनुवांशिकतेने

स्थिर झाली असती. आणि तशी ती मानवेतर प्राण्यामध्येही अस्तित्वात असती. तसेच भाषेचे जे प्राचीन रूप आहे तेच रूप आधुनिक काळात किंवा त्या भाषेच्या भविष्यकाळात असत नाही. तिच्यात बदल होत राहतो. हा बदल मानवकृत असतो.

मानवाने आपले जगणे सुलभ आणि समृद्ध करण्यासाठी भाषेची निर्मिती केली. मानवी बुद्धी ही इतर प्राण्यापेक्षा स्वतंत्र आणि वेगळी विचार करणारी आहे त्याचे सूचन भाषानिर्मितीतून होते. स्वतःच्या संप्रेषणाची एक वेगळी व्यवस्था निर्माण करणे आणि ती उत्तरोत्तर विकसित करत नेणे हे भाषा मानवकृत असल्याचे उत्तम उदाहरण आहे.

### १ अ.२.२ समाजव्यवहाराचे साधन :

मानव हा एक समाजशील प्राणी आहे. म्हणजे मानव हा समाजात राहणारा प्राणी आहे आणि या समाजाची काही तत्त्वे असतात. जसे की समाजाच्या विविध धारणा, परंपरा, संस्कृती, नीतीमत्ता इ. समाजाने नियत केलेल्या या गोष्टी समाजातील प्रत्येक व्यक्तीकडे भाषेद्वारे संक्रमीत होत असतात. तसेच त्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडेही भाषेद्वारेच संक्रमीत होत असतात व जतन केल्या जात असतात. त्यामुळे या सर्वांमध्ये भाषा हे अत्यंत प्रभावशील माध्यम ठरते. समाजातर्गंत होणारे दैनंदिन व्यवहार, धर्मकारण, राजकारण, व्यापार, शिक्षण यामध्ये भाषेचे स्थान प्रथम दर्जाचे आहे. अलीकडच्या युगात समाजव्यवहाराची इंटरनेटसारखी प्रभावी साधने उपलब्ध असली तरी भाषेचे स्थान अटळ आहे. कारण मनुष्य लिखाणापेक्षा बोलण्यासाठी भाषेचा अधिक वापर करतो. समाजव्यवहारासाठी भाषा हे एकमेव साधन होते तेव्हापासून आताच्या अनेक संपर्कसाधनांच्या पसाऱ्यात भाषा हा घटक प्रभावी आहे. वैयक्तिक भावभावनांचे प्रकटीकरण, संपर्काची गरज, नवनवीन शोधाचे संवर्धन व जतन अशा विविध मानवी गरजांची पूर्तता भाषा आजही तितक्याच तत्परतेने पूर्ण करताना दिसते. म्हणूनच ना.गो. कालेलकर ‘भाषा ही एक सामाजिक सवय आहे, त्यामुळे तिचा उपयोग समाजातल्या प्रत्येक मनुष्याकडून नकळत, आपोआप आणि बिनचूक होतो.’ (पृ.९, ‘भाषा आणि संस्कृती’) असे म्हणतात, यावरुनच भाषा हे समाजव्यवहाराचे परिपूर्ण असे साधन आहे असे म्हटले जाते.

### १ अ.२.३ भाषेचे माध्यम-ध्वनी :

मानवी भाषा ही सार्थ ध्वनींची रचना असते असे भाषाभ्यासात सांगितले जाते. भाषेचे स्वरूप स्पष्ट करताना ध्वनी या माध्यमाचा विचार महत्त्वाचा ठरतो. मानवेतर प्राण्यांच्या भाषेचे माध्यम ध्वनी असले तरी ते एकस्तरीय अर्थ प्रकट करणारे व मर्यादित असल्याने प्राण्यांना त्यांची स्वतःची भाषा निर्माण करता आली नाही. पण याच ध्वनी या माध्यमाचा अवलंब करुन मानवाने भाषानिर्मिती केली. यादृच्छिकता या गुणामुळे अनेक भाषांमध्ये ध्वनींचे अर्थ भिन्न भिन्न असतात. पण भाषेची एक नियमव्यवस्थाही ठरलेली असल्याने विशिष्ट ध्वनींना विशिष्ट अर्थही ठरलेला असतो. ध्वनीच्या माध्यमातूनच भाषेचे प्रकटन होत असते. भाषेच्या उपयोजनातील लेखनापेक्षा बोलण्याला भाषाविज्ञानात अधिक महत्त्व दिले गेले.

भाषेचे माध्यम ध्वनी या घटकाचे - ज्यांना भाषेमध्ये निश्चित अर्थ मिळू शकला असे आणि ज्यांना निश्चित अर्थ मिळू शकला नाही असे दोन भेद दिसतात. जसे मानवी मुखावाटे निघणारे ध्वनी विशिष्ट अर्थ प्रकट करतात. तसेच इतर काही मनुष्यनिर्मित ध्वनी विशिष्ट अर्थाचे सूचन, प्रकटन करतात. उदा. टाळीचा आवाज, खाकरणे, शिळ घालणे, शिट्टी मारणे,

जांभई देणे इ. हे ध्वनी भाषेतर ध्वनी असूनही विशिष्ट अर्थाचे प्रकटन करत असतात. पण त्या ध्वनींचा समावेश मानवी भाषेमध्ये झालेला नाही.

### १ अ.२.४ संकेतबद्धता :

संकेतबद्धता म्हणजे अमूक एका गोष्टीसाठी अमूक एक असा ठरलेला अर्थ. जसे मानवी भाषेमध्ये विशिष्ट ध्वनी एका पाठोपाठ एक उच्चारल्यानंतर मानवी मेंदूत विशिष्ट अर्थ सूचित होतो तो अर्थ भाषेच्या संकेतबद्धतेतून निश्चित झालेला असतो. मानवेतर प्राण्यामध्ये हे संकेत एकास एक असे असतात. जसे भय, भूक, प्रजनन आदी गोष्टीसाठी आवाजाच्या विशिष्ट तऱ्हा, ध्वनी एकच एक अर्थ सूचित करत असतात. हे ध्वनी आणि अर्थ प्राणी जगतात सार्वत्रिक असतात. पण मानवी भाषेमध्ये यामध्ये वैविध्य दिसते. जसे भूकेचे सूचन होत असताना मराठीमध्ये 'पुस्तक', हिंदीमध्ये 'किताब', इंग्रजीमध्ये 'बुक (BOOK)' असे विविध ध्वनीतून एकच अर्थ सूचित केलेला असतो. प्रत्येक भाषेत एकच अर्थ दर्शविणारे ध्वनी वेगवेगळे असतात. याचा अर्थ ध्वनी आणि त्यांचा निश्चित होणारा अर्थ हा ज्या त्या समूहाने, समाजाने निश्चित केलेला असतो. म्हणजेच समाजानुसार भाषेतील ध्वनी म्हणजेच संकेत बदलत असतात. हे मानवनिर्मित भाषेचे वैशिष्ट्य आहे. या ध्वनीसंकेतांना समाजमान्यता असते. समाजानुसार प्रत्येक भाषेतील ध्वनी व त्यातील संकेतांची निश्चिती ही यादृच्छिकतेने झालेली असते. मानवी भाषा ही संकेतबद्धतेमुळे वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

### १ अ.२.५ प्रतिकात्मकता :

प्रत्येक समूहाची त्याची एक भाषा असते. या समूहानुसार भाषेतील ध्वनी आणि त्याचे अर्थ वेगवेगळे असतात. जसे मराठीमध्ये 'पुस्तक' हा ध्वनी विशिष्ट अर्थाचा सूचक असतो. तर हिंदीमध्ये याच अर्थाचे प्रकटन 'किताब' या ध्वनीतून होते. हे अर्थ भाषेत यादृच्छिकतेने निश्चित होतात. पण त्यासोबतच एकच आशय भाषेच्या नाविन्यपूर्ण रचनेतून अधिक आकर्षक बनविली जाते. भाषेच्या प्रतिकात्मकतेमुळे ते साध्य होते.

भाषेसोबतच मानव भाषेतर संप्रेषणातूनही असा अर्थ सूचित करत असतो. जसे रागाने डोळे वटारणे, बोटे मोडणे, नमस्कार करणे, कपाळावर हात मारणे, कान पकडणे, शिट्टी वाजवणे, नाक मुरडणे इ. अनेक हावभावयुक्त कृतीतून संदेशन होत असते. यातून विशिष्ट अर्थ सूचित होत असतो. याला 'देहबोली' किंवा 'हावभाव' म्हटले जाते. यालाच भाषेतर संप्रेषणही म्हटले जाते. हे हावभाव म्हणजे एक प्रकारची मानवी भाषा असते. या भाषिक आणि भाषेतर संप्रेषणातून प्रतिकात्मकता व्यक्त होते.

### १ अ.२.६ भाषा : एक पद्धती :

भाषा ही रचनाधिष्ठित आहे आणि या रचनेला एक विशिष्ट अर्थपूर्ण पद्धत आहे. कारण मानवी भाषेतील ध्वनींची संख्या मर्यादित आहे. पण या मर्यादित ध्वनींच्या आधारे अनेक प्रकारच्या रचना करुन अर्थपूर्ण संप्रेषण होऊ शकते. पण हे कधी शक्य आहे तर जेव्हा भाषेतील ध्वनी, त्यांची रचना आणि त्यातून व्यक्त होणारा अर्थ किंवा संकेत यांची जोडणी योग्य असेल तेव्हा, जर विविध ध्वनीतून एकच एक अर्थ किंवा समान ध्वनीतून विविध अर्थ असे झाले तर भाषेचे स्वरूप बिघडून जाईल.

मानवी भाषा विशिष्ट नियमांना धरुन निर्माण झाली आहे. भाषा शिकण्यासाठी व त्यातून व्यक्त होण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला ही नियमावली ज्ञात असते. निव्वळ ध्वनी म्हणजे भाषा नाही. कारण 'र', 'ट', 'प', 'न' हे फक्त ध्वनी झाले. पण याच ध्वनीतून नेमका अर्थ व्यक्त होण्यासाठीची शब्दरचना केली तरच पुढे भाषेचे स्वरूप सिद्ध होते. रपेट, रोपटे, टपरी असे शब्द उच्चारताच विशिष्ट वस्तूचे चित्र समोर उभे राहते. ते या नियमातून भाषेच्या केलेल्या रचनेमुळेच. तसेच समूहगटानुसार व त्या गटाच्या भाषेनुसार ही नियमावली वेगवेगळी असते. जसे गुजराती भाषिक 'च्यांगला' असा उच्चार करु शकतो. पण मराठी भाषिक असा उच्चार करणार नाही. तो 'चांगला' असाच उच्चार करेल. तसेच मराठीमध्ये 'ल' वरुन सुरू होणारा शब्द असेल पण 'ळ' वरुन होणारा शब्द नसेल. हे त्या त्या भाषेचे नियमन आहे. ती एक पद्धती आहे. ज्यामुळे भाषा शिकताना त्या पद्धतीच्या आधाराने शिकता येते. त्याप्रमाणे संबंधित भाषेचे स्वरूप दुसऱ्यांना पटवून देणे, इतर भाषेत आणि संबंधित भाषेत असणाऱ्या भेदाचे स्पष्टीकरणही या नियमांच्या आधारानेच करता येते. म्हणूनच श्री. न. गजेंद्रगडकर, ना.गो. कालेलकर यांनी भाषेचा उल्लेख 'एक पद्धती' म्हणून उल्लेख केला आहे.

## १ अ.३ मानवी आणि मानवेतरांचे संप्रेषण :

भाषेद्वारे केल्या जाणाऱ्या देवाण-घेवाणीच्या प्रक्रियेला संदेशन किंवा संप्रेषण असे म्हटले जाते. भाषा हे मानवी संप्रेषणाचे सर्वस्पर्शी साधन आहे. व्यक्ती भाषेद्वारे आपल्या राग-प्रेम, आसक्ती, विरक्ती, अशा विविध भावनांचे प्रकटन करु शकतो. एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीशी, एक व्यक्ती संपूर्ण समाजाशी अशा पद्धतीचे संप्रेषण भाषेद्वारे करत असतो. मानवी संप्रेषणासाठी भाषा हे महत्त्वाचे साधन आहे, त्यासोबतच काही भाषेतर साधनेही उपयुक्त ठरत असतात. मानवेतर संप्रेषणाचे स्वरूप मात्र यापेक्षा भिन्न असते. त्यांच्यातील संप्रेषण हे मर्यादित स्वरूपाचे असते. मानवी व मानवेतर संप्रेषणाचे हे बदलते स्वरूप आपल्याला पुढील मुद्द्यांधारे पाहता येते.

## १ अ.४ मानवांचे भाषिक व भाषेतर संप्रेषण

मानवी संप्रेषण हे भाषिक व भाषेतर अशा दोन्ही स्वरूपाने होत असते. भाषा हा घटक संदेशवहन, दळणवळणासोबत आत्मप्रकटन व विचारप्रकटनही करत असतो. विविध भावना, विचार, राग, द्वेष आदींचे प्रकटन तो या भाषेद्वारे करतो. व्यक्ती भाषेच्या माध्यमातून हळूवार भावना व्यक्त करताना कवितांची रचना करू शकतो तसेच राग, द्वेष व्यक्त करण्यासाठी शिव्याही देऊ शकतो. खोटे बोलू शकतो. भाषा या घटकाद्वारे विविध अनुभव, ज्ञान, कला, विचार, भावना यांची देवाणघेवाण होऊन संप्रेषण होत असते. मात्र काही वेळा हावभाव, रंग-रेखा माध्यम, इलेक्ट्रानिक माध्यमांच्या आधारे हे संप्रेषण साधले जाते. याचा उल्लेख भाषेतर संप्रेषण म्हणून केला जातो. मानवी संप्रेषणाच्या या पद्धती आहेत. यातील भाषिक संप्रेषण पद्धतीचा आपण इथे विचार करू.

### १ अ.४.१ मानवाचे भाषिक संप्रेषण :

भाषेद्वारे केले जाणारे संप्रेषण म्हणजे भाषिक संप्रेषण होय. मानवाने निर्माण केलेल्या भाषिक रचनेसाठी निवडक ध्वनींचाच अवलंब केला. त्या निवडक ध्वनींच्या आधारे विविध शब्दांची, वाक्यबंधाची रचना करुन संप्रेषण साधले जाते. भाषेद्वारे आपण एकमेकांशी संपर्क साधू

शकतो. ज्ञान, माहिती, विचार, भावना, अनुभव यांची देवाणघेवाण भाषेद्वारेच करू शकतो. भाषेद्वारे आपण एका व्यक्तीपासून ते संपूर्ण समाजापर्यंत संप्रेषण साधतो. यामुळे आपला दैनंदिन व्यवहार सहजसुलभ होत असतो. मानवी प्रगतीमध्ये भाषासंपादन हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जातो. प्रत्येक व्यक्तीला अशी संप्रेषणाची कोणती ना कोणती भाषा अवगत असते. पण एखाद्या व्यक्तीला जर अशी कोणतीच भाषा येत नसेल किंवा समजत नसेल तर त्या व्यक्तीच्या मेंदूमध्ये, श्रवणेंद्रियात किंवा वाग्येंत्रात बिघाड असू शकतो किंवा अशी व्यक्ती संपूर्ण मानवी समूहाच्या बाहेर वाढलेली असू शकते. भाषिक संप्रेषणाचे बोलणे आणि लिहिणे असे दोन प्रकारे उपयोजन होते. भाषात वापरले जाणारे ध्वनी, त्यांचे संकेत आणि या ध्वनिसंकेतांचे चिन्हरूप यातून भाषेचे लिखित रूप साध्य होते. लेखक व वाचक यांच्यातील संप्रेषण हे लिखित माध्यमातून होत असते. याचे स्वरूप काहीसे अप्रत्यक्ष असते. तर बोलीरूपामध्ये केवळ ध्वनी आणि त्यांचा संकेतार्थ यातून साध्य होते. याचे स्वरूप हे प्रत्यक्ष असते. कारण दोन व्यक्तींमध्ये भाषेद्वारे होणाऱ्या संप्रेषणात त्या व्यक्ती समोरासमोर हजर असतात.

### १ अ.४.२ मानवाचे भाषेतर संप्रेषण :

मानव संदेशवहनासाठी वापरत असलेल्या सर्वच तऱ्हाचा अंतर्भाव भाषेमध्ये होत नाही. पण त्याचा अंतर्भाव हा संप्रेषणामध्ये होतो. कारण ध्वनी आणि त्याचा अर्थ असा भाषेचा मुख्य आधार असला तरी या व्यतिरिक्त विशिष्ट शारीरिक हालचाली, विविध रंग, कपड्यांचा वापर, चित्र किंवा वाद्यांमधून काढले जाणारे ध्वनी यांच्यातूनही विशिष्ट अर्थांचे प्रसारण मानव करत असतो. या सर्वच गोष्टी मानवाच्या भाषेतर संप्रेषणामध्ये येतात.

### अ) हावभाव :

मानवांचे भाषावापराशिवाय सूचकतेने केले जाणारे संप्रेषण म्हणजे भाषेतर संप्रेषण होय. व्यवहारउपयोगी, दळणवळणासाठी, संदेशनासाठी, संपर्कासाठी उपयुक्त ठरणारे ध्वनी हे मानवी भाषेचा एक भाग ठरतात. पण काही मानवी हालचाली, हावभाव आहेत त्यांचा वापर मानवी संदेशनासाठी होत असतो ज्यांना मानवी भाषेतर संदेशन असे म्हटले जाते. नकार, होकार व्यक्त करताना केली जाणारी मानेची हालचाल, गाल फुगवून रूसण्याची दिली जाणारी प्रतिक्रिया, रागासाठी-डोळे वटारणे, खून्नस दाखविण्यासाठी डोळे बारीक करणे, टक लावून बसणे, नाक मुरडणे, पाय आपटणे, पायाच्या अंगठ्याने माती उकरणे, टाळी वाजवणे, मूठ आपटणे, इ. गोष्टी या मानवाच्या विविध संदेशनाचे प्रकटन करतात. या प्रत्येकातून विशिष्ट अर्थ दर्शविण्याची शक्ती असते. यांचाही अर्थ प्रतिक्रिया देणारा आणि समोरचा या दोघांच्याही मनात निश्चित असतो. ही एक प्रकारची संदेशन पद्धती आहे. यालाच मानवाचे भाषेतर संदेशन म्हटले जाते.

आपण आल्याची सूचना भाषेतून न देता काही लोक फक्त खाकरतात. खाकरण्याचा हा ध्वनी कुणीतरी आल्याचे संदेशन देऊ शकतो. म्हणजे मानवी व्यवहारासाठी हा ध्वनी उपयुक्त ठरतो. पण हा ध्वनी भाषेमध्ये समाविष्ट केला जाऊ शकत नाही किंवा आनंदाने टाळ्या वाजविण्याचा ध्वनी, शीळ घालणे, घृणा दर्शविणारा छी छी हा ध्वनी हे सर्व ध्वनी व्यवहारउपयोगी, अर्थवाही ठरतात. ही एक प्रकारची मानवी अभिव्यक्तीच असते. याला साहित्यिक भाषेत 'हावभावांची भाषा' असे म्हटले जाते. भाषेचे मुख्य कार्य संदेशन, भावनाप्रकटन आहे. हेच कार्य हावभावांच्या माध्यमातून पार पाडले जाते. हे सर्व हावभाव व्यवहारउपयोगी आहेत. म्हणूनच श्री.

न. गजेंद्रगडकर यांनी याला 'भाषेच्या सीमेवरील ध्वनी' (पृ. ८३, भाषा आणि भाषाशास्त्र) असे म्हटले आहे.

**ब) रंग, पोशाख, चित्र :**

मानवाच्या भाषेतर संप्रेषणामध्ये विविध रंग, चित्रे, पोशाख यांचा अवलंब आणि त्यातून सूचित होणारा अर्थ यांचा समावेश होतो. मानवाने त्याच्या परीने विविध रंगांचे अर्थ निश्चित केलेले आहेत. जसे हिरवा रंग समृद्धतेचा, पांढरा रंग शांततेचा, लाल रंग धोक्याचा इ. पण सिग्नल वरील हिरवा रंग चालू लागण्याचा व लाल रंग थांबण्यासाठीचे सूचन करणारा आहे. गुलाबी रंग प्रेमाचे प्रतीक मानले जाते. यासंबंधी आपल्या दररोजच्या अनेक उदाहरणांचे संदर्भ देता येतात. जसे आकाशातील पांढरे ढग काळे होऊ लागले की पाऊस येण्याचे सूचन होणे. झाडावरील फळ पिकल्यानंतर पिवळे होते. काळा रंग मानवी जीवनात अशुभतेचे सूचन करणारा ठरतो. शुभ कार्यावेळी काळ्या रंगांची कपडे वापरणे शक्यतो टाळले जाते. याउलट लहान मुलाला दृष्ट लागू नये म्हणून काळी तिट लावली जाते. तसेच विशिष्ट देवतेचे चित्र पाहिले असता मनुष्य त्यापुढे नतमस्तक होतात. वाहन मार्गांवर मुले शाळेला जात आहेत असे चित्र लावले असता तिथे हॉर्न वाजवू नये किंवा शांतता बाळगावी असे सूचन असते. अशा रंग, रेषा, पोशाख आणि चित्र असे सूक्ष्म व ठळक स्तरावरील संप्रेषण मानव साधत असतो.

**क) इलेक्ट्रॉनिक्स साधने :**

नवयुगातील मानवी संप्रेषणातील अत्यंत प्रगत, गतीशील आणि सुलभ साधन म्हणजे इलेक्ट्रॉनिक यंत्रणा होय. मानवाने स्वतःच्या गरजा जलद गतीने व सहजतेने पूर्ण करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स यंत्रांची निर्मिती केली. यातून मानवाने त्याचा भौतिक विकास तर साधलाच पण त्यासोबतच स्वतःच्या संप्रेषणाच्या कक्षाही विस्तारित केल्या. दरवाजावरील बेल, गाड्यांचे हॉर्न, कारखान्यांचे भोंगे, ट्रेनची शिट्टी, फोनची रिंग, इलेक्ट्रॉनिक मेल, मेसेज, टीव्ही, रेडिओ इ. अनेक गोष्टी या संप्रेषणामध्ये समाविष्ट होतात. ज्या मानवाची भौतिक गरज भागवण्याबरोबर संप्रेषणाचेही काम करतात.

**ड) इतर माध्यमाद्वारे होणारे संप्रेषण :**

पूर्वीच्या काळात रणवाद्ये युद्ध सुरु झाल्याचे किंवा संपल्याचे सूचित केले जायचे. ध्वज फडकवणे, गुलाल उधळणे, फुले देणे, फटाके वाजवणे इ. मधून आनंद व्यक्त करणे. शांतता प्रदर्शित करण्यासाठी आकाशात कबुतरे सोडणे इ. माध्यमातून एक सूचक अर्थ प्रकट होतो. माणसाच्या या विशिष्ट अर्थ दर्शवितात. ही उदाहरणे भाषेव्यतिरिक्त केल्या जाणाऱ्या संप्रेषणामध्ये समाविष्ट होतात. मानवी संप्रेषणाच्या व्यापकतेचा यातून आपल्याला अंदाज येतो.

**१ अ.४.३ मानवेतरांचे संप्रेषण :**

मानवेतर म्हणजे मानव सोडून इतर पशु, पक्षी, जलचर इ. होय. याचा उल्लेख मानवेतर म्हणून केला जातो. या सर्व मानवेतरांमध्ये अनेक पशू, पक्षी असे आहेत की जे समूह करुन राहतात. समूह आला की त्यांच्यामध्ये संप्रेषण होणे हा भाग येतो. ज्याच्याकरवी समूहातील एक दुसऱ्याला काही संकेत / संदेश देऊ शकतो. जसे भाषा हे मानवी संप्रेषणाचे माध्यम आहे. तसे मानवेतरांमध्येही संप्रेषणाचे असे काहीतरी माध्यम असले पाहिजे जे प्राण्यांच्या कळप करुन राहण्यासाठी उपयोजनात आणले जात असेल, की ज्याला मानव 'पशूपक्षांची भाषा' असे नाव देतो. ही त्यांची भाषा म्हणजेच त्यांचे ते संपर्कसाधन किंवा संपर्कमाध्यम होय. त्यांचे विशिष्ट

ध्वनी, त्यातील चढउतार व हावभाव यातून विशिष्ट अर्थ सूचित होत असतो. समूहात राहणे किंवा स्वतःचे जीवन जगण्यासाठी प्रत्येक प्राणी अशा संपर्कमाध्यमाचा वापर दैनंदिन करत असतो. शिकार करणे, संकटाचे सूचन करणे, त्यातून स्वतःचा बचाव करणे, कामजीवन व्यक्त करणे अशा विविध गोष्टींचे सूचन ते त्यांच्या या संप्रेषणातून व्यक्त करतात.

पाळीव प्राण्याबाबत तर असे बोलेले जाते की, प्राण्यांना माणसाची भाषा कळते. पाळलेला पोपट माणूस जे बोलेल ते बोलण्याचा प्रयत्न करतो. पाळीव कुत्रा, मांजर, गाई, म्हैशी, बैल मालकाने बोलवता क्षणी येण्याची किंवा जाण्याची आज्ञा पाळतात. म्हणजे मानवाचे विशिष्ट शब्द किंवा ध्वनी म्हणजे त्यांनी करावयाच्या कृती हे गणित मानवेतरांमध्ये नक्की झालेले असते. पण हे केवळ सरावाने आणि सहवासाने शक्य होत असते. जंगलात राहिलेला कोणताही प्राणी या आज्ञा पाळणार नाही. कारण हे त्यांना त्यांच्या आनुवांशिकतेने आलेले नसते. म्हणजेच प्राण्यामध्ये असणारे संप्रेषण हे आनुवांशिकतेने आलेले आणि सार्वत्रिक स्वरूपाचे असते. पण काही (सार्वत्रिक-महत्त्वपूर्ण) संकेतांचे सूचन प्राणीजगतात सार्वत्रिक पद्धतीने होत असते. काही ठराविक मूलभूत गोष्टींचे सूचन यातून होत असते. मानवेतरांच्या या संप्रेषणाबाबत हॉकेट या भाषा अभ्यासकाने त्यांच्या (Course in modern Linguistic) या ग्रंथात निरीक्षणे मांडलेली आहेत. ज्याचा विचार आपल्याला इथे करता येईल.

**भीती :**

आपल्यावर किंवा आपल्या समूहावर कोणतेतरी संकट आले आहे या भीतीची जाणीव होताच बचावासाठी, रक्षणासाठी पशू, पक्षी विशिष्ट प्रकाराचा आवाज करतात. समोरुन चालून येणारे संकट या आवाजाला घाबरून पळून जावे किंवा आपल्या समूहातील कोणीतरी आपल्या मदतीसाठी यावे यासाठीचे सूचन यातून होते. हे भीती व्यक्त करणारे संप्रेषण आहे. जसे मांजराला त्याचा शत्रू दिसला असता ते आपले शेपूट पिंजारून ताठ उभे करते आणि गुरगुरण्याचा आवाज करते. जनावरे मोठ्यांनी हंबरत असतात. यामध्ये स्व-संरक्षणार्थ समोरच्याला भीती दाखवण्याचा भाव असतो.

**आनंद :**

मानवेतर प्राण्यामध्ये आनंद व्यक्त करणारेही त्यांचे संप्रेषण असते. आनंद व्यक्त करत असताना एका पक्षापासून ते त्याचा समूहही तो आनंद व्यक्त करत असतो. जसे पिसारा फुलवून नाचणारा मोर, फुलांच्या व फळांच्या बहरामध्ये समूहाने झाडावर चिवचिवाट करणारे पक्षी इ. प्रत्येक समूह, कळपा गणिक आनंद व्यक्त करणारे हे संप्रेषण भिन्न असते.

**भूक :**

भूक लागल्यानंतरचे पशू पक्षांचे संप्रेषण विशिष्ट प्रकारचे असते. पक्षांची पिल्ली घरट्यात चिवचिवाट करत असतात. जेणेकरुन तो आवाज त्यांच्या मातेपर्यंत पोहोचेल, जी त्यांना अन्न भरवू शकेल. हा चिवचिवाट ऐकूणच पिलांचे आई-बाप पिलांसाठी अन्न आणत असतात. ती पिल्ले जोपर्यंत स्वतःचे अन्न स्वतः मिळविण्यासाठी सक्षम होत नाहीत तोपर्यंत ती पिले स्वतःसाठीचे अन्न मिळविण्यासाठी आईवडिलांसोबत या पद्धतीने संदेशन करत असतात.

**प्रजनन :**

शारीरिक गरज पूर्ण करण्यासाठी पशू-पक्षी विशिष्ट आवाज करत असतात की, जे त्यांच्या जोडीदाराला आकर्षित करेल. हे आवाज पक्षांच्या व पशूंच्या विशिष्ट जातीनुसार वेगवेगळे असतात. ज्यातून त्यांच्या जातीतीलच जोडीदार आकर्षित होतो. मादी आणि नर दोघे एकमेकांच्या आवाजाला साद-प्रतिसाद देऊन एकत्र येत असतात.

**इतर पशू, पक्षी, प्राण्यांचे संप्रेषण :**

पशू आणि प्राण्यांच्या संप्रेषणामध्ये असणाऱ्या काही समान गोष्टी इथे आपण पाहिल्या. पण यासोबत काही पशू आणि प्राण्यांचे संप्रेषण हे त्यांच्या समूहापुरते मर्यादित असते, त्यांनी दिलेले संकेतांचे अर्थ त्या त्या समूहात प्रचलित असतात. याबाबतचे हॉकेट यांनी मधमाशी, स्टिकलबॅक मासा व हेरिंग गल्स पक्षी यांच्यातील संप्रेषण पद्धतीचे विवेचन केले आहे.

**मधमाशींची संप्रेषण पद्धती :**

मधमाशांमध्ये राणी माशी व कामकरी माशी असे विभाजन असते. यातील कामकरी माशी ह्या मधाचे ठिकाण शोधण्याचे काम करुन तो पोळ्यात एकत्र जमा करण्याचे काम करत असतात. पण सुरुवातीस कामकरी माशीला जेव्हा मधाचे ठिकाण सापडते तेव्हा ती पोळ्यातील इतर माशांना ते ठिकाण सांगण्यासाठीचा विशिष्ट प्रकारचा नाच करते. यातून मधाचे ठिकाण, दिशा, अंतर याची माहिती इतर माशांना कळते. या नाचाची विशिष्ट गती व पद्धत असते ज्यातून याचे सूचन होत असते. मधाचे ठिकाण हे अंदाजे वीस ते साठ फूट इतक्या अंतरावर असते तेव्हा ती माशी आठ या अंकाच्या आकाराचे नृत्य करते. तर मधाचे ठिकाण यापेक्षा अधिक अंतरावर असते तेव्हा ती पहिल्यांदा नागमोडी, नंतर अर्धगोल, पुन्हा नागमोडी व शेवटी विरुद्ध बाजूने अर्धगोल पूर्ण करत गुंतागुंतीचे नृत्य करत असते. नृत्यातील गतीनुसार मधाचा दर्जा निश्चित होतो. असे मधमाशांमधील संदेशन हे फक्त मधापुरते मर्यादित असते. इतर गोष्टींसाठी असे संदेशन होत नाही. या संदेशनामध्ये मात्र बरेच अडथळे येत राहतात. मुख्य माशीचे नृत्य ज्यांनी बघितले आहे त्यांनाच फक्त मधाचे ठिकाण कळते. सर्वांनाच ते कळते असे नाही. या संदेशनाचे स्वरूप पूर्णतः शारीरिक असते.

**स्टिकलबॅक मासा :**

मधमाशांची संदेशन पद्धतीनंतर स्टिकलबॅक या माशाच्या संप्रेषण पद्धतीचा विचार अभ्यासकांनी मांडला. हेही संप्रेषण शारीरिक-स्पर्शाधारित स्वरूपाचे असते. यामध्ये मासा समुद्राच्या किंवा नदीच्या तळाशी एक घरटे बांधतो आणि अंड्यामुळे ज्या मादीचे पोट पुढे आलेले आहे अशा मादीच्या शोधात राहतो. अशा मादीला आकर्षित करण्यासाठी तो तिच्याभोवती नाच करतो. या त्याच्या नाचाला सकारात्मक प्रतिसाद म्हणून त्याच्या पाठोपाठ ती त्याच्या घरट्यात जाते. घरट्यामध्ये तो आपले तोंड मादीच्या पोटावर घासतो. तेव्हा ती मादी त्याच्या घरट्यात आपली अंडी टाकते आणि निघून जाते. या अंड्यावर तो नर आपले रेतूक टाकतो. या वेळेस नरमाशाचे पोट लालसर झालेले असते. नर माशाचे पोट लाल होणे आणि मादीचे पुढे आलेले पोट असे दोन्ही संकेत असल्याशिवाय ही घटना घटत नाही. या हालचालीमध्ये नर व मादी यांच्यातील सांकेतिक स्वरूपाचे संप्रेषण, दळणवळण सुरु असते. इथे हे संप्रेषण नैसर्गिक आहे. कुणीही शिकवलेले नाही. ते सहजप्रवृत्त स्वरूपाचे असते.

**हेरिंग गल्स पक्षी :**

हेरिंग गल्स पक्षीही अशाच स्वरूपाचे संदेशन करत असतो. मानवेतरांतील संदेशनाचे हे एक विकसित रूप मानावे लागते. हेरिंग गल्स पक्षाच्या पिलांना जेव्हा भूक लागते तेव्हा ती पिले आपल्या आई-बापाच्या चोचीवर चोच घासून किंवा मारुन अन्न मागतात. त्यानंतर आई-बाप त्या पिलांना त्यांचे पोट भरेपर्यंत अन्न देतात. पिलांचे पोट भरल्यानंतर ती चोच मारायची थांबतात. पिलांना भूक लागली की त्यांनी चोच मारणे व त्यानंतर आई-बापाने त्यांना अन्न पुरविणे हे संदेशन नैसर्गिक व सहप्रवृत्तीने होते. यामागे कोणतीही शिकवण असत नाही.

**इतर काही प्राण्यांचे संप्रेषण :**

वर उल्लेखिलेल्या पक्षी, प्राण्यांपेक्षा इतर काहींचे संप्रेषणाचे स्वरूपही भिन्न भिन्न असते. ज्याद्वारे ते आपल्या समूहांतर्गत दळणवळण करत असतात. जसे उत्तर थायलंडमधील गिबन्स प्राणी दळणवळणासाठी ९ प्रकारचे आवाज काढतात. (संदर्भ : ना. गो. कालेलकर, भाषा आणि भाषाशास्त्र, पृ. ८५) या आवाजात चढ-उतारही असतात. भीतीचे सूचन करणारा ध्वनी मोठा असतो. तर मित्र असल्यास हा ध्वनी या विरुद्धच्या पटीतला असतो. रीषश (Rhesus) जातीचे माकडे ७३ संकेतांचे उपयोग करत असतात. वर्वेट माकडे ३६ प्रकारचे संदेश निर्माण करत असतात. डुक्कर २३ प्रकारचे संदेशन निर्माण करतात. धान्याचा साठा कुठे आहे हे आपल्या कळपातील इतर मुंग्यांना कळावे यासाठी मुंग्या विशिष्ट गंध द्रवरूपाने सोडत असतात. हा गंध इतर मुंग्यांसाठी संदेशन असतो. हा गंधावर आधारित संदेशन प्रकार होय. यासोबतच मांजर, कुत्रा, मोर, पोपट, बेडूक, कोकीळ यांच्यामध्येही अशाप्रकारचे संप्रेषण घडत असते.

मानवेतर प्राण्यांमधील हे संप्रेषणातील संदेशनाचे प्रमाण एकास एक अशा स्वरूपाचे असते. त्यांचे हावभाव, ध्वनी, स्पर्श, नृत्य इ. गोष्टी ह्या एकच एक अर्थाचे सूचन करणाऱ्या असतात. त्यांच्याकडून निर्माण होणाऱ्या ध्वनीतून एकच अर्थ आणि म्हणून एकच संदेशन मिळत असते. मानवी भाषेत ध्वनींची संख्या मर्यादित असली तरी त्यांच्यातील संरचनेत बदल करुन अनेक संकेतांचे निर्माण करणे शक्य होत असते. मानवी भाषेच्या सात लक्षणांशी मानवेतर प्राण्यांच्या भाषेसोबत तुलना केली असता या दोन्ही भाषेतील फरक सहजपणे लक्षात येतो.

## १ अ.५ मानवी भाषेची लक्षणे

यापूर्वी आपण मानवी भाषा व मानवेतरांच्या संदेशन प्रक्रियेचा विचार केला आहे. मानवी संप्रेषण ही मानवेतरांच्या संप्रेषणापेक्षा अत्यंत वेगळे, बहुसंदर्भीय आणि अधिक संदेशवहनपर ठरते ते मानवनिर्मित भाषेमुळे. हे संप्रेषण वेगळी ठरणारी मानवी भाषेची लक्षणे आपल्याला इथे नमूद करता येतील. ज्यातून मानवी भाषा व मानवेतरांचे संदेशन हे भिन्न असल्याचे अधिक स्पष्टपणे ध्यानात येते.

सी. एफ. हॉकेट यांनी मानवी भाषेची सात लक्षणे सांगितली आहेत. या वैशिष्ट्यांबरोबरच भाषेची आणखी काही वैशिष्ट्ये आहेत. त्यांचा इथे थोडक्यात विचार करु.

**१ अ.५.१ ध्वन्यात्मकता / द्विस्तरीय रचना :**

ध्वनी हे भाषेचे माध्यम आहेत. पण स्वतंत्र ध्वनी स्वतः विशिष्ट अर्थ किंवा आशय व्यक्त करु शकत नाहीत. त्यामागे संकेतव्यवस्था असणे गरजेचे असते. ध्वनी आणि संबंधित

वस्तू यांना संकेतातून अर्थ प्राप्त होत असतो. बर्वेट माकडे ३६ वेगवेगळ्या प्रकारचे ध्वनी काढू शकतात व इतकेच संदेशन ते साध्य करत असतात. मानवी भाषेतील ध्वनींची संख्या ३० ते ४० इतकी असते. पण ज्या ध्वनींतून केवळ तेवढेच संदेशन होत नाही. यातील मूल ध्वनींना स्वतंत्र अर्थ असत नाही. पण या ध्वनींची विशिष्ट प्रकारे रचना करुन अनेक प्रकारचे अर्थ व्यक्त करत असतो. उदा. आकाश या शब्दाला आपसूक अशा कोणताही नैसर्गिक अर्थ नाही. पण त्याचा अर्थ संकेताने समाजमान्य झालेला असतो. त्यामुळेच मानवी भाषा ही एक संकेतप्रणाली आहे असे मानले जाते. माणूस इतर अनेक संकेतव्यवस्थांचाही वापर करत असतो. पण भाषा या संकेतव्यवस्थेवर तो अधिक विसंबून असतो. इतर संकेत-व्यवस्थांच्या तुलनेने भाषा ही संकेत-व्यवस्था अधिक उपयुक्त ठरत असते.

मानवेतर प्राण्यांच्या भाषेतही ध्वनी हेच महत्त्वाचे साधन असून त्यांच्या ध्वनींची संख्या मर्यादित असते. पण ते त्यांच्या भाषेत द्विस्तरीय रचना असत नाही. त्यांच्या ध्वनींमध्ये विविधता असत नाही. तसेच त्यांच्या ध्वनींना एकच एक अर्थ असतो. ध्वनींच्या रचनेत अदलाबदल करुन नव्या अर्थाची ध्वनीरचना त्यांना करता येत नसल्याने त्यांचे ध्वनींतील संदेशन हे एकस्तरीय असते. त्यामुळे मानवेतर प्राण्यांची भाषा ही मर्यादित, संकुचित असते. याऊलट मानवी भाषा ध्वनींच्या द्विस्तरीय अर्थवाही रचनेमुळे समृद्ध ठरते. उदा. 'आज' मधील 'आ' व 'ज' हे ध्वनी एकत्र आले की वेगळा अर्थ येतो. तर 'आता' मधील 'आ' व 'ता' हे ध्वनी एकत्र आले की वेगळा अर्थ निघतो. या दोन्ही शब्दातील 'आ' या ध्वनीची द्विस्तरीय पद्धतीने रचना होताना दिसते.

### १ अ.५.२ चिन्हात्मकता :

मानवी भाषा ही चिन्हांची व्यवस्था असते. या चिन्हांना दिला जाणारा विशिष्ट अर्थ किंवा संकेत हा समाजाने दिलेला, निश्चित केलेला असतो, तो यादृच्छिक असतो, त्यामध्ये कोणताही कार्यकारण भाव असत नाही. उदा. 'झाड' या शब्दातून नजरेसमोर उभ्या राहणाऱ्या चित्राचा आणि अक्षराचा कोणताही संबंध नाही. हे अक्षर आणि अर्थातील नाते योगायोगाने जुळलेले आहे.

मानवेतर प्राण्यामधील संदेशन हे शारीर पातळीवरचे असते. उदा. कामकरी मधमाशी मधाचे ठिकाण, अंतर व दिशा सूचित करण्यासाठी विशिष्ट प्रकारचे नृत्य करत असते. तिचे हे संदेशन शारीरिक पातळीवरचे असते. त्यातून एकच एक अर्थ सूचित होत असतो. याउलट मानवी भाषेतील ध्वनीमार्फत केले जाणारे संदेशन एकास एक असत नाही. तसेच भाषेतील ध्वनी म्हणजे चिन्हे आणि त्यातून व्यक्त होणारा अर्थ म्हणजे चिन्हीत संदेश यातील नाते हे यादृच्छिक स्वरूपाचे असते. ध्वनी आणि अर्थ यांतील नात्यामध्ये एक संकेतव्यवस्था असते, जो अर्थ योगायोगाने निश्चित झालेला असतो.

### १ अ.५.३ यादृच्छिकता :

भाषेचे स्वरूप लक्षात घेत असताना भाषेचे यादृच्छिकता हे लक्षण विचारात घेणे महत्त्वाचे ठरते. यादृच्छिकता म्हणजे भाषेत वापरला जाणारा विशिष्ट शब्द आणि त्यातून व्यक्त होणारा अर्थ यामध्ये कोणताही कार्यकारणभाव असत नाही. म्हणजे आपण 'झाड' हा शब्द उच्चारल्याबरोबर आपल्या डोळ्यासमोर राखाडी रंगाचा जाडजूड बुंदा असलेले, हिरव्यागार पानांनी गच्च भरलेले, जमिनीवर उभे असलेले असे झाडाचे चित्र उभे राहते. पण अशा आकाराच्या गोष्टीसाठी 'झाड' हाच शब्द का? किंवा 'मांजर', 'कुत्रा' हे ध्वनीसमूह त्या त्या विशिष्ट प्राण्यासाठीच का? तर हे प्रश्न इथे अप्रस्तुत ठरतात. परंपरेने, स्वीकारलेल्या व

योगायोगाने सिद्ध झालेल्या ध्वनी व त्याच्या अर्थाचा स्वीकार पुढची पिढी करत असते. विशिष्ट एका प्राण्याला विशिष्ट नामसंकेत परंपरेने स्वीकारला. तो प्राणी आणि त्याला दिलेले नाव हे दुसऱ्या प्राणी आणि शब्दसमूहापेक्षा, ध्वनीपेक्षा वेगळे असले पाहिजे हाही नियम परंपरेने स्वीकारला. हाच संकेत संपूर्ण समाजानेही स्वीकारला. आणि पुढे तो भाषेमध्ये स्थिर झाला.

परंतु प्रत्येक भाषेमध्ये प्रत्येक वस्तूसाठी वेगवेगळे शब्द निर्माण झाले. उदा. मराठीमध्ये 'मांजर', हिंदीमध्ये 'बिल्ली', इंग्रजीमध्ये 'कॅट' इ. म्हणजे प्रत्येक मानव समूहाचा विकास वेगवेगळ्या पद्धतीने झाला तसतशा त्यांच्या विविध भाषा आणि संकेत अर्थही निर्माण झाले. सबंध मानव समूहाची भाषा एकच नाही. पण मानवेतर संकेत यांचे सार्वत्रिकरण दिसते. जसे कावळ्यांची कावकाव, किंवा चिमण्यांचा चिवचिवाट हे मानवेतर प्राण्यांचे ध्वनी, भय, इशारा, आनंद व्यक्त करण्यासाठी एका प्रदेशात जसे असतील तसेच इतर प्रदेशशातही. त्यांचे ध्वनी आणि त्यामागील अर्थ एकच असेल. पण मानवी भाषेमध्ये भयाचे सूचन करणारे ध्वनी वेगवेगळ्या भाषेत वेगवेगळे असतील. यालाच यादृच्छिकता असे म्हटले जाते. या तत्त्वामुळेच जगभरातील भाषा एकमेकांपासून भिन्न आहेत. त्यामुळे मानवी भाषेचे हे एक महत्त्वाचे लक्षण आहे.

### १ अ.५.४ सर्जनशीलता / निर्मितीशीलता :

यापूर्वीच आपण नमूद केल्याप्रमाणे मानवी भाषेत मानवेतर प्राण्यांपेक्षा जास्त ध्वनी आहेत. पण या ध्वनींची संख्या ३० ते ४० च्या वर जात नाही. म्हणजे भाषेतील ध्वनींची संख्या मर्यादित आहे. तसेच शब्दसंग्रहही मोजण्याइतपत आहे. साधारणतः लाखाच्या घरात मोजता येतील इतकी. पण ती मोजता येते इतकी आहे म्हणजे ती अमर्याद नाही. पण या मर्यादित शब्दसंग्रहाच्या आधारे अमर्याद स्वरूपाची संदेशने साधता येतात.

शब्दांची, वाक्यांच्या वेगवेगळ्या पद्धतीने रचना करुन भाषेतून होणारे संदेशन अमर्याद होते. तसेच शब्दांच्या, वाक्यांच्या विविध प्रकारच्या उच्चारातूनही वेगवेगळे संदेशन होत असते. हे भाषेचे सर्वात मोठे लक्षण मानले जाते. भाषेच्या या शक्तीला सर्जनशीलता किंवा निर्मितीशीलता असे म्हटले जाते. भाषेतील सर्जनशीलता हा घटक केवळ कलावंतांकडेच, लेखक, कवीकडेच असत नाही; तर सामान्य माणूसही भाषेतील शब्द, वाक्य, उच्चाराच्या रचनेत बदल करुन अशी नवनिर्मिती करत असतो आणि अशी नवनिर्मिती दुसऱ्या व्यक्तीस अर्थबोध करुन देत असते. आनंद निर्माण करणारी असते. भाषेच्या निर्मितीशीलता या घटकामुळे नव्याने भाषा शिकणारे मूल सुरुवातीला भाषेचे केवळ अनुकरण करत असते. या अनुकरणाचा वापर ते स्वतंत्रपणे दुसऱ्या वस्तूंच्या बाबतीत करु लागते. एकदा का एक प्रयोग यशस्वी झाला की मग तशा पद्धतीच्या रचना करण्यास मूल तयार होते. उदा. सुरुवातीस 'दे' हा शब्द शिकल्यानंतर अनेक गोष्टींची मागणी करण्यासाठी ते मूल 'पाणी दे', 'खाऊ दे' असे प्रयोग अशा विविध प्रकारचे रचना-प्रयोग करु लागते. असेच प्रयोग इतर व्यक्ती भाषेबाबत करतात आणि ते प्रयोग त्याच्या अर्थासहीत समाजमान्यही होतात. भाषेच्या सर्जनशील शक्तीमुळेच हे शक्य होते.

तसेच एकच आशय विविध व्यक्तींकडून विविध पद्धतीने व्यक्त केला जातो. रोजच्या वर्तमानपत्रातून एकाच घटनेवर आलेले विविध वर्तमानपत्रातील विविध लेखकांचे लेख याचे उत्तम उदाहरण आहे. तसेच विविध लेखकांनी केलेल्या साहित्याची निर्मिती ही देखील भाषेच्या निर्मितीशीलतेच्या गुणामुळेच शक्य होते. निर्मितीशीलता या लक्षणामुळे मानवी भाषा अधिक विनिमयक्षम बनते. प्रत्येक व्यक्तीच्या डोक्यात भाषेची अशी एक विनिमयव्यवस्था निर्माण झालेली

असते. ज्यामुळे मानव याआधी कधीही न ऐकलेली किंवा वाचलेले एखादे वाक्य किंवा शब्द निर्माण करु शकतो, वाचू शकतो, प्राण्यांच्या भाषेत हे शक्य नसते.

### १ अ.४.५ प्रत्यक्षातीतता / विशिष्टता :

मानवी भाषेत प्राण्यांच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात प्रत्यक्षातीतेचा म्हणजेच विशिष्टतेचा गुण असतो. प्रत्यक्ष कृती न करता कृतीचा आशय व्यक्त करुन माणूस कार्यशक्तीची बचत करु शकतो. उदा. मुलांना 'शाळेची वेळ झाली' असे म्हणता क्षणी मुले शाळेचा पोषाख घालून, आपली शाळेची बॅग घेऊन शाळेला जाण्यासाठी तयार राहतात. इथे 'शाळेचा पोषाख घाला' आणि 'बॅग घ्या' अशी भाषिक बोलण्याची क्रिया करण्याची गरज असत नाही. यातील संकेत हे विशिष्टपणाने बनलेले आहेत. भाषेचे ही विशिष्टता आहे. पण ही विशिष्टता कमीजास्त प्रमाणात असू शकते. येथे प्रत्यक्ष कृतीऐवजी ती सूचित करणाऱ्या चिन्ह व्यवस्थेचा उपयोग केलेला आहे. भाषिक चिन्हव्यवस्थेमुळे माणसाच्या कार्यशक्तीची बचत होऊ शकते हे वरील उदाहरणातून आपल्याला दिसते. संदेश सूचनाची प्रक्रिया आणि सूचित संदेश यातील संबंधावर त्या संदेशवाहक व्यवस्थेची विशिष्टता अवलंबून असते.

### १ अ.५.६ सामाजिकता :

भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. मुळात भाषेमुळेच अनेक लोक एकत्र येऊ लागले. अनेक लोक एकत्र आल्यानंतर संप्रेषणासाठी म्हणून भाषेची निर्मिती झाली किंवा लोक एकत्र येण्यासाठी भाषा या घटकाचे साह्य झाले अशा दोन परस्परावलंबी गोष्टी आहेत. पण भाषेमुळे अनेक लोक एकत्र येऊ शकतात. आपापसातील भावभावनांचे आदानप्रदान करु शकतात. एकमेकांशी सामाजिक, आर्थिक, धार्मिक व्यवहार करु शकतात. म्हणजेच भाषा आणि समाज यातील नाते हे परस्परावलंबी आहे.

प्रथमतः मानवाचे समूह निर्माण होऊन त्या त्या समूहाची समूहभाषा निर्माण झाल्या. त्या त्या समूहाच्या सर्व गरजांनुसारचे अर्थ देण्याची क्षमता या समूहभाषांमध्ये निर्माण झाली. यामुळेच विशिष्ट गटाची, विशिष्ट समूहाची भाषा अशी भाषेची व भाषेवरुन गटाची ओळख निर्माण झाली. नंतर ही भाषा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे स्थलांतरीत झाली. पण प्रत्येक पिढीनुसार भाषेचे स्वरूप अधिकाधिक समृद्ध होत गेले. तिचा शब्दसंग्रह वाढत गेला.

भाषा हे ज्ञान देण्याचे आणि घेण्याचे प्रभावी माध्यम आहे. वर्तमानातील ज्ञान भविष्यकाळासाठी भाषेद्वारेच जतन केले जाते. याच पद्धतीने संस्कृतीचेही जतन होते. संस्कृती ही व्यापक संकल्पना आहे. त्यामध्ये समाज, धर्म, राजकारण, रीती-रीवाज, विचार-परंपरा इ. अनेक गोष्टींचा समावेश होत असतो. या सर्वच गोष्टी भाषेच्या माध्यमातून पुढच्या पिढीपर्यंत पोहोचत असतात. म्हणजे एका अर्थाने भाषा ही वरील सर्व गोष्टींचा समावेश आणि जतन करणारी गोष्ट असून ती संस्कृतीचे पर्यायाने समाजाचे पोषण करत असते.

### १ अ.५.७ परिवर्तनशीलता / अदलाबदल :

मानवी भाषेतील परिवर्तनशीलता हा घटक भाषेला अधिक समृद्ध बनवत असतो. मानवेतर प्राण्यांचे संदेशन एकास एक असते. तसेच त्यांच्या भाषेमध्ये परिवर्तनशीलता हा घटक नसल्यामुळे तिचे स्वरूप संकुचित असते. मेंदूच्या विकासाशी त्यांचा अत्यंत जवळचा संबंध येतो. मानवी जीवनात नव्या घडणाऱ्या घडामोडी, नवनिर्मिती यामुळे भाषेचा प्रपंच वाढतो आहे.

काही जुन्या शब्दांना नवे अर्थ प्राप्त होत आहेत. काही शब्दांमध्ये बदल करुन ते नव्याने संदेशनासाठी सज्ज होताहेत. (उदा. पंखा हा पूर्वी हाताने वारा घालण्याचे एक साधन होते. आता इलेक्ट्रीकवर चालणाऱ्या यंत्रासाठीही पंखा हा शब्द वापरला जातो. 'भ्रमणध्वनी' हा मोबाईलसाठी नवीन निर्माण झालेला शब्द आता सर्वत्र स्वीकारला जातो. इ.) तसेच परिवर्तनाचे हे स्वरूप मानवी मान्यतेनुसार स्थिर होत आहेत. अनुकरणामुळे असे परिवर्तन सहज स्वीकारले व प्रसारित केले जाते. म्हणजेच मानव एकमेकांच्या भाषिक रचनेमध्ये अदलाबदल करत असतो. भाषेत केलेले हे नवे बदल दुसऱ्या व्यक्ती आत्मसात करत असतात व त्याचा अवलंब सर्वत्र करत असतात. यामुळे एक व्यक्ती एकापेक्षा अधिक भाषा शिकू शकतो. भाषेतील परिवर्तनशीलता या लक्षणामुळे भाषा अधिक समृद्ध होत असते.

### १ अ.५.८ रैखिक स्वरूप :

भाषेचे स्वरूप हे रैखिक आहे म्हणजे भाषेतील ध्वनी एकामागोमाग एक उच्चारले जातात व तसेच त्या क्रमाने आपण ऐकतो. दळणवळण होत असताना भाषेचा हा क्रम उच्चारणाऱ्याला आणि ऐकणाऱ्यालाही सांभाळावा लागतो. यादरम्यान उच्चारणाऱ्याने त्यातील काही ध्वनींचे उच्चार केले नाहीत किंवा ऐकणाऱ्याने ऐकले नाहीत तर मुख्यार्थाला बाधा येते. पण असे दळणवळण चित्रातून होत असेल तेव्हा त्यामध्ये अशी बाधा येत नाही. कारण चित्रकाराने चित्र काढल्यानंतर कुठला भाग आधी चितारायचा, रंगवायचा याचा जरी क्रम असला तरी पाहणाऱ्याने त्याचे क्रमाने पाहिले पाहिजे असा नियम नसतो. तो सबंध कलाकृती एकाच क्षणी पाहू शकतो. त्यातून चित्रकाराला सूचिक करावयाच्या अर्थामध्ये कोणतीही बाधा येत नाही. पण भाषेमध्ये हा क्रम सांभाळणे गरजेचे असते. उदा. 'टपाल' हा शब्द. यातून ध्वनीत होणारा अर्थ वेगळा आहे. हाच शब्द वेगळ्या क्रमाने वाचला असता 'पालट' असा होतो. याचा अर्थ मुख्य अर्थापक्षा वेगळा होतो. फक्त शब्दातील क्रम बदल्यानंतर अर्थामध्ये कमालीचे बदल होतात. वाक्यातील पदिमांची रचनाबदल होऊ शकतो. हा नियम भाषेगणिक बदलतो.

### १ अ.५.९ स्थलकालातीतता :

आशयाचे सूचन भाषेत करत असताना स्थलकालाची बंधने ओलांडली जात असतात. भूत, वर्तमान, भविष्य काळातील दृश्य-अदृश्य अशा स्वरूपाच्या कोणत्याही आशयाची अभिव्यक्ती आपण करु शकतो. भाषेच्या या वैशिष्ट्यामुळे प्राचीन काळातील एखादी घटना ज्ञात असली तरी त्याचे वर्ण आपण आताच्या काळात करु शकतो. सत्य-असत्याची पुटे त्यावर चढवू शकतो. म्हणजेच केवळ सत्य घटनेच्या वर्णनाबरोबर व्यक्ती खोटेही बोलू शकतो. प्राण्यांच्या भाषेत मात्र हा स्थलकालातीततेचा गुणधर्म असत नाही.

## १ अ.६ मानवी भाषेच्या व्याख्या

भाषेच्या स्वरूपाबाबत विचार करत असताना विविध भाषा अभ्यासकांनी केलेल्या भाषेच्या व्याख्यांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

डॉ. रमेश धोंगडे यांनी त्यांच्या 'भाषा आणि भाषाविज्ञान' या ग्रंथात एडवर्ड सपीर, ब्लोक आणि ट्रेगर यांच्या व्याख्या दिल्या आहेत.

१. "कल्पना, भावना आणि इच्छा दुसऱ्याला सांगण्याचे, स्वतःच्या इच्छेवर अवलंबून असणारे मानवी साधन म्हणजे भाषा." (एडवर्ड सपीर, पृ. १०)

२. "मुखावाटे व्यक्त होणारी आणि समाजात सहकारासाठी आवश्यक अशी एक व्यवस्था म्हणजे भाषा." (ब्लोक आणि ट्रेगर, पृ. १०)

३. "यादृच्छिक ध्वनिसंकेतावर आधारलेली, समाज व्यवहाराला साह्यभूत अशी पद्धती म्हणजे भाषा." (श्री. न. गजेंद्रगडकर, भाषा आणि भाषाशास्त्र, पृ. १०८)

४. "मूळ आशयाशी कार्यकारणसंबंध नसलेल्या ध्वनिसंकेतांनी बनलेली, समाजव्यवहाराला साह्यभूत अशी भाषा ही एक पद्धत आहे." (ना. गो. कालेलकर, 'भाषा आणि संस्कृती, पृ. ८)'

५. "ध्वनी व अर्थ यात सांगड घालणाऱ्या चिन्हांची व्यवस्था म्हणजे भाषा होय." (फर्दिना द सस्यूर, उद्‌धृत : मिलिंद मालशे, 'आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन' पृ. ७)

६. मराठीतील भाषा हा शब्द मूळ संस्कृत भाषेतील भाष् (म्हणजे बोलणे) या धातूवरुन तयार झालेला तत्सम शब्द आहे. "मानवी मुखयंत्रणेतून निर्माण झालेली ध्वनिचिन्हांनीयुक्त असलेली यादृच्छिक संकेतव्यवस्था म्हणजे 'भाषा' होय." (विकीपिडीया - भाषा)

७. कोशवाङ्मयात भाषा म्हणजे - भाषा या शब्दातील मूळ धातू 'भाष्' हा आहे. या धातूचा अर्थ बोलणे, ध्वनी निर्माण करणे असा आहे. "मानवी मुखावाटे निघालेले सार्थ ध्वनिसंहिता" आणि "सार्थ आणि अन्वित अशा ध्वनींचा समूह म्हणजेच भाषा होय." असा अर्थ दिला आहे. इंग्रजी कोशात भाषा या शब्दांसाठी Language, Speech, Tongue असे पर्याय सुचविलेले आहेत. (उद्‌धृत : डॉ. वसंत कुबेर, डॉ. सुलक्षणा कुलकर्णी, पृ. १,२). विशिष्ट अर्थाचे हे ध्वनी विशिष्ट नियमांनी एकमेकांना जोडलेले असतात. या ध्वनींचा उपयोग व्यवहारपूर्तीसाठी केलेला असतो.

या सर्व समावेशक व्याख्यांचा विचार केला असता अंतिमतः भाषेचे स्वरूप स्पष्ट करणारी व्याख्या आपल्याला पुढील पद्धतीने करता येईल. "मानवी भावभावनांची देवाणघेवाण करणारी, यादृच्छिक सार्थ ध्वनींची पद्धती, व्यवस्था म्हणजे भाषा होय."

**आपली प्रगती तपासा :**

१) मानवी भाषेची लक्षणे सांगून मानवाचे भाषेत्तर संप्रेषण स्पष्ट करा.

## १ अ.७ सारांश

या घटकामध्ये आपण भाषेचे स्वरूप ध्यानात येण्यासाठी वरील मुद्यांचा विचार केला. ज्यामध्ये मानवी व मानवेतर संप्रेषणाचे स्वरूप तपासले. संप्रेषणासाठीच्या मानवाच्या भाषिक व

भाषेतर संदेशन म्हणजे नेमके काय याचा विचार केला. तसेच मानवी भाषेच्या विविध लक्षणांचा अभ्यास केला. भाषा म्हणजे नेमके काय हे सांगणाऱ्या विविध व्याख्यांचा परिचय करुन घेतला. या विविध अनुषंगाने मानवी भाषेचे स्वरुप काय, मानवेतर संप्रेषणाच्या तुलनेत मानवी संप्रेषणाचे व भाषेचे स्वरूप आणि लक्षणे कशी वेगळी आहेत हे ही अभ्यासले गेले.

## १ अ.८ संदर्भग्रंथ व अधिक वाचनासाठी पुस्तके


१) कालेलकर, ना. गो. : भाषा आणि संस्कृती, मौज प्रकाशन, मुंबई. प.आ. १९६२, ति. आ. १९९९.

२) कुबेर, वंसत : भाषाविज्ञान परिचय, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प.आ. २००३
कुलकर्णी, सुलक्षणा

३) गजेंद्रगडकर, श्री. न. : भाषा आणि भाषाशास्त्र, व्हीनस प्रकाशन, पुणे. प.आ. १९७२, ति.आ. १९९१.

४) ग्रामोपाध्ये, ग.बं. : भाषाविचार आणि मराठी भाषा, व्हीनस प्रकाशन, पुणे. प.आ. १९६४, दु. आ. १९७९.

५) गोरे, डॉ. दादा : आधुनिक भाषाविज्ञान आणि मराठी भाषा, गोदा प्रकाशन, औरंगाबाद, प.आ. २०१२.

६) धोंगडे, डॉ. रमेश : भाषा आणि भाषाविज्ञान, दिलीपराज प्रकाशन, पुणे. प.आ. २००६.

७) नेमाडे, भालचंद्र : साहित्याची भाषा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद. प.आ. १९८७.

८) मिलिंद, मालशे, : आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन, लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई, प.आ. १९९५, चौ.आ. २००९


## १ अ.९ संभाव्य प्रश्न

१) मानवी भाषेचे स्वरूप सांगून-भाषेची चिन्हात्मकता, यादृच्छिकता आणि अदलाबदल ही भाषेची लक्षणे स्पष्ट करा.

२) मानवी भाषेची लक्षणे सांगा.

३) मानवी भाषेचे स्वरूप सांगून मानवाच्या भाषिक व भाषेतर संप्रेषणाचे स्वरूप स्पष्ट करा.

४) भाषेची व्याख्या देऊन मानवाचे भाषेतर संप्रेषण स्पष्ट करा.

५) मानवाचे व मानवेतरांचे संप्रेषण स्वरूप सांगा व भाषेची लक्षणे स्पष्ट करा.

**टिपा लिहा :**

१) भाषेचे रैखिक स्वरूप

२) मानवी भाषेचे अदलाबदल हे लक्षण.

❖❖❖❖

# १ आ

# भाषेची विविध कार्ये

**घटक रचना :**

१आ.१ उद्देश

१आ.२ प्रस्तावना

१आ.३ विषय विवेचन

१आ.३.१ भाषेच्या विविध व्याख्या

१आ.३.२ भाषा - सामाजिक संस्था

१आ.४ भाषेची कार्ये - रोमान याकोबसन यांनी भाषेची सांगितलेली सहा कार्य

१आ.४.१ संपर्कनिष्ठ कार्य / निर्देशात्मक कार्य

१आ.४.२ परिणामनिष्ठ कार्य

१आ.४.३ संदर्भातील कार्य

१आ.४.४ आविष्कारात्मक कार्य

१आ.४.५ काव्यात्म कार्य / सौंदर्यात्मक कार्य

१आ.४.६ भाषाविषयक किंवा अतिभाषात्म कार्य

१आ.५ सारांश

१आ.६ शब्दकोश

१आ.७ संदर्भग्रंथ

१आ.८ आदर्श संभाव्य प्रश्नसंच

## १आ.१ भाषेची उद्दिष्टे / उद्देश

१. भाषेची विविध कार्य समजावून घेता येईल.
२. भाषेकडे वैज्ञानिक दृष्टीने पाहता येईल.
३. मानवाचे संप्रेषण व्यवहार समजण्यास उपयोगी होईल.
४. भाषेबद्दलचे गैरसमज, भ्रामक समजुती दूर करता येईल.
५. विविध भाषेबद्दल आवड निर्माण होणे.
६. संप्रेषणाचे श्रेष्ठ माध्यम भाषा आहे, हे समजेल.
७. मराठी भाषा व वाङ्मयाचे ज्ञान प्रगत होणे.
८. जीवनविषयक जाणिव प्रौढ होणे.

## १आ.२ प्रस्तावना

भाषा ही मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. भाषा समाजाचे दळणवळणाचे अत्यंत महत्त्वाचे अंग आहे. संज्ञापन करणे हेच भाषेचे मुख्य कार्य आहे. भाषा हे मानवाचे अत्यंत प्रभावी असे शस्त्र आहे. भाषेमुळेच समाजाचा तसेच त्या समाजाच्या संस्कृतीचा विकास झाला आहे. सामाजिक जीवनात सर्वच क्षेत्रात व्यवहार हा भाषेच्या माध्यमातून होत असतो. मूल जन्माला आल्यानंतर त्याला बोलता येण्यास सुरुवात झाल्यापासून ते अखेरच्या क्षणापर्यंत भाषेचा उपयोग करतो. सर्व भाषा आपआपले कार्य साधारणःच सारख्याच कार्यक्षमतेने पार पाडतात. आपल्या मनातील विचार, भावना, कल्पना दुसऱ्या व्यक्तीपर्यंत पोहोचवायचा असतो, त्याच्याशी संवाद साधायचा असतो, त्यासाठी बोलणाऱ्याची आणि ऐकणाऱ्याची संवादभाषा सारखीच असावी लागते, जर सारखी नसेल तर संज्ञापन होऊ शकत नाही.

भाषा केवळ विचार विनिमयाचे साधन नसून विचार करण्याचेही साधन आहे. ज्ञाननिर्मिती, ज्ञानसंवर्धन, ज्ञानरक्षण यासाठी भाषा ही उपयुक्त ठरते. ज्ञान सुरक्षित ठेवण्याचे तसेच त्याचे संवर्धन, विकसन करण्याचे काम भाषा करते. भाषेद्वाराच ज्ञानाचा वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असतो, म्हणून मानवी संस्कृतीची कल्पना आपल्याला भाषेमुळे होते.

## १आ.३ विषय विवेचन

भाषा माणसाच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. सर्व क्षेत्रात माणूस भाषेच्या माध्यमातून व्यवहार करत असतो. माणूस विचार ही भाषेद्वाराच करतो. तसेच स्वप्न ही भाषेद्वारेच पाहतो, भाषा ही सर्वांना ज्ञात असते. भाषेमुळेच माणसाला समाजात राहणे, सामाजिक संस्था निर्माण करणे, आणि संस्कृतीच्या विकास करणे शक्य झाले आहे. भाषा हे आत्मप्रकटीकरण व विचार प्रकटीकरणाचे प्रमुख साधन आहे. माणूस जसा परिवर्तनशील आहे तसेच भाषादेखील परिवर्तनशील आहे. कालपरत्वे भाषेंमध्ये परिवर्तन झालेले आहे. आपण भाषा शिकतो म्हणजे संकेत शिकत असतो. ज्या भाषेची संकेत व्यवस्था आपल्याला माहित नसते, ती भाषा आपणास कधीच येत नसते. उदा. एखाद्या मराठी माणसाला तामीळ भाषा येत नाही किंवा एखाद्या तामीळ माणसाला मराठी भाषा येत नाही. कारण त्या भाषेतील संकेत व्यवस्था माहीत नसते. त्यामुळे त्यांना भाषा येत नाही. भाषा ही ध्वनी संकेतावरच आधारलेली असते. म्हणून भाषा ही मानवी जीवनाचे, समाज जीवनाचे साहित्याचे माध्यम असते.

### १आ.३.१ भाषेच्या विविध व्याख्या :

वेगवेगळ्या भाषाविज्ञान अभ्यासकांनी भाषेच्या विविध व्याख्या केल्या. त्या पुढीलप्रमाणे आहेत.

**१) ना. गो. कालेलकर :** "मूळ आशयाशी कार्यकारण संबंध नसलेल्या ध्वनिसंकेतांनी बनलेली, समाज व्यवहाराला साह्यभूत अशी भाषा ही एक पद्धती आहे."

**२) श्री. न. गजेंद्रगडकर :** "यादृच्छिक ध्वनिसंकेतावर आधारलेली, समाज व्यवहाराला साह्यभूत अशी पद्धती म्हणजे भाषा." (भाषा आणि भाषाशास्त्र - १९९१, पृष्ठ १०८)

**३) भालचंद्र नेमाडे :** "खास मानवी अशी संदेश वहनाची व्यवस्था म्हणजे भाषा होय."

**४) एडवर्ड सपीर :** "कल्पना, भावना आणि इच्छा दुसऱ्याला सांगण्याचे, स्वतःच्या इच्छेवर अवलंबून असणारे मानवी साधन म्हणजे भाषा."

**५) फोर्दिना द स्योस्यूर :** "ध्वनि व अर्थ यांत सांगड घालण्याच्या चिन्हांची व्यवस्था म्हणजे भाषा होय."

**६) कृ.पा. कुलकर्णी :** "भाषा म्हणजे व्यवहारास प्रवृत्त करणाऱ्या सार्थ व अन्वित ध्वनींचा समूह होय."

**७) डॉ. भोलानाथ तिवारी :** "भाषा वह साधन है, जिसके माध्यम से हम सोचते है तथा अपने विचारों को व्यक्त करते हैं।"

**८) डॉ. अंजली सोमण :** "भाषा ही ध्वनिरचनांच्या संकेतीकरणावर आधारलेली प्रणाली आहे."


वरीलप्रमाणे भाषेच्या व्याख्या मांडल्या गेल्या.

**१आ.३.२ भाषा ही एक सामाजिक संस्था :**

भाषा ही आपणास मिळालेली एक देणगी आहे. मानवाने आपल्या बुद्धीकौशल्याने भाषेची निर्मिती केली आहे. मानवी जीवन सुरळीत चालण्यासाठी भाषेचा शोध लागला. व्यक्त होणे, विचारांचे, भावनांचे प्रकटीकरणासाठी ही मानवी गरज आहे. समाजामध्ये भाषा अस्तित्वात असते. 'भाषा म्हणजे मानवनिर्मित ध्वनींमधून निर्माण होणाऱ्या अर्थपूर्ण संकेताची योग्य मांडणी करुन विनिमय साधणारी किंवा संदेशन करणारी एक सामाजिक संस्था आहे.'

भाषा ही समाजाची गरज आहे. तशीच समाजाला भाषेची गरज अनिवार्य आहे. म्हणून मानवाच्या गतिशील जाणिवेला अभिव्यक्त करण्याचे सामर्थ्य भाषेमध्ये आहे. सामाजिक संपर्काचे साधन म्हणजे भाषा आहे. भाषा आणि समाज यांच्यामध्ये अनन्य संबंध आहे. कारण ती समाजाची मूलभूत गरज आहे. कोणत्याही समाज व्यवस्थेला वैचारिक आणि बौद्धिक अधिष्ठान प्राप्त करुन देण्याचे कार्य केवळ भाषेमध्ये आहे. मानव हा समाजशील प्राणी आहे. विकासासाठी आणि अस्तित्वासाठी कार्यशील असलेली भाषा म्हणूनच मानवी समाजात महत्त्वाचे आहे. सर्व मानव समाज स्वतःच्या भाषेशी घनिष्ठ असतो. भाषेशी त्याचा अतूट असा संबंध असतो. या भाषेचा समाजाला आदर असतो. मानवी समाज संस्कृतीचा भाषा हा एक भाग असतो. समाजाच्या परंपरा, संस्कृती, चारीरिती, ज्ञान इ. चे जतन भाषा करत असते. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे वहनाचे कार्य भाषा करत असते. म्हणूनच भाषा ही एक सामाजिक संस्था आहे.

भाषा वापरताना एक पद्धती वापरली जाते. ध्वनिसमुच्चयांचे अर्थ भाषा वापरणाऱ्या प्रत्येक भाषिकाला ज्ञात असतात. म्हणून ध्वनींच्या स्वीकृतीपासून आशयाच्या स्वीकृतीपर्यंत जाणे म्हणजेच भाषा समजणे होय. ध्वनि संकेतांना सामाजिक मान्यता असते. त्यामुळे भाषा वापर ही एक सामाजिक पद्धती आहे. ती पुढील आकृतीच्या साहाय्याने दर्शविता येईल.





वरील पद्धतीने संदेशक व ग्रहणकर्ता यांना भाषेतील अर्थसंकेत ज्ञात असतात. त्यामुळेच विनिमय घडून येतो आणि ही भाषा वापर पद्धती समाजात घडत असते म्हणून भाषा ही एक सामाजिक संस्था आहे.


## १आ.४ भाषेचे कार्य

भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. भाषेमुळेच विनिमय व संदेशनाचे कार्य होत असते. संपर्क साधणे, संदेश देणे हे महत्त्वाचे कार्य भाषा करते. समाजामध्ये हे कार्य भाषा वेगवेगळ्या पद्धतीने पूर्ण करीत असते. समाज अस्तित्त्वात येण्यासाठी परस्परसंबंध, परस्पर सहकार्य यांत आंतरक्रिया घडणे आवश्यक असते. समाजामध्ये भाषा वेगवेगळ्या कार्य पूर्ण करीत असते. भाषेच्या या कार्यांचे विभाजन रोमान याकोबसन (१८९६-१९८२) या रशियन भाषावैज्ञानिकाने भाषेच्या संरचनेच्या अंगाने केलेले आहे. याकोबसन ने. प्राग प्रणालीतील संरचनावादी भाषावैज्ञानिकाने व साहित्यमीमांसकाने संप्रेषणाचे एक नमुनारूप (मॉडेल - Model) मांडले आहे. त्याच्या मते कोणत्याही भाषिक घटनेत सहा घटक कार्यरत असतात. उदाहरणार्थ - “निसर्ग हिरवा आहे” ही एक भाषिक घटना आहे. एक भाषाप्रयोग आहे. यामध्ये एक लेखक आहे, तो कोणत्यातरी श्रोत्याला उक्तीतून (मेसेज) काही एक शब्दार्थमय अभिप्राय सांगत आहे. यात निसर्गाचे वर्णन आहे. म्हणून या उक्तीला ‘निसर्ग’ या वर्ण्यविषयाचा संदर्भ Context आहे. तसेच वक्ता व श्रोता यामध्ये संपर्क साधणारे शाई, कागद, लेखन यांसारखे संपर्क माध्यम Contact आहे. ही उक्ती मराठी भाषेच्या नियमानुसार आहे. त्यामुळे अर्थबोध होऊन अर्थसंप्रेषणाचे कार्य सुरळीतपणे चालते. म्हणून भाषिक घटनेत सहा कार्य करीत असतात.

रोमान याकोबसन याने भाषेचे कार्य सांगितले आहेत. भाषेच्या कार्यांचे विभाजनामागे एक विचार आहे. भाषिक संदेशनाच्या प्रक्रियेमध्ये / चिन्ह वापरामध्ये सहा मूल घटक असतात. त्यानुसार भाषिक चिन्हे कार्य करतात. असा विचार आहे. भाषिक चिन्ह व्यापारातील परिसर किंवा संदर्भ, संदेश, प्रेषक, ग्रहणकर्ता, संपर्क, माध्यम असे सहा मूलघटक सांगितले आहेत. सहा मूलघटकानुसार भाषेची सहा कार्य ठरवितांना रोमान याकोबसन याने खालील आकृतीप्रमाणे मूल घटक निश्चित केले आहेत.




**आकृती क्र. १**




**आकृती क्र. २**


वरीलप्रमाणे रोमान याकोबसनचे विचार स्पष्ट केले आहेत.

रोमान याकोबसन कृत मूल घटकानुसार भाषेच्या कार्यांची विभागणी केली आहे. उक्ती, भाषित (Message) जेव्हा स्वतःवरच आपले लक्ष केंद्रित करते किंवा स्वतःकडे वाचकाचे लक्ष वेधून घेते तेव्हा भाषा काव्यात्म कार्य करु लागते. कोणत्याही भाषित घटनेत भाषेची सहा कार्य कमी-अधिक प्रमाणात अंतर्भूत असतात. या सहा कार्यांपैकी कोणतेही एक कार्य इतरांपेक्षा अधिक प्रभावी होऊ शकते. साहित्यात सहा कार्य अंतर्भूत असतात. पण कवितेत काव्यात्म कार्यांचा प्रभाव अधिक असतो म्हणून भाषिक घटनेत १) वक्ता / प्रेषक २) श्रोता / ग्रहणकर्ता ३) भाषित ४) विषयसंदर्भ ५) संपर्क माध्यम ६) भाषिक नियम इ. घटक अंतर्भूत असतात.

रोमान याकोबसन याने भाषेची सांगितलेली सहा कार्य पुढीलप्रमाणे आहेत.

१) संपर्कनिष्ठ कार्य / निर्देशात्मक कार्य
२) परिणामनिष्ठ कार्य
३) संदर्भनिष्ठ कार्य
४) आविष्कारात्मक कार्य
५) काव्यात्म किंवा सौंदर्यात्मक कार्य
६) अतिभाषात्म किंवा भाषाविषयक कार्य

वरील भाषेची सहा कार्य आकृतीच्या साहाय्याने पाहू.




**आकृती क्र. ३**

वरीलप्रमाणे रोमान याकोबसनने आकृतीच्या साहाय्याने भाषेचे मूल घटक निश्चित केले आहे.

वरील सहा घटकांचा सविस्तर विचार करु या.

### १आ.४.१ संपर्कनिष्ठ कार्य / निर्देशात्मक कार्य :

संदेश जेव्हा प्रेषक व ग्रहणकर्ता यांच्यामधील संपर्कसंबंधावर भर देते तेव्हा भाषा संपर्कात्मक कार्य करीत असते. ग्रहणकर्त्यां बरोबर केवळ संपर्क चालू ठेवण्यासाठी एक उपचार म्हणून हा संदेश पाठवला जातो. उदा. फोन वरील संभाषण, अशा प्रकारचे कार्य करीत असते. “हॅलो, तब्येत कशी आहे?” “सर्व ठीक आहे ना?” अशा प्रकारच्या संभाषणावर भाषेचे संपर्कनिष्ठ कार्य करीत असते. सणांनिमित्त, वाढदिवस निमित्त शुभेच्छा भेट कार्ड दिले जातात.

या शुभेच्छा दोघांमधील संदेश संपर्कात्म कार्य करीत असतात. येथे संदेशाचा भर संपर्क साधक घटकांवर असतो.

संपर्कनिष्ठ कार्यांमध्ये संपर्क करणे महत्त्वाचे असते. दोन व्यक्तींमध्ये संपर्क कशा प्रकारचा होतो, हे महत्त्वाचे असते. प्रेषक व ग्रहणकर्ता यांच्या संपर्क प्रक्रिया घडत असते. भाषेच्या संपर्कनिष्ठ कार्यांमध्ये प्रेषक व ग्रहणकर्ता यांच्यातील संपर्क वाढविणे किंवा कमी करणे, ही प्रक्रिया घडत असते. संदेश न करणारी व्यक्ती कोणत्या संदर्भात बोलते हा महत्त्वाचा भाग असतो. उदा. जेव्हा एखादा डॉक्टर रोग्याशी संपर्क साधतो, तेव्हा रोग्यांसंबंधी सर्व माहिती घेतो, औषधे, गोळ्या, कुठला आहार घेतो, तसेच सवयी, व्यसने यांचा संदर्भ येतो. दुसऱ्या प्रवासाला निघालेले सहप्रवासी एकमेकांची ओळख काढतात. सुरुवात कुठे जाणार, कुठे उतरणार पासून सुरुवात होते. मग हळूहळू गप्पा मारायला लागतात. हे भाषेचे संपर्कनिष्ठ कार्य म्हणता येईल.

### १आ.४.२ परिणामनिष्ठ कार्य :

संदेश जेव्हा ग्रहणकर्ता या घटकावर लक्ष केंद्रित करतो तेव्हा भाषा प्रभावावर, परिणामनिष्ठ कार्य करु लागते. परिणामनिष्ठ कार्यांमध्ये ग्रहणकर्त्यांवर भाषा विशिष्ट परिणाम करीत असते. भाषेचे हे कार्य प्रेषकाकडून ग्रहणकर्त्यांकडे होत असते. यांमध्ये संदेशाचे वहन मानसिक पातळीवर होत असते. भाषेचा वापर ग्रहणकार्यांवर सकारात्मक आणि नकारात्मक या स्वरूपाचा परिणाम करण्यासाठी भाषा वापरली जाते. उदा. "जुने जाऊ द्या मरणालागुनि, जाळुनि किंवा पुरुनी टाका।" या संदेशात ग्रहणकर्त्याच्या भावनांना, मनाला आवाहन केले आहे. ग्रहणकर्त्यांच्या मनावर परिणाम करतात. म्हणून भाषा येथे परिणामनिष्ठ कार्य करते. ग्रहणकर्त्यांवर भाषेचा सकारात्मक किंवा नकारात्मक अशा स्वरूपाचा परिणाम करण्यासाठी भाषा कौशल्यपूर्ण रीतीने वापरली जाते. उदा. "आज माझा निकाल आहे". यामध्ये येथे परिणाम चांगलाही होऊ शकतो अथवा वाईट ही होऊ शकतो. येथे भाषा ग्रहणकर्त्यांवर परिणाम करणारे, प्रभाव पाडणारे कार्य करते.

भाषेचा वापर ग्रहणकर्त्यांवर संदेशाचे वहन मानसिक पातळीवर होत असते. उदा. एखादा कवि ऐतिहासिक कविता ऐकवित असेल, तेव्हा त्यात ऐतिहासिक संदर्भ, कालखंड, चित्रे, त्यावेळची परिस्थिती डोळ्यासमोर उभी करतो. श्रोता मानसिक पातळीवर त्या ऐतिहासिक कालखंडात जातात. त्या कालखंडाचे निसर्गरम्य, कल्पनारम्य, चित्र श्रोत्यांच्या डोळ्यासमोर उभे राहते. हा परिणाम भाषेचा आहे. म्हणून परिणामनिष्ठ कार्य भाषेद्वारे होत असते. वेगवेगळी पुस्तके, साहित्य, चित्रपट, नाटके, दूरचित्रवाणी याद्वारे होणारे भाषेचे कार्य हे परिणामनिष्ठ कार्य होते. तसेच वेगवेगळ्या चित्रफिती, जाहिराती, इतर माहिती इ. तून परिणामनिष्ठ कार्य भाषा करत असते. एखादा व्याख्याता एखादे व्याख्यान देतो, तेव्हा त्याच्या व्याख्यानातूनही श्रोत्यांवर / ग्रहणकर्त्यांवर परिणाम होत असतो. येथे भाषा वापराने ग्रहणकर्त्यांवर परिणाम घडवून आणणे, हे प्रयोजन असते. म्हणून परिणामनिष्ठ कार्य हे भाषेचे महत्त्वाचे कार्य आहे.

### १आ.४.३ संदर्भनिष्ठ कार्य :

संदेशन हे केवळ प्रेषक व ग्रहणकर्ता यांच्यापुरते मर्यादित नसते तर वर्ण्य विषयावर व भोवतालच्या परिस्थितीचाही संदर्भ असतो. येथे दोन व्यक्तींमध्ये संभाषण होते. संदर्भनिष्ठ कार्यांन आजूबाजूतील परिसरातील घटकांचा निर्देश किंवा वर्णन केलेले असते. संदेशन करणारी व्यक्ती कोणत्या संदर्भाने बोलते याला महत्त्व दिलेले असते. दोन व्यक्ती आपसांत संभाषण

करीत असतात, तेव्हा त्यांचे संभाषण दोघांमध्ये मर्यादित नसते, त्या संभाषणात कशाचा तरी संदर्भ हा नसतोच. तो संदर्भच महत्त्वाचा असतो. ठिकाण, कोण, कोणासाठी, कशासाठी यांस महत्त्व असते. येथे भाषा वाच्यार्थनिष्ठ किंवा संदर्भात्मक कार्य करते. वाच्यार्थ्यांला महत्त्व असते. येथे वाच्यार्थाच्या आश्रयाने विषयाचे व विषयाभोवतालच्या भौगोलिक, कालिक, मानसिक संदर्भाच्या वस्तुनिष्ठ, यथार्थ माहिती व ज्ञान करुन देते. उदा. दवाखान्यात डॉक्टरच्या संभाषणात हॉस्पीटल, औषधे, गोळ्या, शस्त्रक्रिया, पेशंट, रोगी, वेगवेगळे आजार इ. संदर्भात उल्लेख असतोच. तसेच शेतकऱ्यांच्या संभाषणात शेती, शेतीची अवजारे, पाऊस, खत, हवामान, बियाणे, पिके इ. चा संदर्भ हा असतोच. जसे व्यवसाय तशा स्वरूपाचे संभावत होत असते. म्हणून व्यवसाय, उद्योग, व्यापार, राजकारण, समाज, शिक्षणक्षेत्र इ. चे संभाषण आपआपल्या संबंधित क्षेत्राशी असते. म्हणून भाषा संदर्भनिष्ठ कार्य करत असते.

### १आ.४.४ आविष्कारात्मक कार्य :

भाषेच्या या कार्यांमध्ये आपल्या मनातील भावनाविचार, कल्पना, गुपिते इतरांना सांगावी लागतात. कारण आत्मप्रकटीकरण ही मानवाची नैसर्गिक गरज आहे. आविष्कार म्हणजे व्यक्त होणे होय. उक्ती जेव्हा वक्त्यावर लक्ष केंद्रित करते तेव्हा भाषा भावनात्मक किंवा आविष्कारक कार्य करु लागते. उदा. "दिवस कसा  आनंदी आहे" या उक्तीकडे वक्त्याच्या अंगाने पाहता दिवसाच्या हवामान बदलाच्या त्याच्या मनातील आनंद, प्रेम, प्रफुल्लित इ. भावना तीन आविष्कृत झाल्याचे दिसून येते. म्हणून येथे भाषा आविष्कारक कार्य करते. समाजात प्रत्येक व्यक्ती व्यक्त होत असते. मानव हा बोलणारा प्राणी आहे. मनात आलेले विचार बोलून दाखवत असतो. व्यक्त होणे हे भाषेचे प्राथमिक कार्य आहे. समाज व्यवहारातील अविष्कार हा अर्थ येथे अपेक्षित आहे. रोमान याकोबसनला साहित्यातील आविष्कार येथे मान्य नाही. म्हणून भाषेद्वारे व्यक्त होणे यास येथे महत्त्व आहे. यालाच याकोबनसन भाषेचे आविष्कारात्मक कार्य असे म्हणतो.

### १आ.४.५ काव्यात्म किंवा सौंदर्यात्मक कार्य :

काव्यात्म भाषेच्या कार्यांमध्ये संदेश हा घटक महत्त्वाचा असतो. सौंदर्यात्मककार्यांत संदेशन अथवा आशयाला विशेष महत्त्व नसते. संदेश जेव्हा स्वतःवरच आपले लक्ष केंद्रित करते किंवा स्वतःकडे वाचकाचे लक्ष घेते तेव्हा भाषा काव्यात्म कार्य करु लागते. केंद्रस्थानातील संदेश हा घटक स्वयंमेव संदेशनाचे उद्दिष्ट बनतो. त्याला इतर कोणतेही उद्दिष्टे नसतात. तोच संदेश इतर कोणत्याही प्रकारे भाषेच्या या कार्यांमध्ये पाठवता येत नाही. भाषेच्या या कार्यांमध्ये जो आशय तोच संदेश अथवा शैली नसते. साहित्यात सौंदर्यनिर्मिती होत असते. ध्वनिसंकेताने साहित्याची भाषा कार्य करीत असते. हे कार्य साधण्यासाठी भाषेतील शब्दध्वनी, प्रत्ययांचे भाषिक रूढ नियमापेक्षा वेगळ्या पद्धतीने उपयोजन केले जाते. त्यामुळे भाषेला एक वेगळा आशय प्राप्त होतो. अशा वेळी साहित्यिक नवीन शब्द तयार करुन त्या शब्द प्रतिमांच्या साहाय्याने वेगळा असा सौंदर्यात्मक अर्थ प्रकट करतो. उदा. पंचरली रात्र, पतंगावे इ. तसेच काही वाक्यरचना ही उदाहरणादाखल बघता येतील. तसेच भाषेच्या या कार्यांमध्ये जो आशय तोच संदेश अथवा शैली असते. उदा. "दिवस कसा उदास आहे." यात 'स' या वर्णांची पुनरावृत्ती साधून नादसौंदर्य निर्माण करते. तसेच अर्थांच्या स्तरावर 'उदास' हा मानवी भावनेचा गुणधर्म अमानवी 'दिवसाला' लावला आहे. म्हणून यात भाषा काव्यात्म कार्य करते. भाषित (संदेश) स्वतःवरच लक्ष केंद्रित करते किंवा स्वतःकडे ग्रहणकर्त्यांचे लक्ष वेधून घेते, तेव्हा भाषा काव्यात्म किंवा सौंदर्यात्मक कार्य करु लागते. उदा. "नदी दुधासारखी फेसाळलेली आहे." येथे उक्तीवर किंवा संदेश वर लक्ष केंद्रित झालेली असून "दुधासारखी फेसाळलेली" हा शब्द आपले

लक्ष वेधून घेते. या संदेशनात शब्दवक्रतेमुळे वाचकाचे लक्ष वेधले जाते आणि म्हणूनच येथे भाषा काव्यात्म किंवा सौंदर्यात्मक कार्य करते.

**१आ.४.६ भाषाविषयक किंवा अतिभाषात्म कार्य :**

भाषा विषयक या कार्यांतून आपण भाषेचे जतन करणे, ज्ञान मिळविणे, संस्कृती जतन करणे ही कार्य भाषेच्या माध्यमातून होतात. आपणास अभ्यास देखील भाषेतूनच करावा लागतो. आपली शिकण्याची प्रक्रिया देखील या भाषेद्वाराच होत असते. कोणतेही ज्ञान आपण भाषेमार्फतच होत असतो. भाषेचे स्वरूप, वैशिष्ट्ये, लक्षणे ही भाषेतूनच शिकत असतो. भाषा म्हणजे काय? याचे उत्तर आपण भाषेतूनच देतो. भाषेची संरचना, भाषिक व्यवहार, घटकांची चर्चा, भाषाशैली इ. भाषेच्या सहाय्यानेच करावी लागते. भाषेच्या या कार्यांस अतिभाषात्म कार्य किंवा भाषाविषयक कार्य म्हणतात.

वरील प्रमाणे रोमान याकोबसनने भाषेची सहा कार्य सांगितली आहेत.

## १आ.५ सारांश :

भाषेचे सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे संज्ञापन करणे, भाषेचे प्रामुख्याने मौखिक संदेश वहन करणे हेच आदय कार्य आहे. भाषा केवळ विचार विनिमयाचे साधन नसून, विचार करण्याचेही साधन आहे. त्यामुळे ज्ञाननिर्मिती, ज्ञान रक्षण, ज्ञानसंवर्धन याकरिता भाषा उपयुक्त ठरते. आपली संस्कृती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत संक्रमित केली. भाषा ही प्रत्येक समाजाच्या संस्कृतीचा भाग आहे. समाजाच्या परंपरा, श्रद्धा, ज्ञान इ. कार्य भाषेमुळेच होते. म्हणून भाषा हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. भाषा हे संस्कृती संरक्षण - विकासाचे साधन आहे. त्याचे जतन भाषा करीत असते. म्हणून व्यक्ती व समाज जीवनात भाषेचे स्थान अनिवार्य आहे. भाषा व विचार यांचा अतूट संबंध असल्याने भाषेशिवाय विचार करणे अशक्य आहे.

आत्मनिवेदन आणि आत्मप्रकटीकरणाचे महत्त्वाचे साधन म्हणजे भाषा होय. शिक्षण, समाजकारण, राजकारण, दैनंदिन जीवनप्रणाली इ. सर्व भाषेच्या माध्यमातूनच होते. भाषेचे कार्य संदेशन किंवा संप्रेषण व्यवहार सुरळीत पार पाडणे हे आहे. म्हणूनच भाषा ही एक सामाजिक संस्था आहे.

भाषा कोणकोणती कार्य करते याचा विचार आपण वरीलप्रमाणे विस्ताराने केला आहे.

## १आ.६ शब्दकोश

- संप्रेषण क्षमता - भाषा प्रत्यक्ष वापरण्याचे कौशल्य
- भाषाव्यवहार - भाषेचा प्रत्यक्ष वापर
- प्रेषक - बोलतारा
- ग्राहक - संदेशाचे ग्रहण करणारा

- भाषाग्रहण - भाषा आत्मसात करण्याची प्रक्रिया
- भाषा व्यवस्था - नियम बद्ध भाषेची रचना
- सामाजिक संस्था - समाजातील योग्य व्यवस्था
- संप्रेषण - इंद्रियगोचर साधनांच्या आधारे होणारी इच्छा व्यक्त करणे, आज्ञा करणे, माहिती पुरविणे, संदेश देणे, मत देणे, इ. स्वरूपाच्या दोन परस्पर भिन्न बाजूंमधली क्रिया - प्रतिक्रिया म्हणजे संज्ञापन अथवा संप्रेषण होय.

## १आ.७ संदर्भ ग्रंथ

१. कृ.न. कुलकर्णी - मराठी भाषा उद्‌गम आणि विकास
२. प्र. न. जोशी - सुबोध भाषाशास्त्र, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे
३. श्री. न. गजेंद्रगडकर - भाषा आणि भाषाशास्त्र
४. डॉ. अनिल गवळी - भाषा विज्ञान आणि मराठी व्याकरण
५. डॉ. स.ग. माळशे - भाषाविज्ञान परिचय
डॉ. द.री. पुंड
डॉ. अंजली सोमण
६. ना. गो. कालेलकर - भाषा आणि संस्कृती

## १आ.८ आदर्श प्रश्नसंच

१) भाषेची विविध कार्ये लिहा.
२) भाषेच्या विविध व्याख्या सांगून भाषेची कार्ये स्पष्ट करा.
३) भाषा म्हणजे काय ? ते सांगून भाषेची कार्ये स्पष्ट करा.
४) टीपा लिहा.
अ) भाषेची विविध कार्ये
ब) रोमान याकोबसनकृत भाषेचे मूलघटक

❖❖❖❖

# २अ

# भाषा, समाज आणि संस्कृती परस्पर संबंध

**घटक रचना :**

२अ.० उद्दिष्टे

२अ.१ प्रस्तावना

२अ.२ विषय विवेचन

२अ.२.१ भाषा एक सांस्कृतिक संचित

२अ.२.२ संस्कृती संकल्पना

२अ.२.३ समाज संकल्पना

२अ.२.४ सपीर - वोर्फ यांचा भाषिक सापेक्षतावादाचा सिद्धांत

२अ.२.५ भाषा आणि समाज भाषा विज्ञान

२अ.२.६ भाषा वैविध्य आणि भाषिक बहुजिनसीपणा

२अ.२.७ भाषाद्वित्व संकल्पना

२अ.२.८ भाषिक - सांस्कृतिक विविधता

२अ.२.९ भाषा, समाज, संस्कृती यातील परस्पर संबंध

२अ.३ समारोप

२अ.४ प्रश्नावली

२अ.५ संदर्भग्रंथ सूची

## २अ.० उद्दिष्टे

- भाषा, समाज आणि संस्कृति या संकल्पना समजून घेणे.
- सपीर - वोर्फ यांचा भाषिक सापेक्षतावाद सिद्धांत अभ्यासणे.
- भाषेकडे पाहण्याचा समाज भाषावैज्ञानिक दृष्टिकोन अभ्यासणे.
- समाजातील भाषावैविध्य, भाषेचा बहजिनसीपणा संकल्पना अभ्यासणे.
- भाषाद्वित्व संकल्पना समजून घेणे.
- भाषा, समाज आणि संस्कृती यांचे परस्परसंबंध अभ्यासणे.

## २अ.१ प्रस्तावना

भाषा हे जीवन व्यवहाराचे प्रभावी माध्यम आहे. मानवी समाज व भाषा यांचा संबंध अतूट असतो. स्वत:ची भाषा किंवा बोली नाही असा एकही मानवी समाज आढळणार नाही. मानवी समाजात वाढलेला आणि शारीरिक किंवा मानसिक व्यंग नसणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला एकतरी भाषा बोलता येते. भाषा येणे हे सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेचे अविभाज्य अंग आहे. भाषेमुळे संदेशन वा संप्रेषण शक्य होते. भाषा ही मानवी जीवनाला वेढून टाकणारी व मानवी संस्कृतीला पायाभूत ठरलेली अशी गोष्ट आहे. मानवी जीवनाला भाषेशिवाय अर्थ नाही. भाषा ही मानवाला मिळालेली फार मोठी देणगी आहे. भाषा ही मानवनिर्मित असून ती मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात भाषेचे असित्त्व जाणवते. भाषेच्या माध्यमातूनच माणूस जीवन व्यवहार करीत असतो. मानव आपल्या भावभावना भाषेतून व्यक्त करत असतो. तो भाषेद्वारे प्रेम व्यक्त करतो, निर्देश करतो, वर्णन करतो, आज्ञा देतो, विचार करतो, कविता लिहितो, तसेच खोटेही बोलतो, संताप व्यक्त करतो, कधी रागावतो, चिडतो, आनंद व्यक्त करतो, अशाप्रकारे भाषेचे अनेक उपयोग आपण करत असतो. माहिती, ज्ञान, विचार, अनुभव, भावना, कल्पना यांची देवाणघेवाण भाषेद्वारे होते. भाषेद्वारे माणसे एकमेकांशी संपर्क साधतात. एकमेकांना समजून घेतात. समाज व्यवहाराचे सर्वश्रेष्ठ साधन म्हणून भाषा पाहता येते. समाजातील व्यक्तींबरोबरचे आपले बहुतेक वागणे भाषेच्या माध्यमातून घडते आणि भाषेमुळेच हे सर्व शक्य होते. भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. मानवी जीवनात आमूलाग्र बदल घडवण्याचे सामर्थ्य फक्त भाषेत आहे.

संस्कृतमधील 'भाष्' या धातूपासून 'भाषा' या शब्दाचा उगम झाला आहे. 'भाष्' म्हणजे 'बोलणे' आणि म्हणून भाषा म्हणजे जी बोलले जाते ती. भाषा म्हणजे वाणीचे व्यक्त रूप अशी कल्पना पूर्वापास चालत आलेली आहे. इंग्रजीमध्ये भाषा या शब्दासाठी Language असा शब्द वापरला जातो. या शब्दाचा उगम Lingua या लॅटिन शब्दातून झाला आहे. Lingua याचा अर्थ Speech म्हणजे बोलणे असा होतो. म्हणून Language या शब्दाचा अर्थ भाषा, म्हणजे जी बोलली जाते ती होय.

या आधारे आपल्याला भाषेची पुढीलप्रमाणे व्याख्या करता येईल -
'मानवी मुखातून निघालेल्या सार्थ ध्वनींचा समूह म्हणजे भाषा होय.'

भाषा, समाज आणि संस्कृती यांच्या संदर्भात असे म्हणता येईल की, मानवी जीवनाचा अपरिहार्य भाग म्हणून या संज्ञा परस्परपूरक आहेत. मानवी जीवनाला व्यक्त करण्याचे सामर्थ्य भाषेत आहे. भाषा, समाज, संस्कृती यांचा अन्योन्य संबंध असतो. कला आणि साहित्याचा विकास भाषेच्या आधारे झाला. भाषेने मानवाचे जीवन वेढून टाकले. भाषा हे समाजाचे, संस्कृतीचे एक अविभाज्य अंग आहे. या अंगाचा अभ्यास करताना समाज ही संकल्पना समजून घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. समाज म्हणजे मानवाचा समूह इतक्या मर्यादित अर्थाने समाजाची व्याख्या करता येणार नाही. मानवेतर जीव देखील समुहात्मक पद्धतीने जगतात. मानव देखील समाजाची निर्मिती करुन जीवन जगत राहतो. मात्र मानवेतर समाजाची निर्मिती मूलभूत जैविक प्रेरणेतून झालेली आहे. तर मानवाची समाजनिर्मिती मागची प्रेरणा इतकी मर्यादित नसते. मानव आपल्या कौशल्याचा उपयोग करुन जीवनासाठी पूरक जीवनपद्धती निर्माण करत असतो. ही

जीवन पद्धती म्हणजे त्याची संस्कृती होय. भाषा आणि समाज, भाषा आणि संस्कृती यांचा परस्परपूरक संबंध आहे.

## २अ.२ विषय विवेचन

भाषा, समाज आणि संस्कृती यांचा परस्परसंबंध कसा असतो, हे समजून घेण्यासाठी भाषा एक सांस्कृतिक संचित, संस्कृती संकल्पना, समाज संकल्पना, सपीर-वोर्फ यांचा भाषिक सापेक्षतावादाचा सिद्धांत, भाषा आणि समाज भाषाविज्ञान, भाषावैविध्य आणि भाषिक बहुजिनसीपणा, भाषाद्वित्वया संकल्पनांचा अभ्यास या प्रकरणामध्ये करावयाचा आहे.

**२अ.२.१ भाषा एक सांस्कृतिक संचित :**

माणूस हा समाजशील प्राणी आहे. माणूस समाजाकडून भाषा शिकत असतो. मानवी जीवनात भाषेचे कार्य महत्त्वपूर्ण असते. भाषेच्या जडणघडणीत संस्कृतीचा वाटा महत्त्वपूर्ण आहे. भाषा आणि संस्कृती यांचा परस्पर संबंध असतो. प्रत्येक समाजाच्या रुढी, परंपरा, प्रथा, चारीरिती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे भाषेच्या माध्यमातून पाठवले जातात. संस्कृती माणसावर अनेक प्रकारचे संस्कार करते. संस्कृती माणसाला चांगल्या सवयी लावत असते. हे संस्कार भाषेच्या माध्यमातून होत असतात. मानवाच्या जडणघडणीमध्ये जशी भाषा महत्त्वाची आहे, अगदी त्याचप्रमाणे माणसाच्या जडणघडणीमध्ये संस्कृती सुद्धा फार महत्त्वाची आहे. आपल्या संस्कृतीमध्ये अनेकविध गोष्टी आहेत आणि अनेकविध गोष्टी हा त्या भाषेचा ठेवा असतो, त्या भाषेचा संचित असतो. कारण जे संस्कृतीने आपल्याला दिलेले आहे ते भाषेमध्ये आलेले असते आणि संस्कृतीमध्ये ज्या गोष्टी असतात त्या पुढील पिढीकडे पाठवण्याचे काम भाषा करीत असते. म्हणून माणसाच्या जीवनामध्ये भाषा हा महत्त्वाचा घटक आहे.

संस्कृतीमध्ये जे जे आहे ते सर्वच्या सर्व भाषेमध्ये सामावलेले आहे. मानवाच्या जीवनामध्ये आतापर्यंत ज्या गोष्टी आलेल्या आहेत, त्याने ज्या गोष्टी प्राप्त केल्या आहेत त्या संस्कृतीने आपल्याला दिलेल्या आहेत. म्हणून मानवाची संस्कृती टिकवायची असेल तर भाषा महत्त्वाची ठरते. भाषा ही संस्कृती वाहक असते. भाषा ही संस्कृतीला एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे, दुसऱ्या पिढीकडून तिसऱ्या पिढीकडे वाहून नेण्याचे काम करत असते. भाषेचे हे काम अखंडपणे सुरुच असते. प्रत्येक समाजाचे हे संचित आहे, जी संपत्ती आहे, जी मालमत्ता आहे ती पुढील पिढ्यांकडे घेऊन जाण्याचे कार्य भाषा करत असते. म्हणून भाषा एक सांस्कृतिक संचित आहे.

अशाप्रकारे मानवी जीवनात भाषा एक सांस्कृतिक संचित आहे. संस्कृतीतून मानवाला अनेकविध गोष्टी भाषेच्या माध्यमातून प्राप्त होतात. माणसाला समाजात राहणे सामाजिक संस्था निर्माण करणे आणि संस्कृतीचा विकास करणे भाषेमुळेच शक्य झाले. भाषेशिवाय संस्कृती नाही आणि संस्कृती शिवाय भाषा नाही. भाषा ही संस्कृतीची वाहक असते. सामाजिक-सांस्कृतिक संचित एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे पाठवण्याचे कार्य भाषा करते. भाषा आणि संस्कृती यांचा अनुबंध असतो.

## २अ.२.२ संस्कृती संकल्पना :

संस्कृती हा शब्द 'संस्कार' या शब्दापासून आला आहे. संस्कार हा कुटूंबातून, समाजातून होतो, तसेच भाषेतूनही होतो. संस्कृतीमध्ये समाज आहे. त्यामुळे संस्कृतीचे संवर्धन करण्याचे सामर्थ्य समाजात आहे. तर समाजाचे संवर्धन करण्याचे सामर्थ्य भाषेत आहे. वैशिष्ट्यपूर्ण जीवनपद्धती म्हणजे संस्कृती होय. मानवाचे आचार-विचार, कला, सण, उत्सव, रूढी-परंपरा, श्रद्धा अंधश्रद्धा इत्यादी घटक संस्कृतीमध्ये येतात. समाजामध्ये असलेली ही संस्कृती साहित्यामध्ये मांडली जाते. साहित्यनिर्मिती हा मानवाच्या सामाजिक जीवनाचा एक सांस्कृतिक उपक्रम आहे तसेच जो संस्कृतीचा एक घटक आहे. साहित्याचा आणि समाज संस्कृतीचा फार निकटचा संबंध असतो. साहित्य हा एक या संस्कृतीचाच भाग आहे.

संस्कृती म्हणजे विशिष्ट काळातील विशिष्ट समाजाची जगण्याची विशिष्ट रीती किंवा पद्धती होय. या पद्धतीत धर्मकल्पना, आचार-विचार, रूढी, परंपरा, तत्त्वप्रणाली संकेत, शिष्टाचार, प्रतिमा, प्रतीके, भाषा, कला, साहित्य, इतिहास, विज्ञान, श्रद्धा या साऱ्यांचा अंतर्भाव होतो. थोडक्यात भाषा, समाज आणि संस्कृती यांचा संबंध घनिष्ठ असतो. समाजाचे स्वरूप व्यापक आणि अत्यंत गुंतागुंतीचे आहे. समाजाचे आणि संस्कृतीचे स्वरूप साहित्यात अबाधित असणे हे समाजाच्या जिवंतपणाचे लक्षण मानावयास हरकत नाही.

**संस्कृती व्याख्या :**

- 'संस्काराने ज्याची सिद्धी होते त्यास संस्कृती म्हणतात.'
- 'संस्कृती म्हणजे मानवाचा समग्र आचार, विचार आणि व्यवहार होय.'

**संस्कृतीचे प्रकार :**

i) भौतिक संस्कृती
ii) अध्यात्मिक संस्कृती

### i) भौतिक संस्कृती :

मानवाचे जीवन सुखकर व सुसह्य होण्यासाठी ज्या भौतिक गोष्टींची आवश्यकता असते त्यास भौतिक संस्कृती असे म्हणतात. उदा. घर. भांडीकुंडी, कपडे, दागदागिने, खाद्यपदार्थ इ.

### ii) अध्यात्मिक संस्कृती :

मानवी मनाला अधिक समृद्ध आणि अधिक सक्षम करण्यासाठी ज्या गोष्टीची गरज असते त्यास अध्यात्मिक संस्कृती असे म्हणतात. उदा. धर्म, तत्त्वज्ञान, विद्या, कला, साहित्य, मूल्य, श्रद्धा या गोष्टींमुळे मानवावर अध्यात्मिक संस्कार होतात.

## २अ.२.३ समाज संकल्पना

एका विशिष्ट विचाराने, ध्येयाने एकत्र आलेल्या समुहाला समाज म्हणतात. साहित्य ही समाजाची अभिव्यक्ती असते. साहित्यात येणारे विषय, मानवी जीवनाविषयीचे प्रश्न, मानवी धर्म, जीवनाविषयीच्या ध्येय कल्पना हे सर्वसंदर्भ भोवतालच्या समाजाशी निगडीत असतात. समाज ही एक व्यापक संकल्पना आहे. मानवी समूह, जात, धर्म अशा अनेक अर्थाने समाज हा शब्द

व्यवहारात वापरला जातो. समाज बनण्यासाठी लोकांमध्ये संबंधांची विशिष्ट प्रकारची व्यवस्था असते. समाज म्हणजे संबंधांचे विविध पदरी जाळे असते. समाज म्हणजे केवळ व्यक्तीचा समूह नसतो, तर त्यात संबंधांची व्यवस्था असते. समाजामधील माणसांमध्ये जन्मापासून ते मृत्यूपर्यंत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध जोडलेले असतात. मानव हा एक सामाजिक प्राणी आहे.

थोडक्यात, समाज हा एका अर्थी साहित्यनिर्मितीचे कारण आहे. सामाजिक संबंधांचे जाळे म्हणजे समाय होय. विशिष्ट भौगोलिक परिस्थितीत स्थायिक झालेल्या लोकांचा गट, त्यामध्ये असलेले सुख-दुःख, आचारविचार म्हणजे समाज होय. यावरुन समाजाची काही लक्षणे सांगता येतात. ती पुढीलप्रमाणे -

- विशिष्ट भूप्रदेश
- लोकसंख्या
- प्रजोत्पादन
- सर्वसमावेशक संस्कृती

समाज आणि साहित्याचा एक पद्धतशीर अभ्यास फ्रेंच विचारवंत हिप्पोलीन तेन याने प्रथम केला. तेनच्या मते, कोणत्याही भाषेतील साहित्य हे वंश (Pace), परिस्थिती (Mileu), युगप्रवृत्ती (Manent), या तीन घटकांचा परिणाम असते. साहित्याचा सारा व्यापार देशकाल परिस्थितीने, वंश, परिस्थिती, युगप्रवृत्ती यांनी प्रेरित, प्रवाहित आणि नियंत्रित होतो. साहित्य हे विशिष्ट सामाजिक परिस्थितीचे अपत्य असते; मोती आणि शिंपला यांच्या संबंधांसारख्या हा संबंध असतो, असा विचार तेन यांने मांडला.

### २अ.२.४ सपीर - वोर्फ यांचा भाषिक सापेक्षतावादाचा सिद्धांत :

एडवर्ड सपीर आणि त्याचा वोर्फयांनी भाषा आणि संस्कृती यांच्या संबंधांना महत्त्व दिले. भाषिक सापेक्षतावादाचा सिद्धांत एडवर्ड सपीर आणि त्याचा शिष्य बेन्जामिन वोर्फ यांच्या संशोधनातून निर्माण झाला. हा सिद्धांत 'सपीर - वोर्फ हायपोथिसिस' म्हणून ओळखला जातो. आधि सपीरने १९२९ मध्ये भाषिक सापेक्षतावाद ही संकल्पना मांडली आणि नंतर वोर्फने १९५६ मध्ये ही संकल्पना मांडली. दोघांनी मांडलेल्या या संकल्पनेला सपीर - वोर्फ यांचा अभ्युपगम असे म्हटले जाते.

भाषाही अखंड प्रवाहासारखी विविध वळणे घेत घेत पुढे जात असते. ती सतत प्रवाही असते. म्हणूनच भाषा हे वास्तव आहे. भाषा बदलली की वास्तव बदलते अशी धारणा असणारा भाषिक सापेक्षतावादाचा सिद्धांत समाज भाषाविज्ञानात प्रसिद्ध आहे. भाषा आणि वास्तव या संबंधीचा हा महत्त्वपूर्ण सिद्धांत आहे. या सिद्धांतापूर्वी असे मानले जायचे की, भाषा पूर्व आणि भाषाबाह्य असे काही वास्तव असते आणि त्यांचे वर्णन भाषा करत असते. या भूमिकेवर सपीर आणि वोर्फ यांनी आक्षेप घेतला. त्यांच्या मते, भाषापूर्व आणि भाषाबाह्य असे कोणतेही वास्तव नसते. मानवी अनुभव भाषेनुसार बदलत असतो. भाषा बदलली की वास्तव बदलते. भाषा हे केवळ वर्णन करण्याचे साधन नाही. वास्तवाच्या अनुभवावर भाषेचा खोलवर परिणाम होत असतो. वास्तवाच्या या अनुभवामुळे भाषेला आकार येत असतो. आपल्या अनुभवातील वर्गीकरणे ही भाषेने दिलेली वर्गीकरणे असतात. भाषेने दिलेल्या संकल्पनांच्या आधारे माणूस अनुभव घेत असतो. माणसाचे ान हे भाषा धिष्ठित असते.

सपीर आणि वोर्फ यांनी भाषा आणि संस्कृती यांच्या संबंधाला महत्त्व दिले. स्वतःच्या व्यावसायिक अनुभवातून भाषेने व्यक्तीचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन तयार होतो असा निष्कर्ष बेन्जामिन वोर्फ याने काढला. समाजाच्या भाषिक सवयींनी मानवाच्या जीवनविषयक दृष्टिकोन नियंत्रित होतो. त्यामुळे कोणत्याही समाजची जडणघडण त्या समाजाच्या भाषिक सवयीवरुन लक्षात येते. महाराष्ट्रामध्ये अनेक जाती जमातींचे लोक राहतात. जातींमध्ये पुन्हा विविध पोटजाती दिसतात. त्यांचे रितीरिवाज, परंपरा, श्रद्धा यामध्ये स्वतःचे निराळेपण त्यांनी जपलेले दिसते. समाजाच्या जीवनसरणीचा भाषेवर खोलवर परिणाम झालेला दिसतो. माणसाच्या जाणिवा, भावना, दृष्टिकोन, आचार विचार, वर्तन, अपेक्षा भाषेने नियंत्रित होत असतात. म्हणजेच मानवी विचार, संकल्पना, अनुभव या गोष्टी भाषासापेक्ष असतात.

सपीर - वोर्फ यांच्या भाषिक सापेक्षतावाद या सिद्धांताविषयी आपले मत नोंदवताना डॉ. मिलिंद मालशे म्हणतात, मानवी जाणिवा, भावना, आचारविचार, रूढी, परंपरा, दृष्टिकोन यांच्यावर भाषेचा खोलवर परिणाम घडत असतो. हे सपीर - वोर्फ यांच्या सिद्धांताचे सूत्र आहे.

### २अ.२.५ भाषा आणि समाज भाषा विज्ञान :

मानवाला भाषा समाजाच्या संदर्भात शिकावी लागते. समाजामध्ये इतरांचे ऐकून आपण भाषा शिकत असतो. लहान मुले ज्या समाजात वाढतात त्या समाजाची भाषा ते शिकतात. भाषा हा समाजातल्या माणसांना जोडणारा एक दुवा असतो. मानवी जीवनाला गतिशील बनवण्याचे कार्य भाषा करत असते. समाजामध्ये संप्रेषणाचे प्रमुख साधन म्हणून भाषा वापरली जाते. त्यामुळे सामाजिक - सांस्कृतिक व्यवहारातील भाषा ही एक प्रमुख प्रक्रिया आहे. भारतात वेगवेगळ्या जातीचे, वेगवेगळ्या धर्माचे, वेगवेगळ्या भाषेचे लोक राहतात. भाषेमध्ये जे जे भेद आहेत त्या भेदांचा अभ्यास समाज भाषाविज्ञान करते. भाषा व्यवहारामध्ये शब्दांना प्राप्त होणारे अर्थ हे समाजाकडून प्राप्त झालेले असतात. त्यामुळे त्या अर्थाचे अन्वयार्थ समाजाच्या संदर्भातच करावे लागतात. त्याचबरोबर धातू, धातूला लागणारे प्रत्यय, सर्वनाम, विशेषण, क्रियापदे अन्वये यांचाही विचार सामाजिक संदर्भाच्या आधाराने केला जातो.

भाषा आणि समाज यांच्यामध्ये असणाऱ्या संबंधांचा अभ्यास समाज भाषाविज्ञानामध्ये केला जातो. भाषा हे समाज व्यवहाराचे माध्यम आहे. या व्यवहारामधूनच भाषेची व्यवस्था आकाराला येते. समाजामध्ये सर्वत्र वेगवेगळ्या भाषा वापरल्या जातात. म्हणूनच जगभरात शेकडो भाषा प्रचलित झालेल्या आपल्याला दिसतात. भाषेच्या या विविध भाषिक रूपांमागे भौगोलिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थिती कारणीभूत असते. त्यामुळे भाषेचा आणि भाषा व्यवहाराचे अभ्यास या संदर्भातच करावा लागतो. भाषांकडे पाहण्याचा हा नवा दृष्टिकोन समाज भाषाविज्ञानाने दिला.

### २अ.२.६ भाषा वैविध्य आणि भाषिक बहुजिनसीपणा :

भारतीय समाज हा बहुभाषिक समाज आहे. तरी देखील या बहुभाषिक असलेल्या भारतीय समाजामध्ये सामाजिक - सांस्कृतिक ऐक्य दिसून येते. कोणत्याही समाज व्यवस्थेला वैचारिक आणि बौद्धिक अधिष्ठान प्राप्त करुन देण्याचे कार्य भाषा करत असते. कोणतीही मानवी भाषा ही एकाच प्रकारचे सामाजिक कार्य करीत नाही, तर सामाजिक व्यवहारात भाषेला असंख्य स्वरूपाची कार्य करावी लागतात. उदा. वर्णन, विश्लेषण, स्तुती, निंदा, अपमान, विनंती, आज्ञा अशा असंख्य गोष्टी मानव भाषेतून पूर्ण करीत असतो. यालाच भाषेचा बहुजिनसीपणा म्हणतात.

भाषेच्या या बहुजिनसीपणाला नोम चॉम्स्कीने विरोध केला. चॉम्सकीने एक संकल्पना मांडली. तो म्हणतो, भाषा बहुजिनसी नसून ती एकसंघ असते. त्याच्या मते, भाषिक प्रयोग आणि भाषिक क्षमता यांच्यामध्ये भेद आहे. भाषेचा प्रत्यक्ष वापर म्हणजे 'भाषिक प्रयोग' होय. तर भाषा आकलन करुन घेण्याची, समजून घेण्याची जी क्षमता असते, ती क्षमता म्हणजे 'भाषिक क्षमता' होय. चॉम्स्कीच्या 'भाषा एक संघ असते' या विधानाला समाज भाषाविज्ञानाने ठाम विरोध केला. समाज भाषा विज्ञानाच्या अनुसार भाषा एकजिनसी नसून ती बहुजिनसी असते. भाषा समाजामध्ये विविध पातळीवर वापरली जाते. कोणतीही मानवी भाषा एक प्रकारचे सामाजिक कार्य करत नाही तर ती वेगवेगळ्या प्रकारचे सामाजिक कार्य करत असते. आपल्या मनातील भावना, विचार, कल्पना व्यक्त करणे अशा असंख्य गोष्टी आपण भाषेद्वारे करत असतो.

भारतात वेगवेगळ्या जाती, धर्माचे, भाषेचे लोक राहतात. भाषेच्या भेदामधून सामाजिकता प्रकट होत असते. समाजातील विविध स्तर, लिंगभेद, जातिभेद, आर्थिक स्तर आणि प्रादेशिक भेद हे भाषेतूनच प्रकट होत असतात. प्रत्येक व्यक्ती आपापल्या गरजेनुसार भाषा वापरत असते. भाषा वापरणाऱ्या प्रत्येकाकडून भाषेचा बहुजिनसीपणा दिसून येतो.

### २अ.२.७ भाषाद्वित्व संकल्पना :

प्रत्येक भाषेचे दोन प्रकार पडतात. एकाच भाषेचे दोन प्रकार एकाच प्रांतात एकाच वेळी कार्यरत असतात यालाच 'भाषाद्वित्व' असे म्हणतात. भाषाद्वित्व ही संकल्पना फर्ग्युसन या सामाजिक भाषा वैज्ञानिकाने वापरली आहे. भाषेच्या दोन प्रकारांना फर्ग्युसनने उच्चस्तर आणि निम्नस्तर अशी नावे दिली.

i) **उच्चस्तर (High Level) :**

भाषेचा उच्चस्तर शैक्षणिक, साहित्यिक, धार्मिक क्षेत्रात वापरला जातो. भाषेचा उच्चस्तर औपचारिक संदर्भात वापरला जातो. हा उच्चस्तर मुद्दाम शिकावा लागतो.

ii) **निम्नस्तर (Low Level) :**

भाषेचा निम्नस्तर दैनंदिन व्यवहार, मित्र, नोकर यांच्यासाठी संभाषण करताना वापरला जातो. भाषेचा निम्नस्तर अनौपचारिक संदर्भात वापरला जातो. हा निम्नस्तर ऐकून ऐकून किंवा नैसर्गिकपणे शिकता येतो.

### २अ.२.८ भाषिक - सांस्कृतिक विविधता :

भाषा आणि संस्कृती यांचा अनुबंध असतो. प्रत्येक समाजाची भाषा वेगळी असते, तसेच प्रत्येक समाजाची भिन्न भिन्न संस्कृती असते. आपल्या भारताचा विचार करायचा झाला तर, भारतामध्ये विविध धर्माचे, विविध जातींचे, विविध भाषा बोलणारे लोक राहतात. भारत हा जगातील सर्वात मोठा बहुभाषिक देश आहे. भारतातील प्रत्येक राज्याची आपली स्वतःची राज्य भाषा आहे. तसेच असंख्य बोली भाषा भारतात बोलल्या जातात. या भाषा त्या त्या प्रदेशाचे प्रतिनिधित्व करीत असतात.

प्रत्येक समाजाची स्वतःची संस्कृती असते. सण, उत्सव, रूढी-परंपरा, कपडे, दागदागिने, श्रद्धा, खाद्यपदार्थ, वस्तू, रितीरिवाज, कला, साहित्य यातून सांस्कृतिक विविधता दिसून येते. संस्कृतीचे जतन, संवर्धन आणि संक्रमण भाषेमुळे होत असते. व्यवसाय, शिक्षण अथवा इतर कोणत्याही कारणाने भिन्नभिन्न संस्कृती एकत्र येतात तेव्हा सांस्कृतिक तसेच भाषिक आदानप्रदान होत असते. भारतात विविध भाषिक आणि सांस्कृतिक विविधता असणारे वेगवेगळे समाज गट एकत्रित गुण्यागोविंदाने नांदताना दिसतात.

**२अ.२.९ भाषा, समाज, संस्कृती यातील परस्पर संबंध :**

माणूस समाजाकडून जे मिळवतो त्याला ज्ञान म्हणतात. व्यक्तीला ज्ञान समाजाकडून मिळत असते. भाषा शिकण्याची क्षमता अनुवंशिक असली तरी कोणत्याही मुलाला भाषा ही समाजाच्या संपर्कात आल्याशिवाय शिकता येत नाही. प्रत्येक समाजाची संस्कृती भिन्न असते. ती प्रत्येक समाजानुसार वेगवेगळी असते. त्यामुळे समाजाचे विशिष्ट शब्द किंवा खाद्यपदार्थ इतर भाषेत भाषांतरित करताना मोठ्या अडचणी येतात. कारण प्रत्येक भाषा त्या संस्कृतीचा एक भाग असतात. त्या त्या संकल्पना विशिष्ट संस्कृतीने जन्माला घातलेल्या असतात. उदा. मोदक, पुरणपोळी, पिटले या महाराष्ट्रीयन खाद्यपदार्थांचे इतर भाषेत भाषांतर करताना अडचणी येतात. कारण इंग्रजी भाषा किंवा इतर भाषा यांच्या संस्कृतीत या संकल्पनाच नाहीत. भाषेतील अर्थविशेषता संस्कृतीमुळेच येते. संस्कृतीचा अभ्यास करताना भाषा महत्त्वाचे साधन आहे.

भाषा, समाज, संस्कृती परस्परानुबंध तपासताना 'मानव' हा घटक मध्यवर्ती विचार ठेवून करणे आवश्यक आहे. कारण भाषा, समाज, संस्कृती हे घटक मानवनिर्मित आहेत. 'बोलणे' (वाणी) ही मानवाला निसर्गाकडून मिळालेली देणगी आहे. त्या आधारे मानवाने भाषा घडवली आहे. कल्पना यांची अभिव्यक्ती ही मूलभूत प्रेरणा होती. या देवाणघेवाणीच्या प्रक्रियेला 'संप्रेषक', 'संदेशन' असे म्हणतात. एकूण मानवी जीवनात भाषेचे अस्तित्व प्रत्येक ठिकाणी जाणवते. म्हणून भाषेशिवाय व्यक्ती आणि व्यक्तीशिवाय भाषा विचार संभवत नाही. भाषेद्वारा माणसे एकमेकांशी संपर्क साधतात. एकमेकांना समजून घेतात, एकमेकांशी नाती, संबंध प्रस्थापित करतात. या भाषिक व्यक्ती संप्रेषणातून 'समाज' ही व्यवस्था अस्तित्वात आलेली आहे. मानवी समाज आणि भाषा यांचा संबंध अतूट आहे.

**आपली प्रगती तपासा :**

१) भाषा आणि समाज याचा परस्पर संबंध स्पष्ट करा.

## २अ.३ समारोप

अशाप्रकारे भाषा, समाज आणि संस्कृती यांचा संबंध घनिष्ठ आहे. समाजाचे स्वरूप व्यापक आणि अत्यंत गुंतागुंतीचे आहे. समाजाचे आणि संस्कृतीचे स्वरूप साहित्यात अबाधित असणे हे समाजाच्या जिवंतपणाचे लक्षण मानावयास हरकत नाही. अभिव्यक्तीच्या प्रेरणेतून संदेशन, संप्रेषण या देवाणघेवाणीच्या प्रक्रियेतून मानवी संबंध व सामाजिक संबंध विकसित होतात. म्हणूनच भाषा ही मानवी सामाजिक - सांस्कृतिक जीवनाची ओळख ठरते.

## २अ.४ प्रश्नावली

१. —————- हे जीवन व्यवहाराचे प्रभावी माध्यम आहे.

२. भाषेचा उगम ————— मधून झाला आहे.

३. मानवी भाषा हा एक ————— ठेवा आहे.
४. भाषिक सापेक्षतावादाचा सिद्धांत —————– यांनी मांडला.
५. भाषाद्वित्व संकल्पना ————— यांनी मांडली.
६. भाषेच्या याबहुजिनसीपणाला —————- यांने विरोध केला.
७. माणूस समाजाकडून जे मिळवतो त्याला —————- म्हणतात.
८. सपीर आणि वोर्फ यांनी —————– यांच्या संबंधाला महत्त्व दिले.
९. मानवाचे जीवन सुखकर व सुसह्य होण्यासाठी ज्या भौतिक गोष्टींची आवश्यकता असते त्यास ————— असे म्हणतात.
१०. मानवी जीवनात भाषा एक —————– संचित आहे.

**टीपा :**

**१.** संस्कृती संकल्पना
**२.** समाज ही संकल्पना
**३.** सापेक्षतावादाचा सिद्धांत
**४.** समाज भाषाविज्ञान संकल्पना
**५.** भाषाद्वित्व संकल्पना
**६.** भाषा एक सांस्कृतिक संचित

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. भाषा, समाज आणि संस्कृती यांचे परस्पर संबंध स्पष्ट करा.
२. सपीर आणि वोर्फ यांचा भाषिक सापेक्षतावादाचा सिद्धांत मांडा.
३. भाषिक बहुजिनसीपणा ही संकल्पना स्पष्ट करा.
४. संस्कृती ही संकल्पना सविस्तर मांडून संस्कृतीच्या प्रकारांची चर्चा करा.
५. भाषा आणि समाज भाषाविज्ञान ही संकल्पना स्पष्ट करा.

## २अ.५ संदर्भग्रंथ सूची


- मालशे, मिलिंद - सामाजिक भाषाविज्ञान, आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन, लोकवाङ्मय गृह
- मालशे, मिलिंद - भाषाविज्ञान व इतर अभ्यासक्षेत्रे
- पाध्ये, दिंगबर - साहित्य, समाज आणि संस्कृती, लोकवाङ्मय गृह.
- डॉ. कालेलकर, ना. गो. - भाषा आणि संस्कृती, मौज प्रकाशन.
- डॉ. कालेलकर, ना. गो. - इतिहास आणि भूगोल, मौज प्रकाशन
- आपटे, माधवी - सामाजिक भाषाविज्ञान : कक्षा आणि विस्तार, संदर्भ प्रकाशन.
- वरखेडे, रमेश - समाज भाषाविज्ञान प्रमुख संकल्पना, शब्दालय प्रकाशन.
- धोंगडे, रमेश - भाषा, विचार आणि संस्कृती, सामाजिक भाषाविज्ञान, दिलीपराज प्रकाशन.


❖❖❖❖

# २आ

# भाषेचा विकास आणि ऱ्हास-संकल्पना विचार

**घटक रचना :**

२आ.० उद्दिष्टे
२आ.१ प्रास्ताविक
२आ.२ जागतिकीकरण आणि भाषिक - सांस्कृतिक विविधता, परिणाम
२आ.३ भाषिक ध्रुवीकरणाची धोके
२आ.४ भाषेच्या विकासाची संकल्पना
२आ.५ भाषेच्या प्रगतीचे निकष किंवा मापदंड
२आ.६ भाषिक ऱ्हासाची संकल्पना
२आ.७ भाषिक ऱ्हासांच्या विविध अवस्था किंवा टप्पे
२आ.८ भाषिक ऱ्हासाची कारणे
२आ.९ भाषा नियोजन आणि भाषा विकास
२आ.१० सारांश
२आ.११ संदर्भग्रंथ व अधिक वाचनासाठी पुस्तके
२आ.१२ घटकावर आधारित प्रश्न

## २आ.० उद्दिष्ट्ये

भाषेचा विकास आणि ऱ्हास संकल्पना विचार समजावून देताना -

- जागतिकीकरण या संकल्पनेचा परिचय आपल्याला करून घ्यायचा आहे.
- जागतिकीकरण भाषावृत्तींवर, सांस्कृतिकतेवर कसा परिणाम करते ते समजून घेणार आहोत.
- जागतिकीकरणामुळे भाषेपुढे कोणते धोके निर्मान झाले आहेत पाहणार आहोत.
- भाषा ऱ्हासाची कारणे, अवस्था, टप्पे समजून भाषिक विकास कसा साधता येईल याची चर्चा करणार आहोत.
- भाषिक नियोजनातून भाषा विकास कसा साधता येतो याचे विवेचन करणार आहोत.

## २आ.१ प्रास्ताविक

मानवाला भाषा निर्मितीचे वरदान लाभले आणि त्याला विनिमयाचे प्रभावी साधन गवसले. पण भाषेचे ज्ञान होण्यापूर्वी त्याची विनिमय प्रक्रिया पूर्णपणे बंद असणे शक्य नाही. हावभाव, चिन्हांची भाषा, संकेत, चित्र भाषा, अशा विविध धडपडीतून मानवाला मुखनिर्मित ध्वनीचे सामर्थ्य कळले असावे. मानवी ध्वनीची अनेक उपयुक्ता लक्षात घेता त्या ध्वनींना अर्थ देऊन मानवाने आपली भाषा तयार केली. काळाच्या ओघात गरजेप्रमाणे भौतिक व अभौतिक शब्द निर्मिती करुन आपली भाषा मानवाने विकसित केलेली दिसते. पण तरीही भाषाही अखंड आणि वज्ररूप गोष्ट नाही. भौगोलिक, सामाजिक आणि शैली दृष्ट्या ती विविध स्तरांवर विविध प्रकारे अवतरताना दिसते. विविध प्रकारे अवतरताना एखाद्या भाषेचा विकास होतो तर काही नामशेष होत जाताना दिसतात. असे का होते, भाषेचा विकास म्हणजे काय, भाषेचा ऱ्हास होतो म्हणजे काय आणि या ऱ्हासावर भाषिक नियोजन कसे करता येते, यावर या घटकविषयांतर्गत आपण चर्चा करणार आहोत.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे समाज, व्यक्ती आणि भाषा यांच्यातील परस्पर संबंध नवी रूपे, नवी वळणे घेऊ लागले आहेत. बदलत्या आर्थिक धोरणांमुळे आणि जीवन संघर्षामुळे समाजाच्या भाषा निवडीवर व भाषावृत्तींवर परिणाम होताना दिसतो आहे. जग जवळ येत आहे तशी भाषिक प्रश्नांची तीव्रता आणि गुंतागुंत वाढली आहे. अस्ताला जाण्याऱ्या भाषांना वाचवायचे कसे हा गंभीर प्रश्न आहे. कारण भाषा ही केवळ संप्रेषणाचे, भौतिक प्रगतीचे साधन नसते. त्या पलीकडे तिला एक सामाजिक, सांस्कृतिक भूमिका असते. भाषा ही त्या त्या समाजाची 'ओळख' असते. समजाची सांस्कृतिक जडणघडण करणारी 'व्यवस्था' असते. जागतिकीकरणाचे भाषेवर कसे व कोणते परिणाम होतात, ते समजून घेण्यासाठी 'जागतिकीकरण' ही संकल्पना समजून घेऊया.

## २आ.२ जागतिकीकरण आणि भाषिक - सांस्कृतिक विविधता, परिणाम

जागतिकीकरण ही मूलतः मुक्त अर्थव्यवस्थेचा अवलंब करुन निर्माण झालेली अनेक परिणामे असलेली परिस्थिती स्पष्ट करणारी संज्ञा आहे आणि भाषा ही मानवाच्या संवादाचे माध्यम आहे. भाषा आणि समाज व संस्कृती या गोष्टी परस्परश्रयी, परस्परपूरक आणि परस्पर सापेक्ष असतात हे लक्षात घेतले तर जागतिकीकरणाने बदलणारी सामाजिक स्थिती, चेहरामोहरा बदललेली संस्कृती आणि व्यक्तीची बदललेली मानसिकता याचा स्वाभाविक परिणाम भाषेसारख्या माध्यमावर होताना दिसतो.

जागतिकीकरण म्हणजे भांडवली आधुनिकतेची नवीन विशेष कृती आहे, असे म्हटले जाते. स्थूलमानाने जग एक होत चालल्याची भावना जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत अभिप्रेत आहे. या परिवर्तना मागे भांडवली, राजकीय, अर्थव्यवस्थेतील संक्रमण कारणीभूत आहे. विसाव्या शतकातील तंत्रवैज्ञानिक विकासाने आधुनिकीकरणाच्या नावे अमेरिकन जीवनपद्धतीचा फैलाव केला. भारताने १९९० च्या आर्थिक धोरणात खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण ही खाउजा त्रिसूत्री स्वीकारली. या जागतिकीकरणाने एकूणच जगाचे अर्थकारण, समाजकारण, राजकारण या क्षेत्रात बरीच उलथापालथ केली.

**२आ.२.१ जागतिकीकरण आणि भाषा :**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत केंद्रीकरण आणि विकेंद्रीकरण अशा दोन परस्पर विरोधी प्रेरणा काम करत असतात. भाषांच्या संदर्भातही याच दोन प्रेरणा कार्यरत असतात. सगळ्यांनी निदान गरजेपुरती इंग्रजी शिकावी, ही केंद्रित करणाची भूमिका आहे. तर जागतिक पातळीवर वापरायची इंग्रजी ही स्थानानुसार लवचिक रहावी ही विकेंद्रीकरणाची मागणी आहे. थोडक्यात, जागतिक संपर्क भाषा म्हणून इंग्रजी वापरली जावी व अन्य अनेक उद्दिष्टांसाठी स्थानिक प्रादेशिक भाषांचा वापर व्हावा ही अपेक्षा आहे. पण तसे न घडता सर्वच उद्दिष्टांसाठी वापरली जावी व अन्य अनेक उद्दिष्टांसाठी स्थानिक प्रादेशिक भाषांचा वापर व्हावा ही अपेक्षा आहे. पण तसे न घडता सर्वच उद्दिष्टांसाठी सर्वांनी इंग्रजी वापरावी, सार्वत्रिक शिक्षणाचे माध्यम इंग्रजी ठेवावे असा आग्रह धरला जातो तेव्हा संघर्षाची ठिणगी उडते. कारण कोणतीही भाषा केवळ संपर्कभाषा कधीच नसते ती माणसाची काव्यात्म, अध्यात्मिक, वैचारिक सर्जनशीलता फुलवण्याचे माध्यमही असते. जागतिकीकरणाच्या रेट्यात भाषेत बदल होणे अपरिहार्य आहे. ज्ञान सर्वांपर्यंत पोहोचवताना स्थानिक भाषा त्यासाठी सक्षम करणे कधीही हितावह असते. विशेषतः आपल्या देशात परकीय भाषेबद्दल अनामिक आणि आदरयुक्त भीती आणि स्व-भाषेबद्दलचा एक न्यूनगंड आढळून येतो. त्यामुळे इंग्रजीचा डोळस स्वीकार आणि स्व-भाषेचे नीट आकलन, या दोन्ही घडत नाहीत. स्वभाषेची हेळसांड करुन आपण ज्ञानभाषा म्हणून तिला पुरेशी सक्षम करत नाही. इंग्रजीतून बोलले किंवा इंग्रजीची क्षमता मिळवली तरच आपले म्हणणे जगापर्यंत पोहोचेल असे वाटते. औद्योगिक आणि आर्थिक स्थित्यंतर यामुळे जागतिकीकरणाच्या रेट्यातून अनेक भाषिक बदल घडलेले दिसतात. अलीकडे स्वयंपाक घर, शयन घर नसते तर किचन, बेडरूम, ड्रॉईग रूम, लिविंग रूम हेच शब्द रूढ होत आहेत.

जागतिकीकरणाचे भाषांवर किती भयानक परिणाम होतात, हे लक्षात घेताना काही संख्याशास्त्रीय पुरावे उपयुक्त ठरतील. भाषांच्या कॅटलॉग मध्ये नोंदविल्या प्रमाणे शंभर वर्षापूर्वी उत्तर अमेरिकेत व कॅनडात १८७ भाषा बोलल्या जातात. आज त्यातल्या केवळ ३८ भाषा शिल्लक उरल्या आहेत. अलास्का मध्ये २० भाषा शंभर वर्षापूर्वी होत्या, त्यातल्या आज फक्त दोन बोलल्या जातात. दक्षिण अमेरिकेत ४०० भाषा होत्या त्यापैकी १०८ त्यांनी कशाबशा टिकवल्या आहेत. त्यामानाने आपल्या देशात अजून १६५२ भाषा टिकून राहिल्या आहेत हे वाचून सुखद धक्का बसतो. अर्थात जागतिकीकरणाचे समर्थन करणारे असेच म्हणतात की इतक्या सगळ्या भाषा भारतात आहेत म्हणूनच भारताच्या प्रगतीत अडथळे येतात. जागतिकीकरण यशस्वी होण्यासाठी जगभर एकच भाषा असावी, असा त्यांचा दावा असतो. पण आपण ते धोरण अंधपणे स्वीकारते तर आपल्या देशातील सांस्कृतिक विविधता संपुष्टात येईल. 'भाषा जपण्याचा हक्क' मानवी हक्कांच्या सनदेत युनेस्कोने घातला आहे, कारण तो तितकाच महत्त्वाचा आहे. जागतिकीकरणाने बोली टिकतील की नाही ही एक शंका आहे किंबहुना बोली भाषा टिकल्यातरच प्रमाण भाषा टिकणार आहे. जागतिकीकरणाने भाषेपुढे अशी आव्हाने निर्माण केली आहेत.

**२आ.२.२ संस्कृती आणि जागतिकीकरण :**

"जागतिकीकरण म्हणजे व्यापार, वित्त, रोजगार, तंत्रज्ञान, दळणवळण, विदेशी स्थलांतर, पर्यावरण, राहणी, शासन, समाजव्यवस्था, संस्कृती अशा सर्व क्षेत्रातून होत जाणारे रूपांतर होय असे म्हणता येईल." प्रसिद्ध लेखक कवी उत्तम कांबळे यांनी जागतिकीकरण प्रक्रियेसंदर्भात, "सांस्कृतिक देवाणघेवाणीच्या नावाखाली भांडवलदार देशातील संस्कृती

पद्धतशीरपणे लादणे म्हणजे जागतिकीकरण तसेच गरिबांना त्यांच्या इतिहासापासून संस्कृतीपासून दूर करणे, स्थानिक-भाषा, लोकभाषा यांना श्रद्धांजली वाहणे म्हणजे जागतिकीकरण." असे टोकाचे विधान केले आहे. विख्यात कवी, समीक्षक प्रा. वसंत आबाजी डहाके यांच्या मते, "जागतिकीकरण ही भिन्नभिन्न आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक प्रवाहांना सामावून घेणारी संज्ञा आहे. जागतिकीकरण ही अवस्था आहे आणि सिद्धांतही आहे. परंतु वर्तमान काळात जागतिकीकरण या शब्दाचे अर्थ म्हणून आर्थिक उदारमतवाद, मुक्त बाजारपेठ, पश्चिमीकरण किंवा अमेरिकीकरण, इंटरनेट क्रांती, जागतिक एकात्मता हे प्रतिशब्द वापरले जातात. जागतिकीकरणाची ही अवस्था एक अपूर्ण अवस्था आहे." जगातील अनेक भाषिक अहवाल आज ओरडून सांगत आहेत की भाषा मृतप्राय होत आहेत. म्हणजे भाषिक संस्कृती आणि त्यायोगे तो समूह नष्ट होत आहे. खरंतर समूह आपली पारंपारिक लोक भाषा सोडून प्रचलित समाजव्यवस्थेची प्रमाणभाषा स्वीकारतो त्यामुळे पारंपरिक बोली आपोआप गळून पडतात.

जागतिकीकरणामुळे सामाजिक, संज्ञापन प्रक्रियेत एकाहून अधिक भाषांशी संपर्क घडणे स्वाभाविक आहे. शेजारी भाषा संपर्क आणि परभाषा संपर्क या प्रक्रिया अटळ आहेत. राजकीय-सांस्कृतिक आक्रमणामुळे भाषा संपर्क होतो. या संपर्क प्रक्रियेत अनुकरणाने ऋणग्रहण होते. मराठी वाक्यात इंग्रजी शब्दांची भेसळ फार मोठ्या प्रमाणावर झालेली दिसून येते. "डॅडी, मला स्टॅपलर बाय करायचा आहे.", "आज स्कूलमध्ये इन्स्पेक्शन आहे, कॅटलॉग तयार केला पाहिजे","नुकताच रिझल्ट लागला बेबी गर्ल झाली.", "कॅज्युअल घेतली कारण शॉपिंग करायचं होत", अशी भेसळ म्हणजेच भाषा मिश्रण किंवा कोडी मिक्सिंग. राजकीय सांस्कृतिक प्रभुत्वामुळे, परसंस्कृतीतील अनेक वस्तू, कल्पना यांचा स्वीकार केला जातो. त्यामुळे परभाषेतील असे वस्तूवाचक शब्द वापरल्याशिवाय व्यवहार पूर्ण होऊ शकत नाही असे मानवी मनाला वाटते. उदाहरणार्थ दीर्घकालीन मुस्लीम राजवटीमुळे मराठी माणसाने मुस्लिमांचा पोशाख स्वीकारला. त्यातून लेंगा, कुडता, विजार हे फारसी शब्द आले. इंग्रजांच्या संपर्कातून कॉलेज, तिकीट, बिस्कीट, सँडविच, आईस्क्रीम, पोस्टमन, बस, पार्सल, कार्ड इ. शब्दांचे मराठी भाषेत मिश्रण झाले. मातृभाषेतील शब्द उच्चारायला संकोच वाटतो. त्या शब्दासाठी परभाषेतील शब्दांचा पर्याय स्वीकारला जातो. उदाहरणार्थ, 'बायको' म्हणताना ज्याला संकोच वाटतो तो मिसेस म्हणतो. लघवीकडे जातो असे न म्हणता वॉशरूमला जातो असे पर्याय सहजपणे उपयोगात येतात. दाखवेखोर प्रवृत्तीतूनही भाषा मिश्रण होते. मुद्दामून परभाषेतील शब्दांचा प्रयोग केला जातो. व्हेरी गुड, फाईन, बेस्ट, कुल, ऑसम या उद्गारवाचक शब्दांचे उपयोजन याच प्रवृत्तीतून होते. तर फॅशन म्हणून फादर, मदर, ब्रो, मॉम, डॅड हे शब्द वापरले जातात. हळूहळू परकीय शब्दांचे वर्चस्व वाढत जाते आणि त्या भाषेची व पर्यायाने त्या भाषिक समाजाची सांस्कृतिक घडण विस्कटायला सुरुवात होते. समाज व्यवहार दुषित व्हायला प्रारंभ होतो यालाच 'भाषिक प्रदूषण' असे म्हणतात. मराठीत भाषिक प्रदूषण ही संज्ञा प्रथम डॉ. अशोक केळकर यांनी वापरली. भाषिक प्रदूषण सांस्कृतिक जीवनसरणीला कशी धक्का पोचवते याची त्यांनी मीमांसा केली आहे. उदाहरणार्थ अलीकडच्या कीर्तनकार जेव्हा कीर्तनात रंग भरताना म्हणतो, "मोक्षप्राप्तीचा भाव लई सस्ता लावलाय, नामस्मरण करा, बस दुसरं काही करायला नको." यात उद्बोधनापेक्षा सेल्समनशिपचा भाग जास्त असतो. त्यामुळे कीर्तनाचा सांस्कृतिक रंग ढवळून निघतो. वकृत्व स्पर्धेमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थी शिवाजी महाराजांविषयी जेव्हा असे विधान करतो - "मावळ्यांची वॉरंटी नव्हे, गॅरेंटी देणारा हा क्वालिटीबाज राजा होता." तेव्हा परकीय भाषातील आक्रमणाचा आणि भाषिक पराधीनतेच्या संबंधाकडेही आपले लक्ष वेधते.

परक्या शब्दात आपले विचार आपण व्यक्त करतो तेव्हा आपण आपली भाषिक स्वाधीनता गमावत असतो. परक्या शब्दांवर विसंबून राहिल्यामुळे आपल्या मातीतून जीवनरस शोषून घेण्याची नैसर्गिकता भाषा गमावून बसते. त्यामुळे विचार प्रक्रियेतही परावलंबित्व येते. ते सांस्कृतिक ऱ्हासाचे कारण ठरते. आपल्याकडे सावरकरांनी केलेल्या भाषाशुद्धीच्या चळवळीमागे हा जीवन शुद्धतेचा ही संदर्भ होता.

## २आ.३ भाषिक ध्रुवीकरणाची धोके

जागतिकीकरणाच्या वाढत्या प्रभावामुळे भाषिक समस्या वाढीस लागल्या. त्यातील एक भाषिक ध्रुवीकरणाची समस्या होय. एका भाषिक प्रदेशात दोन भाषिक समूह तयार होणे आणि ते दोन टोकांच्या भाषिक भूमिकांचे असणे म्हणजे भाषिक ध्रुवीकरण. या प्रक्रियेत बहुतेक वेळा एका भाषेला बहुधा परकीय भाषेला अवाजवी महत्त्व मिळून, दुसरी बहुधा निजभाषा मागे पडते. दोन्ही भाषांचे भाषक दोन विरुद्ध भूमिकांवर राहून आत्यंतिक भाषा द्वेषाचा आधार घेतात. यात बहुतेक वेळा एत्तद्देशीय भाषा मागे पडून तिच्या विकासात अडथळे निर्माण होऊ शकतात. भाषिक ध्रुवीकरण सामाजिक-सांस्कृतिक वृत्तीमुळे घडते तसेच ते आर्थिक राजकीय धोरणामुळे ही वाढीस लागते. सध्याच्या जागतिकीकरणाच्या विळख्यात सापडलेल्या अनेक भाषांना ध्रुवीकरणाची झळ लागू पडते आहे.

जगात सुमारे सहा ते साडेसहा हजार भाषा अस्तित्वात आहेत आणि तत्त्वतः त्यापैकी प्रत्येक भाषेत ज्ञानभाषा होण्याची क्षमता आहे. 'ज्ञानभाषा' म्हणजे जी विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण आणि विशेषतः उच्च शिक्षण, मूलभूत संशोधन, उद्योग, वाणिज्य, विधी व न्याय, प्रशासन आदी प्रगत व्यवहारक्षेत्रांत पूर्ण क्षमतेने व गुणवत्तापूर्ण रीतीने समाजाच्या सर्व घटकांकडून वापरली जाते, जी बुद्धिजीवी वर्ग आपापल्या क्षेत्रातील गंभीर स्वरूपाच्या तत्त्वचर्चेसाठी व विचारमंथनासाठी वापरतो अशी भाषा. मराठी भाषा ह्या व्याख्येत कुठेच बसत नाही. मराठीसह जवळपास सर्वच भारतीय भाषांची स्थिती अशीच आहे. समाज जसजसा ज्ञानाधिष्ठित होत जातो, तशी त्याला ज्ञानभाषेची गरज वाटू लागते. स्वभाषा ज्ञानभाषा नसेल तर तो उपलब्ध ज्ञानभाषेचा स्वीकार करतो. एका आकडेवारीनुसार जगातील ९७ टक्के लोक जगातील एकूण भाषांपैकी चार टक्के भाषा वापरतात, तर जगातील तीन टक्के लोक उर्वरित ९६ टक्के भाषा वापरतात. इतक्या मोठ्या प्रमाणात भाषिक ध्रुवीकरण होण्याचे कारण ज्ञानभाषेशी निगडित आहे. सोयीसुविधा, दळणवळणाची तसेच रोजगाराची साधने नसलेल्या मागास खेड्यांकडून लोक शहरांकडे, महानगरांकडे वळतात त्याप्रमाणे लोक ज्ञानभाषा नसलेल्या स्वभाषांकडून भौतिक संधीची, ज्ञानविज्ञानाची दालने खुली करणाऱ्या प्रगत भाषांकडे वळतात. मराठी समाजातच नव्हे, तर जगातील अनेक भाषिक समाजांच्या इंग्रजी भाषेकडील ओढा त्यातूनच आलेला आहे. परिणामी, इंग्रजीच्या जगभरातील द्वितीय भाषकांची संख्या तिच्या निजभाषकांच्या संख्येपेक्षा वाढताना दिसत आहे.

अनेक भाषा असलेल्या भारतासारख्या देशात भाषिक ध्रुवीकरणाची झळ लागलेली दिसते. भारतीय देशी भाषा हा एक गट, तर परकीय इंग्रजी भाषा हा दुसरा गट आढळून येतो. इंग्रजी सारख्या परकीय भाषेला अवाजवी महत्त्व मिळाल्याने बहुधा देशी निजभाषा मागे पडलेल्या दिसतात. एतद्देशीय भाषा मागे पडून तिच्या विकासात अडथळे निर्माण झालेले दिसतात. म्हणून

भाषा विकासासाठी, ती टिकवण्यासाठी भाषा विकास संस्था निर्माण होतात. उदा. मराठीच्या विकासासाठी राज्य मराठी विकास संस्था, मराठी अभ्यास केंद्र, मराठी अभ्यास परिषद इ. संस्था कार्यरत झालेल्या दिसतात. भाषिक ध्रुवीकरण सामाजिक-सांस्कृतिक वृत्तीमुळे घडते. आर्थिक राजकीय धोरणामुळे ते वाढीस लागते. राजसत्ता, व्यापारी वर्ग याचे हितसंबंध गुंतलेले असतात तेव्हा हे भाषिक प्रश्न वाढीस लागतात.

## २आ.४ भाषेच्या विकासाची संकल्पना

भाषेचा विकास ही संकल्पना मनोभाषाविज्ञानात भाषासंपादन किंवा भाषा आत्मसात करण्याची प्रक्रिया या अर्थाने वापरली जाते. समाजभाषाविज्ञानात भाषा विकास ही संकल्पना विशिष्ट भाषेची वापरसापेक्ष वाढ किंवा प्रगती व तिचे समाजातील स्थान या अर्थाने प्रचलित आहे.

**भाषा विकासाच्या पायऱ्या :**

**१) प्रामाण्य (Standardization) :** भाषिक प्रमाण्यामुळे प्रमाणभाषा आपल्या संपूर्ण भाषिक क्षेत्रात शब्दप्रसंग आणि व्याकरणाच्या दृष्टीने समरूपता राखून असते. त्यामुळे ती सर्व ठिकाणच्या लोकांना समजते. प्रमाणभाषा तिच्या बोलींना स्वतःच्या छताखाली सामावून घेते. जिथे वापर क्षेत्र जास्त आहे अशा प्रमाण मानल्या गेलेल्या भाषेचा आणि तिच्या बोलींचा विकास व्हायला मदत होते.

**२) लेखीकरण (Graphisation) :** एखादी भाषा जोवर मौखिक स्वरूपात असते तोवर तिच्या विकासाचा वेग मर्यादित असतो मात्र ती भाषा लिहिली जाऊ लागली तिला स्वतःची लिपी निर्माण झाली की तिचे दस्तऐवजीकरण होऊ शकते, जतन होऊ शकते त्यातून त्या भाषेच्या विकासाला चालना मिळते.

**३) आधुनिकीकरण (Modernization) :** भाषा ही ज्ञान भाषेकडे वाटचाल करु लागली की तिचे आधुनिकीकरण होऊ लागते तिची वापरू क्षेत्रे विस्तारू लागतात. आधुनिक जगातील नवीन नवीन क्षेत्रांमध्ये तिचा वावर वाढतो आणि भाषा विकासाला हातभार लागतो. जी ज्ञानभाषा विचार, तंत्रविद्या आणि भावनाभिव्यक्ती याबाबतीत जाण उत्पन्न करते आणि प्रयोगशीलता परिवर्तनशीलता या गुणांना मदत करते, ती विकसनक्षम ठरते.

**४) जिवंतपणा (Vitality) :** विकसनशील ज्ञानभाषेमध्ये जिवंतपणा असणे हे तिचे वैशिष्ट्य आहे. संस्कृत आणि लॅटीन भाषांमध्ये असा जिवंतपणा नाही म्हणून एका अर्थाने त्या मृत भाषा आहेत. या भाषांच्या पुनरूज्जीवनाचे प्रयत्न केले जात आहेत, ही बाब निराळी. मात्र कोणतीही प्रमाणभाषा ही मृत भाषा नसते, स्थिर व विकार शून्य असे तिचे स्वरूप नसते. एखादी भाषा अधिकाधिक ठिकाणी वापरली जाणे हे तिच्या जिवंतपणाचे लक्षण असते आणि ते भाषा विकासास उपकारक ठरते.

**५) स्वायत्तता (Autonomy) :** आपल्या अस्तित्वासाठी प्रमाण वा ज्ञानभाषेला अन्य कोणत्याही भाषेवर अवलंबून राहावे लागत नाही. स्वायत्त असणे ही तिच्या विकासातील एक

प्रमुख पायरी आहे. उदाहरणार्थ अभियांत्रिकी व वैद्यकीय क्षेत्रात शिकणाऱ्यांसाठी इंग्रजी हीच भाषा माध्यम म्हणून वापरावी लागते. कारण देशी भाषांमधून तो ज्ञान व्यवहार परिभाषित झालेला नाही. तामिळ सारखे राज्य वैद्यकीय क्षेत्रातील पदवी करिता तामिळ हीच भाषा माध्यम राहावी यासाठी शासनाकडे प्रस्ताव देत असले तरी तो मंजूर होत नाही. याचे कारण तामिळ मधून वैद्यकीय परिभाषा संपूर्णपणे तयार झालेली नाही. भाषिक परावलंबित्व हे विकासात अडसर ठरते. जी भाषा स्वायत्त आहे तिच्या विकासाचा वेग वाढतो.

## २आ.५ भाषेच्या प्रगतीचे निकष किंवा मापदंड

भाषेच्या विकासाचे काही निकष किंवा मापदंड पुढील प्रमाणे :

**१) स्वतःचा भूप्रदेश असणे :** भाषा बोलणारे लोक एका विशिष्ट भूप्रदेशावर राहणारे असतील तर तो प्रदेश त्या भाषिक समूहाचा प्रदेश म्हणून ओळखला जतो. साहजिकच तो भूप्रदेश त्या भाषेच्या हक्काचा बनतो. तिच्या वाढीला आणि विकासाला हक्काची जागा मिळते. हिब्रू भाषेचे उदाहरण येथे पाहण्यासारखे आहे. बहुभाषक ज्यू धर्मीय लोक जेव्हा स्वतंत्र इस्त्राईल राष्ट्रात एकत्र येऊन स्थायिक झाले, तेव्हा त्या भाषेची भरभराट होऊ लागली. अन्यथा त्यापूर्वी जगभर विखूरलेल्या व इतर देशांमध्ये आश्रित असलेल्या बहुभाषक समाजामुळे ती भाषा मानाचे स्थान न पटकावता नगण्य राहिली होती. स्वतःचा भूप्रदेश मिळाल्यावर हिब्रूचा विकास झाला.

**२) संबंधित भाषकांचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण :** एखाद्या भाषेच्या निजभाषिकांचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण अत्यल्प असेल तर त्या भाषेच्या विकासासाठी फार प्रयत्न करावे लागतात. याउलट हे प्रमाण अधिक असेल तर तेवढा त्या भाषेचा मुबलक वापर होण्यास वाव असतो. पर्यायाने त्या भाषा विकासाला चालना मिळू शकते.

**३) भाषेचा वापर क्षेत्रांची व्याप्ती आणि गुणवत्ता :** भाषेचे वापर क्षेत्र किती व्यापक आहे आणि कोणत्या गुणवत्तेचे आहे, यावरही तिचा विकास ठरतो. ती भाषा सांस्कृतिक, साहित्यिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक बाबतीत वापरली जाते का, किती ठिकाणी तिचा वापर होतो, तिच्या वितरणावर तिचा विकास अवलंबून असतो.

**४) संबंधित भाषकांच्या भाषिक प्रावीण्याची पातळी :** भाषिक प्रावीण्य ठरवण्याचे निकष म्हणजे ज्या भाषेत आपल्याला बोलता येते, वाचता येते, लिहिता येते आणि जी चिंतनाची भाषा ठरु शकते, त्या भाषेची प्रावीण्य पातळी उच्च आहे असे म्हणता येते. ज्या समाजातील लोकांनी ही प्रावीण्य पातळी गाठलेली आहे, त्यांच्या वापरानुसार त्या भाषेचा विकास अवलंबून असतो.

**५) संबंधित भाषकांचा स्व-भाषेकडे पाहण्याचा दृष्टिकोण :** एखाद्या भाषेचे भाषिक त्या भाषेकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहतात, यावरही त्या भाषेचा विकास अवलंबून असतो. ज्या भाषेचा प्रयोग करण्यात, त्या भाषेतून शिक्षण घेण्यात जर कमीपणा वाटत असेल तर तिचा वापर कमीत कमी होतो. परिणामी तिच्या विकासाला खीळ बसू शकते. उलट समाज जर त्या वापरभाषेकडे 'स्वत्वाची जाणीव', 'आपली ओळख' या दृष्टिकोनातून पाहत असेल आणि

ज्ञानभाषा म्हणून त्या भाषेचा स्वीकार करत असेल, त्या भाषेचा विकास होण्याच्या शक्यता बळावतात.

**६) अधिकृत स्थान व शासकीय भाषा धोरण :** राष्ट्रभाषा, राज्यभाषा, प्रमाणित भाषा, अधिकृत भाषा म्हणून एखाद्या भाषेला दर्जा मिळतो, तेव्हा तिच्या विकासाचे दरवाजे आपोआप खुले होतात. शासनाची जबाबदारी त्या भाषेला मान्यता मिळवून देणे व तिचे एक ठोस भाषा धोरण तयार करणे हे असते. भाषेला एक अधिकृत स्थान असेल आणि तिच्या विकासासाठी शासकीय ध्येय धोरणे राबवली जात असतील तर भाषा विकासास मदत होते.

**७) भाषेचे संक्रमण :** एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे भाषा संक्रमित व्हावी लागते. भाषा प्रवाही असली तरच जिवंत राहते. एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे ती हस्तांतरीत झाली नाही तर मात्र ती पिढी भाषेपासून वंचित तर राहतेच आणि भाषेला न वापरल्यामुळे तिच्यात साचलेपण येते. विकासासाठी भाषेचे संक्रमण होण्याची गरज असते.


**८) भाषा शिक्षणाच्या साधनसामग्रीची उपलब्धता :** भाषेच्या प्रयोगशाळा, भाषा शिक्षणासाठी विविध माध्यमांचा उपयोग, अधिकाधिक आकर्षक आणि वेधक पद्धतींचा भाषा शिक्षणात अंतर्भाव केल्यामुळेही भाषेच्या विकासाला चालता मिळते.

**९) आधुनिक आणि नवनवीन वापर क्षेत्रांना माध्यमांना आणि तंत्रज्ञानाला प्रतिसाद :** आधुनिक जगाच्या प्रगतीनुरुप भाषा प्रगत झाली पाहिजे, नवीन तंत्रज्ञानाला त्या भाषेने आणि नवीन तंत्रज्ञानाने त्या भाषेला स्वीकारले पाहिजे. संगणकावर त्या भाषेचा वापर होणे हे भाषेच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल ठरते.

उदा. राज्य मराठी विकास संस्थेकडून मराठी विकिपीडियावर अधिकाधिक लोकांनी लिहिले पाहिजे यासाठी कार्यशाळांचे आयोजन केले जाते. जितकी ती भाषा ग्लोबल होईल, नवनवीन वापर क्षेत्रांना प्रतिसाद देईल तितका त्या भाषेचा प्रसार होऊ शकतो.

**१०) भाषिक स्थान :** एखाद्या भाषेचे जगातल्या इतर सर्व भाषांमध्ये स्थान काय आहे आणि ती त्यांच्या तुलनेत कुठे आहे, हा ही एक मापदंड ठरु शकतो. जागतिक क्रमवारीत लोकसंख्याबरोबरच, व्यावसायिक क्षेत्रांमध्ये ती भाषा किती कार्यरत आहे. उदा. शासकीय, वैद्यकीय, अभियांत्रिकी, वाणिज्य, शिक्षण, कायदा, जाहिरात आदी, हा निकष अवलंबिला जातो. इतर भाषांची आक्रमणे पेलण्यास समर्थ असेलली, आपली वापरक्षेत्रे वाढवत नेणारी भाषा अर्थातच जागतिक क्रमवारीत आपले स्थान बळकट करते.

समुदायाच्या भाषेच्या स्थितीचे मूल्यांकन करण्यासाठी वरीलपैकी कोणताही एक घटक पुरेसा नाही. तथापि, एकत्र घेतल्यास, हे दहा घटक भाषेच्या विकासाच्या निकषाबरोबरच एखाद्या भाषेची व्यवहार्यता, समाजातील त्याचे कार्य, जतन किंवा पुनरुज्जीवनासाठी आवश्यक असलेले उपायही सुचवितात. पुढील Unesco Language Vitality Index ही भाषिक आकृती यावर अधिक नेमकेपणाने प्रकाश टाकते.




## २आ.६ भाषिक ऱ्हासाची संकल्पना

जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या अभूतपूर्व परिस्थितीत, लोकसमूह आपल्या पारंपरिक भाषांकडे पाठ फिरवून वैश्विक संधीची दालनं खुली करणाऱ्या प्रबळ भाषेचा स्वतःहून स्वीकार करत आहेत. भाषेच्या जगण्या मरण्यापेक्षा लोकांना स्वत:च्या भवितव्याची चिंता अधिक असल्यामुळे जगाचे सांस्कृतिक वैभव असलेल्या शेकडो भाषा नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. दर १४ मिनिटांनी एक भाषा जगाचा निरोप घेत आहे त्यामुळे हा भाषा संहार कसा थांबवायचा हा एक वैश्विक चिंतेचा प्रश्न बनला आहे.

असे सांगितले जाते की गेल्या पाचशे वर्षात जगातील सुमारे अर्ध्याहुन अधिक ज्ञात भाषा विना वापरामुळे मृत पावल्या आणि शिल्लक राहिलेल्या भाषांपैकी अर्ध्याहून अधिक भाषा या शतका अखेरपर्यंत नाहीशा होतील. विशेष म्हणजे ज्या भाषा टिकून राहतील त्यांच्यापैकी फारच थोड्या भाषा सुरक्षित असतील. मायकेल क्रॉस यांच्या मते तर एकविसावे शतक संपेल तेव्हा पृथ्वीवर केवळ ६०० भाषा शिल्लक असतील. म्हणजे सुमारे ९० टक्के भाषा आपण गमावलेल्या असतील.

काही लोक विशिष्ट परिस्थितींमध्ये, विशिष्ट गोष्टींमध्ये त्यांची मातृभाषा बोलतात, उदा. धार्मिक हेतू, फक्त धार्मिक हेतूसाठी ती भाषा वापरतात मात्र इतरांशी संवाद साधण्यासाठी वापरत नाहीत. अशा परिस्थितींमध्ये असा अंदाज वर्तविला जाऊ शकतो की अशा भाषा काही वाजवी कालावधीसाठी व्यवहार्य राहतील.

## २आ.७ भाषिक ऱ्हासांच्या विविध अवस्था किंवा टप्पे

मानवी भाषांची निर्मिती कशी झाली ह्याविषयी जी अनेक उपपत्ती आहेत त्याप्रमाणे भाषांच्या व ऱ्हासाविषयी अनेक मतांतरे आहेत. काहींच्या मते भाषा मरत नाहीत; भाषक मरतात. तर काहींच्या मते भाषा आत्महत्या करत नाहीत; त्यांची स्वभाषकांकडूनच हत्या होते.

खरंतर प्राणीमात्रांना मरण असते तसे भाषांना नसते. त्या अर्थाने भाषा अजरामर असतात. त्या व्यवहारातून लुप्त झाल्या तरी त्यांचे पुनरुज्जीवन शक्य असते. काही भाषांची उत्क्रांती अथवा त्यांच्यात परिवर्तन होऊन त्या इतर भाषांना जन्म देतात. जगातील आजवरच्या सर्व भाषा स्वतंत्रपणे निर्माण झालेल्या नसून त्यांच्यात सजीवांप्रमाणे जैविक नाते आहे. त्यातूनच वेगवेगळी भाषाकुळे निर्माण झाली आहेत.

गेल्या तीस-चाळीस वर्षात भाषांच्या नष्ट होण्याविषयी त्यांचा ऱ्हास होण्याविषयी जो अभ्यास झाला आहे त्यातून अनेक तथ्ये पुढे आली आहेत. यात सर्वात करूण भाग असा आहे की बहुतेक भाषिक समूहांना आपली भाषा मृतप्राय अवस्थेत आहे हे तीव्रतेने शेवटपर्यंत लक्षात येत नाही. कारण त्यांनी आपल्या पारंपरिक भाषेचे अस्तित्व गृहीतच धरलेले असते. पण जेव्हा त्यांच्या लक्षात येते की आपली भाषा खरेच मरणासन्न अवस्थेत आहे तेव्हा ती भाषा वाचवण्याची वेळ निघून गेलेली असते.

ज्या प्रमाणे मनुष्याची हृदयक्रिया बंद पडली की मृत समजला जातो तसे भाषेचे मरण नसते. भाषा अशी एका क्षणात मरत नाही. एखादी भाषा बोलणारी एक जरी व्यक्ती जिवंत असली तरी ती भाषा जिवंत मानली जाते. ती शेवटची भाषक व्यक्ती जेव्हा मरते तेव्हाच ती भाषा मृत झाली असे समजले जाते. भाषेचे अस्तित्व हे सर्वस्वी निजभाषकांवर अवलंबून असते. एखादा भाषक समूह युद्ध, वंशसंहार, साथीचे रोग, भूकंपादी नैसर्गिक आपत्तीमुळे नष्ट झाला तर त्याच्याबरोबर त्याची भाषाही नष्ट होते. पण असे क्वचितच घडते. बहुतेक भाषा प्रदीर्घ काळात सामुहिक उपेक्षेने, उपासमारीने, कुपोषणाने मरतात. नव्हे, मारल्या जातात. भाषेची ही मरणोन्मुख अवस्था अनेक दशकांची, क्वचित शतकांची असू शकते. त्यामुळेच कदाचित भाषेचे अस्तित्व गृहीत धरले जात असावे.

भाषा मरते म्हणजे नक्की काय होते? कोणतीही भाषा जनन, मरण आणि विकास यांबाबतीत स्वयंभू नसते. ती सर्वस्वी संबंधित भाषक समाजवर अवलंबून असते. तिचा ऱ्हास-विकास हा केवळ तिच्या समाजाच्याच हातात असतो. भाषेला सजीवांप्रमाणे नैसर्गिक मृत्यू नसतो. भाषा वृद्धापकाळाने मरत नाहीत कारण त्यांच्या बाबतीत वृद्धत्वच सभंवत नाही. खूप काळ वापरल्यामुळे भाषा जीर्ण होत नाहीत तिचा जास्त वापरल्यामुळे त्यांची झीजही होत नाही. भाषेच्या बाबतीत एकच मंत्र खरा - 'वापरा, नाही तर गमवा'. भाषा कमी वापरल्यामुळे खंगतात आणि अजिबात न वापरल्याने मरतात.

## २आ.८ भाषिक ऱ्हासाची कारणे

जगभरातील भाषांच्या मृत्यूला कारणीभूत असणारी अनेक कारणे आहेत. युद्ध, नरसंहार किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे भाषेचा मृत्यू लवकर होण्याची शक्यता असते. परंतु वर म्हटल्याप्रमाणे भाषेला मरणाच्या वाटेवर नेऊन ठेवण्याचे जे मार्ग आहेत त्यात प्रथम, जर लोक त्यांच्या समाजात त्यांची भाषा बोलेनासे झाले आणि त्यांनी जर ती पुढच्या पिढीकडे दिली नाही तर त्यांची भाषा कमी होत होत मृतप्राय होते. दुसरा महत्त्वाचा मुद्दा असा आहे की जर एखाद्या विशिष्ट भाषेच्या गटास त्यांच्या भाषेमुळे उपजीविका मिळू शकत नाही असे वाटत असेल, तर सहाजिकच ती भाषा त्या गटास हळूहळू असंबद्ध वाटू लागते. तिसरा मुद्दा, आपली भाषा

आपल्याला जगविण्यास सक्षम नाही असे जर त्या लोकसमूहास वाटू लागले तर त्या भाषेवरील विश्वास गमवतात त्या गटाला आपल्या भाषेचे अस्तित्व सुनिश्चित करण्याची इच्छा कमी होते. चौथा मुद्दा असा आहे की, जर भाषा पालकांकडून मूलांपर्यंत गेली नाही तर ती जीर्ण होत जाते. न वापरल्याने जीर्णशीर्ण होऊन ती मरुन जाते. या व्यतिरिक्त, एखाद्या भाषेमध्ये फक्त एक भाषक असेल तर ती जिवंत आहे असे मानले जाते. पण तो शेवटचा भाषक मृत झाला तर मात्र अशा भाषेला नामशेष किंवा मृत समजले जाते.

जेव्हा एखादे भौगोलिक क्षेत्र किंवा राष्ट्र वसाहतकार जिंकतात, तेव्हा जेत्यांची भाषा भाषा असते ती अधिक महत्त्वाची बनते आणि मूळ, देशी लोकांना साहजिकच ती भाषा स्वीकारण्याचा दबाव असतो. तसेच, मूळ भाषिकांना असे वाटू लागते की त्यांना नवीन आलेल्यांच्या भाषा आणि परंपरा आत्मसात करायला हव्यात. कारण नवख्या लोकांच्या भाषेत प्रभुत्व मिळवण्याने नोकरीच्या संधी, सुविधा आणि नवीन उत्पादनांची उपलब्धता यासारखे बरेच आर्थिक फायदे आहेत.

परंतु जेव्हा संपूर्णपणे भिन्न भाषा हीच संभाषणाची भाषा होण्याच्या शक्यता बळावतात, तेव्हा व्यक्ती एखाद्या वेगळ्या देशात स्थलांतर करतात. भाषिक ऱ्हासाचे आणखी एक कारण म्हणजे स्वभाषा बदलणे आणि नवभाषा आत्मसात करण्याची प्रक्रिया. जी सहसा विजय किंवा वसाहतवादामुळे होते. या काळात, ज्यात स्थानिक लोक येणाऱ्या लोकांची भाषा शिकत असताना त्यांची स्वतःची भाषा ठेवतात. परंतु जेव्हा मूळ लोकसंख्येच तरुण पिढी त्यांच्या मूळ भाषेऐवजी नवीन प्रवेश करणाऱ्यांच्या भाषेत अधिक सुलभ होते. तेव्हा ही तरुण पिढी त्यांच्या मातृभाषेकडे दुर्लक्ष करु लागते आणि तिचा किमान वापर करु लागते. तसेच, जेव्हा पालकांकडून त्यांच्या मुलांकडे भाषा प्रसारित केली जात नाही तेव्हा भाषा बोलू शकणाऱ्या लोकांची संख्या कमी होते. म्हणूनच, भाषा हळूहळू अदृश्य होत जाते. नवभाषेच्या व्याकरणात्मक स्वरूपाच्या प्रभावामुळे किंवा त्यातील मोठ्या संख्येने वाक्प्रचार किंवा शब्द समाविष्ट केल्यामुळे देशी भाषेमध्ये बदल होऊ शकतो आणि त्यास सोप्या स्वरूपात बदलले जाऊ शकते. आणि जर मूळ भाषेतील हा बदल थांबविला गेला नाही तर तिचे मूळ स्वरूप गायब होऊन, तिचा ऱ्हास होण्याची शक्यता अधिक असते. जगभरात भाषा जाणूनबुजून चिरडल्या गेल्या आहेत. उदाहरणार्थ, केनियाच्या शाळांमध्ये, कोणत्याही मुलाला (Gikuyu) गिकुयू भाषा बोलताना पकडले गेले तर त्याला, "मी गाढव आहे" किंवा "मी मूर्ख आहे" अशी पाटी गळयात अडकवणे भाग पाडले गेले. दुसरे उदाहरण म्हणजे वेल्श शाळांमध्ये, कोणताही विद्यार्थी शाळेत वा आसपास वेल्स भाषेत बोलताना पकडला गेला तर "वेल्श नाही" असे लिहिलेली पाटी त्या मुलाला दिवसाचा शेवट होईपर्यंत घालावी लागे. भाषा चिरडण्यासाठी अशा समान प्रणाली बऱ्याच ठिकाणी वापरल्या गेल्या; उदाहरणार्थ, ब्रिटनी मधील ब्रेटनः जर या समुदायांमधील शाळेत कोणी त्यांच्या मूळ भाषेत बोलेले तर त्याने त्याचे तोंड साबण आणि पाण्याने धुऊन यायचे. परिणामी काही मूळ भाषकांना त्यांच्या मातृभाषेची लाज वाटते; ते लज्जित होतात आणि आपली मूळ भाषा वापरण्यास टाळाटाळ करतात. याव्यतिरिक्त, त्यांना वाटू लागते की त्यांच्या भाषा निकृष्ट आहेत आणि त्यांना महत्व नाही आणि यामुळेच त्यांची भाषा पुढच्या पिढीकडे जात नाही.

## २आ.१ भाषा नियोजन आणि भाषा विकास

भाषा नियोजन हा समाजभाषाविज्ञानाचा एक महत्वपूर्ण आस्था विषय आहे. शासन व्यवहाराची भाषा, राष्ट्रभाषा, लिपी-शिक्षणाचे माध्यम व भाषा विकासाचे प्रश्न भाषा नियोजन या संकल्पनेत अंतर्भूत आहेत. जागतिकीकरणामुळे शेकडो भाषा नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत अशा अस्तंगत होत जाणाऱ्या भाषांचे जतन आणि संवर्धन कसे करायचे हा एक गंभीर प्रश्न आहे. कारण भाषा ही केवळ संप्रेषणाचे भौतिक प्रगतीचे साधन नसून त्यापकीकडेही तिला एक सामाजिक व सांस्कृतिक भूमिका असते. भाषा ही त्या त्या समाजाची पृथगात्म ओळख असते. समाजाची सांस्कृतिक जडणघडण करणारी ती एक व्यवस्था असते. या पार्श्वभूमीवर भाषिक प्रश्नांवर प्रकाश टाकणाऱ्या आणि त्यांच्या सोडवणुकीचे दिशा दाखवणाऱ्या भाषा नियोजन या समाजभाषा वैज्ञानिक संकल्पनेचा परिचय करुन घेणे उपयुक्त ठरेल.

विशिष्ट बदल किंवा विकास घडवून आणण्यासाठी केलेली पद्धतशीर कालबद्ध कृती म्हणजे नियोजन. भाषा नियोजन या संकल्पनेतील नियोजन या पदाचा अर्थ हा प्रामुख्याने भाषिक परिवर्तनाशी व विकासाशी आहे.

१) भाषिक प्रश्नांची विशेषतः हा राष्ट्रीय स्तरावरील सोडवणूक करण्यासाठी केलेले संघटित प्रयत्न म्हणजे भाषा नियोजन होय - फिशमन

२) दोन नियोजन यंत्रणांनी निर्धारित केलेल्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी एक सामाजिक संसाधन म्हणून भाषा व भाषाव्यवहार यांच्या बद्दलची तसेच जडणघडणीची कृती म्हणजे नियोजन होय - कॅरोल इस्टमन

३) भाषा नियोजन म्हणजे प्रचलित भाषांचे नियमन करण्यासाठी त्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी तसेच प्रादेशिक, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्वरूपाची नवीन सामाजिक भाषा वापरात आणण्यासाठी केली जाणारी पद्धतशीर कृती होय. - वॉल्टरताव्ली

४) भाषा नियोजन ही संकल्पना भाषिक अर्जन, भाषिक संरचना किंवा संकेत व्यवस्थेचे कार्यात्मक वाटप यांच्या संदर्भात संबंधित समाज गटाच्या भाषिक वर्तनावर प्रभाव टाकण्यासाठी केलेल्या जाणीवपूर्वक प्रयत्नांची निगडित आहे - कपूर

थोडक्यात, भाषा नियोजन ही समाजातील भाषिक प्रश्नांची सोडवणूक करणारी, भाषेकडे सामाजिक संसाधन म्हणून पाहणारी एक निर्णयकारी प्रक्रिया आहे.

### भाषा नियोजनाची काही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील

१) भाषा नियोजन ही भाषिक प्रश्न सोडवण्यासाठी जाणीवपूर्वक केलेली कृती आहे.

२) भाषा नियोजन ही केवळ भाषिक प्रक्रिया नसून ती एक व्यापक सामाजिक प्रक्रिया आहे.

३) भाषा नियोजन उद्दिष्टलक्ष्यी, भविष्यलक्ष्यी आणि बहुधा आदेशात्मक असते.

४) भाषा नियोजनामागील प्रेरणा व उद्दिष्टे अनेक विविध असू शकतात.

५) भाषा नियोजन हा भाषिक प्रश्नांना त्यांच्या सोडवणुकीसाठी दिलेला सामुदायिक प्रतिसाद असतो.

भाषा नियोजन ही संज्ञा सर्वप्रथम युराईल वाईनराईस यांनी कोलंबिया विद्यापीठात झालेल्या एका चर्चासत्रात १९५७ मध्ये वापरली पुढे तिचा अधिक विस्तार आयनार, हावगन यांनी केला. फिशमन, रुबिन, येर्नुड, क्लॉस, मोशे, ताव्ली यांनी पुढे आपल्या विचारांनी व विश्लेषणांनी भाषा नियोजनाच्या संकल्पनेत वैशिष्ट्यपूर्ण भर टाकली.

भाषा नियोजनात १. निवड (selection) २. संकेतीकरण (codification) ३. विस्तारीकरण (elaboration) ४. कार्यान्वयन (implementation) ५. मूल्यमापन (evaluation) हे घटक वारंवार चर्चिले जातात.

**भाषा नियोजनाची उद्दिष्टे व कार्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.**

१) भाषिक प्रश्नांची जाणीवपूर्वक व योजनाबद्ध रीतीने सोडवणूक करणे.

२) समाजाच्या भाषा वृत्ती व भाषिक वर्तन यात बदल करणे.

३) भाषा किंवा भाषाभेदांची निवड करणे.

४) भाषेचे प्रमाणीकरण करणे.

५) लेखन पद्धती घडविणे. तीत बदल किंवा सुधारणा करणे.

६) लिपिबदल किंवा लिपिसुधारणा करणे.

७) शब्दसंग्रहाचे आधुनिकीकरण करणे.

८) भाषेचे जतन व संवर्धन करणे.

९) भाषेचा वापर क्षेत्रांचा विस्तार करणे.

१०) भाषिक साधन सामग्री, शब्दकोश, व्याकरण इत्यादी निर्माण करणे.

११) अल्पसंख्यांकांच्या भाषांचे संरक्षण करुन त्यांना भाषिक अधिकार मिळवून देणे.

१२) सामाजिक ऐक्याची व राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करणे. भाषा नियोजनाच्या प्रक्रियेचा तक्ता खालीलप्रमाणे दाखवता येईल.

भाषा नियोजन ही भाषिक प्रश्नांची सोडवणूक करणारी व भाषा व्यवहारात जाणीवपूर्वक बदल घडवून आणणारी एक उपयुक्त सामाजिक प्रक्रिया आहे. पण ही प्रक्रिया पार पाडण्यासाठी नक्की कोणती यंत्रणा अस्तित्वात असते, याविषयी विविध मते आहेत. सरकार, भाषातज्ञ आणि जनता या तिघांच्या भूमिकाही महत्त्वाच्या असतात.

## २आ.१० सारांश

जग जवळ येत चालले आहे तसे जगाच्या भाषिक विविधतेचे अस्तित्वही धोक्यात येऊ लागले आहे. जगातील सहा हजार भाषांपैकी पाच ते दहा टक्केच भाषा सुरक्षित आहेत. २० ते ५० टक्के भाषांची स्थिती वाईट आहे. ४० ते ७५% भाषा मरणोन्मुख स्थितीत आहेत. ज्ञान, इतिहास आणि संस्कृती यांचे संचित असलेली भाषिक विविधता टिकवायची असेल आणि आधुनिक समाजाच्या प्रगत व्यवहारासाठी, भाषा सक्षम बनवायच्या असतील तर इच्छाशक्तीची व सामूहिक प्रयत्नांची गरज आहे अशा प्रयत्नांचा एक विश्वासार्ह मार्ग म्हणजे भाषा नियोजन होय.

**आपली प्रगती तपासा :**

१) भाषेच्या ऱ्हासाची कारणे कोणती ?

## २आ.११ संदर्भग्रंथ व अधिक वाचनासाठी पुस्तके


i. ‘जागतिकीकरण आणि मराठी साहित्य’, - डॉ. गीता मांजरेकर, गुरुकृपा प्रिटंस, माहीम, मुंबई, प्रथमावृत्ती, २०११, पृ. १८,१९

ii. ‘जागतिक समस्या आशय आणि अनुभव’ - सी. प. खेर, दिलीपराज प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, सदाशिव पेठ, पुणे ३०, द्वितीय आवृत्ती जानेवारी २००८, पृष्ठ क्रमांक १०

iii. ‘आमची श्रीवाणी’, अंक - दुसरा, २००८-२००९/- ‘जागतिकीकरण - मराठी भाषा व साहित्यः सद्यस्थिती आणि भवितव्य’ / लेख “जागतिकीकरणात मराठी कविता” - उत्तम कांबळे, प्रकाशक का.स. वाणी प्रगत अध्ययन संस्था, धुळे पृष्ठ क्रमांक ८९

iv. उपरोक्त / बीजभाषण - वसंत आबाजी डहाके / पृ. क्र. १

v. “समाजभाषाविज्ञान - प्रमुख संकल्पना” - डॉ. रमेश वरखेडे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, सप्टे. २०११, पृ. क्र. ६४

vi. भाषा, समाज आणि संस्कृती, - सोनाली देशपांडे - गुजर, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथमावृत्ती २०१७, पृ. क्र. ४८

vii. https://maharashtratimes.indiatimes.com/editorial/samwad/marathi-bhasha/articleshow/51069285.cms

viii. उपरोक्त / भाषा, समाज आणि संस्कृती, - सोनाली देशपांडे - गुजर, पृ.क्र. ५४, ५५

ix. https://www.researchgate.net/figure/UNESCO-Language-Vitality-UNESCO-2009_fig1_330131917

x. https://www.researchgate.net/publication/330131917_WHY_WE_SHOULD_CARE_ABOUT_LANGUAGE_DEATH, Page No. 65

xi. ‘सामाजिक भाषाविज्ञान’ - संपादन : डॉ. जयश्री पाटणकर / भाषा नियोजन - डॉ. प्रकाश परब, स्नेहवर्धन प्रकाशन, द्वितीयावृत्ती, २०१५, पृ. क्र. ३०२

xii. तत्रैव पृ. क्र. ३०३

xiii. तत्रैव पृ. क्र. ३०४, ३०५

xiv. तत्रैव पृ. क्र. ३१२

**अधिक वाचनासाठी पुस्तके व लिंक :**


1. Cobarrubias Juan, Fishman Joshus A (Ed.), Progress Language Planning: Perspectives (1983)
2. Tauli V. - Introduction to a Theory of Language Planning (1968)
3. कालेलकर ना. गो., भाषा आणि संस्कृती, मौज प्रकाशन, मुंबई
4. केळकर अ. रा. वैखरी, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे
5. https://bahuvidh.com/?p=11434


## २आ.१२ घटकावर आधारित नमुना प्रश्न

**दिर्घोत्तरी : २० गुण**

१) भाषा व संस्कृती या दोहोंवर जागतिकीकरणाचा परिणाम कसा होतो ते साधार स्पष्ट करा.

२) भाषेचा विकास म्हणजे काय ते सांगून भाषा विकासाचा पायऱ्या लिहा.

३) भाषेच्या प्रगतीचे निकष वा मापदंड लिहा.

४) भाषिक ऱ्हासाची संकल्पना समजावून देऊन, भाषिक ऱ्हासाची कारणे लिहा.

५) "समाजाच्या प्रगत व्यवहारासाठी, भाषा सक्षम बनवायच्या असतील तर भाषा नियोजन हा एक विश्वासार्ह मार्ग म्हणजे होय." विधानाचा परामर्श घ्या.

**टिपा : १० गुण**

१) भाषा विकास संकल्पना

२) भाषिक ध्रुवीकरण

३) भाषिक ऱ्हासाच्या विविध अवस्था

४) भाषा नियोजनाची उद्दिष्टे वा कार्ये

५) जागतिकीकरण आणि भाषा

❖❖❖❖

# ३अ

# भाषा, प्रमाण भाषा आणि बोला-संकल्पना विचार

**घटक रचना :**

३अ.१ उद्देश

३अ.२ प्रस्तावना

३अ.३ प्रमाण भाषा म्हणजे काय ?

३अ.४ प्रमाण भाषेचे स्वरूप

३अ.५ प्रमाण भाषेची आवश्यकता

३अ.६ प्रमाण भाषा आणि बोली यांच्यातील फरक (प्रमाण भाषा आणि बोली यांचा वापर होणारे क्षेत्र)

३अ.७ भाषा : एक संकेत प्रणाली

३अ.८ भाषेची प्रक्रिया

३अ.९ भ़ाषेची लक्षणे

३अ.१० प्रमाण भाषा म्हणजे काय

३अ.११ बोली संकल्पना

३अ.१२ प्रमाण भाषेचे स्वरूप

३अ.१३ सारांश

३अ.१४ वरील घटकांवर संभाव्य प्रश्नावली

३अ.१५ संदर्भ ग्रंथ

## ३अ.१ उद्देश

- जगामध्ये असंख्य भाषा एकच वेळी बोलल्या जातात.
- मराठी भाषेतील भेदाची ओळख होईल.
- बोलीमध्ये भौगोलिक भेद असणे अपरिहार्य असते. कारण त्या त्या प्रातांचा प्रभाव आणि परिणाम बोलीवर दिसतो.
- बोलीच्या स्थानिक भेदाची माहिती विद्यार्थ्यास मिळेल.
- प्रमाण भाषेमध्ये असंख्य स्थानिक भेद दिसतात. कारण भाषा ही प्रत्येक प्रदेशामध्ये अथवा प्रांतामध्ये भिन्न-भिन्न बोलल्या जाते. विद्यार्थ्यांना ओळख होईल.
- महत्त्वाच्या दस्तऐवजासाठी प्रमाणभाषेचा वापर केला जातो. म्हणून ही वेगवेगळ्या ठिकाणी वापरली जाते.
- ज्ञानार्जनाच्या माध्यमासाठी प्रमाणभाषेचा वापर महत्त्वाचा ठरतो.

- समाजाचे एकसंघ टिकविण्यासाठी अथवा तिचे पालन करण्यासाठी वापरली जाते. इ. या सर्व उद्दिष्टांमधून आपणास तिच्या स्वरूपाचा अभ्यास करता येतो.
- मराठी भाषेचा प्रमाण भाषा आणि बोलीभाषा ची ओळख होईल.
- बोली भाषेच्या संकल्पनेतून आपणास भाषेचा परिचय होईल.
- प्रमाणभाषा ही एकसंग भाषा आहेत. प्रमाणभाषा एका विस्तृत प्रातामध्ये मोठ्या प्रमाणात वापारली जाते. या मुद्दयातून आपल्याला प्रमाणभाषेचे स्वरूप आणि तिची आवश्यकता समजावून घेण्यास सहकार्य होईल.
- प्रमाणभाषा ही समाजातील अनेक वेगवेगळ्या समाज गटाकाडून बोलल्या जाते याची ओळख होईल.

## ३अ.२ प्रस्तावना

जगामध्ये असंख्य भाषा बोलल्या जातात. दर बाराकोसावर भाषा बदलत असते असे भाषेच्या संदर्भात म्हटले जाते. कोणत्याही एका प्रांतात एकच भाषा बोलली जात नाही. तर जगात अनेक भाषांमधून आपले विचार मांडले जातात. यामध्ये मराठी, गुजराती, हिन्दी, पंजाबी, आसामी, तेलगू, मल्यालम, बंगाली, कन्नड, उर्दू, अशा अनेक भाषा बोलल्या जातात. ह्या भाषांचा शब्दसंग्रह उच्चारण पूर्णतः वेगळे असते.

कोणत्याही भाषेमध्ये एकच व्याकरण वापरता येत नाही. प्रत्येक भाषेचा आपला स्वतंत्र भाषाभेद असतो. थोडक्यात भाषा बोलीचा भौगोलिक भेद प्रथमतः लक्षात घ्यावा लागतो. त्याशिवाय आपल्याला त्यामधील बारकावे समजावून घेता येत नाही. यांनतर आपल्याला त्यातील भिन्न भिन्न रूप लक्ष्यात घेता येतात.

प्रमाण म्हणजे शुद्ध. या सगळ्या भिन्न-भिन्न भाषांपेक्षा पूर्णतः वेगळ्या स्वरूपाची भाषा होय. संपूर्ण जगात अनेक प्रकारच्या भाषा बोलल्या जातात. एका प्रांतात अथवा प्रदेशात एकच भाषा बोलली जाते असे नाही तर विविध प्रकारच्या भाषा बोलल्या जातात. उदा. मराठी, कन्नड, गुजराती, बंगाली, सिंधी, आसामी, तेलगू, मल्यालम इ.

जगामाध्ये असंख्य भाषा बोलल्या जातात. म्हणून आपण म्हणत असतो की भाषा ही बारा कोसावर बादलत असते. हे भाषेच्या संदर्भात तंतोतंत लागू पडते. असे भाषेच्या संदर्भामध्ये आपण असे म्हणतो, तेव्हा निश्चित त्यामागे अशी कोणती भूमिका आहेत. ते आपण या मुद्दयात अभ्यासणार आहोत. एकाच प्रातामध्ये वेगवेगळ्या भाषा बोलल्या जातात. जगामाध्ये अनेक भाषांमधून लोक आपले विचात मांडत असतात. या भाषांमध्ये अनेक भाषांचा सामावेश होतो. त्यात मराठी, गुजराती, हिंदी, पंजाबी, आसामी, तेलगु, मल्याळम, बंगाली, कन्नड, उर्दू, अशा अनेक भाषा येतात. या भाषांचा शब्दसंग्रह उच्चारण पूर्णतः वेगवेगळे असतो. त्या त्या भाषेचा प्रभाव त्या प्रांतावार पडलेला असतो. त्यामुळे त्या प्रांतामध्ये त्याच भाषेतुन देवाण-घेवाण करण्यास समाजमान्य मिळालेली असते. त्या लोकांसाठी ती भाषा जास्त सोईची वाटते.कारण ती भाषा त्यांच्या जीवनाचा एक अविभाज्य अंग असल्याने तिला मानवी जीवानातून वेगळे करता येत नाही.

भाषा विज्ञानाच्या कक्षेमध्ये भाषेचा आणि बोलीचा अभ्यास हा तिच्या व्याकरणिक भेदाचा अभ्यास असतो. म्हणून प्रत्येक बोली भाषेचे वेगळे असे व्याकरण हे भाषा विज्ञानामध्ये आपणांस पाहायला मिळते. सर विल्यम जोन्स यांनी इ.स.१७०६ मध्ये कलकत्ता येथील एशियाटिक सोसायटीच्या वार्षिक अधिवेशनामध्ये एका निबंधामध्ये भाषेच्या संदर्भातील दीर्घ स्वरूपामध्ये आपले मत मांडले होते. तेव्हापासून मराठी भाषाविज्ञानाच्या कक्षेमध्ये भाषेचा अभ्यास अतिशय सविस्तरपणे होउ लागला. याच भाषाविज्ञानाचा अभ्यासाला आपण सर्वजण मराठीचा भाषिक अभ्यास म्हणून देखील यासारख्या विषयांमध्ये त्याचा समावेश करतो. या सर्व भाषेसाठी एकच व्याकरण वापरता येत नाही. प्रत्येक भाषेचे असे वेगवेगळे व्याकरण असते. कारण प्रत्येक भाषेच्या बोलीचा भेद दहा वेगवेगळा असतो. प्रत्येक भाषेला आपले स्वतंत्र भाषाभेद असतात. तिला आपला स्वतंत्र भाषाभेद नसला तर त्याच्या भाषेचे व्याकरणिक स्वरूप हे ढासळू शकते. त्यामुळे त्या भाषेला आपला व्याकरणिक भेद स्वतंत्र असावेत. असे आपणांस अभ्यासक म्हणून मान्य कारावे लागते.थोडक्यात भाषा,बोलीचा भौगोलिक भेद प्रथमतः आपण या ठिकाणि अभ्यासणार आहोत. म्हणूनच प्रत्येक सीमा प्रंतावार भाषाहि वेगवेगळ्या बोलल्या जातात. त्याशिवाय आ़पल्याला त्यामधील बारकावे समजुन घेता येत नाही. त्यानंतर आपण त्यातील भिन्नभिन्न स्वरूप देखील लक्षात घेणार आहोत. यानंतर प्रमाणभाषेचे स्वरूप आणि बोलीची संकल्पना आणि प्रमाणभाषेची आवश्यकता या मुद्दयांवर प्रकाश टाकणार आहे.

प्रमाण म्हणजे शुद्ध असा शब्दशः अर्थ न घेता तर भाषेला विशिष्ट असे व्याकरण असते. त्या व्याकरणाला आपण प्रमाणभाषा म्हणतो का ? असा प्रश्न आपल्या मनात निर्माण होतो. तर विद्यार्थी मित्र हो तसे नाही. तर तिच्या स्वरूपाचा आपणांस बारीक अभ्यास करावा लागतो. प्रमाणभाषा म्हणजे शुद्ध. या सागया भिन्न भिन्न भाषांमध्ये पूर्णतः वेगळ्या स्वरूपाची भाषा होय. संपूर्ण जगात अनेक प्रकारच्या भाषा बोलल्या जातात. त्या त्या भाषांप्रमाणे त्या भाषेचा वेगळा असा अभ्यास देखील केला जातो. एकाच प्रांतात अथवा परदेशात एकच भाषा बोलली जाते असे नाही, कारण भाषा ही प्रांतानुसार, विभागानुसार, प्रदेशानुसार बादालत असते. म्हणून बोलीभाषेमध्ये विविधता जाणवते. उदाहरणार्थ मराठी, कन्नड, गुजराती, बंगाली, सिंधी, आसामी, तेलगू, मल्याळम इत्यादी. भाषाचा समावेश यामध्ये होतो.

प्रमाणभाषेच्या संदर्भात महत्वाचे मुद्दे मांडताना आपणांस खालीलप्रकारे वेगळेपण दिसते. खालील प्रमाणभाषेच्या संदर्भामध्ये दिसणारे विविध उपविषयावर आपण प्रकाश टाकणार आहे. प्रमाणभाषा ही शासनाच्या विविध कार्यालयांमध्ये, न्यायालयामध्ये, किमान शिक्षण व्यवहारांमध्ये महत्वाची मानली जाते. याचप्रमाणे भाषेतुन शासकीय कार्यभार किंवा कार्यव्यवहार हा होत असतो. व्यक्ती आपल्या विचारांची देवाण-घेवाण प्रमाणभाषेतून करत असतो. त्या प्रमाणभाषेचे स्वरूप अभ्यासून ती कशा स्वरूपाची असते. कोणत्या भाषेला प्रमाणभाषा म्हणावे तर, त्याची सर्वसामान्य अशी विश्वकोश यामध्ये व्याख्या देखील केलेली आहे. 'एखाद्या परदेशात बोलल्या जाणाऱ्या अनेक बोलींपैकी एखादी बोली ज्या समाजात बोलाली जाते. त्या समाजाच्या ऐतिहासिक, राजकीय, सांस्कृतिक अथवा वर्गीय बोली वर्चस्वामुळे महत्व पावते. तेव्हा तिला प्रमाण बोलीचा दर्जा मिळतो.' (मराठी विश्वकोष खंडः४, पृष्ठ क्र.२२५.) याच प्रमाण भाषेचे स्वरूप अभ्यासताना दत्तात्रय पुंडे म्हणतात , 'एकभाषक समाजाच्या एका गटाकडून किंवा एकभाषक समाजाच्या एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोकांकडून देवाण-घेवाणीसाठी व्यवहारासाठी वापरल्या जाणाऱ्या विशिष्ट भाषिक रूपास बोली म्हणता येईल.' (मराठीचा भाषिकअभ्यास, पृष्ठ क्रमांक १९०) वरील सर्व विवेचनावरून आपणांस प्रमाणभाषेच्या स्वरूपाबद्दल थोडक्यात काही

मुद्दे स्पष्ट होतात. या मुद्दयांचा सविस्तर विचार खालील मुद्दयांत केला आहे.वरील विवेचनाच्या आधारे तिच्या स्वरूपावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न देखील आपण केला आहे. तसेच या अभ्यासाच्या आधारे प्रमाणभाषेचे स्वरूप कशा स्वरूपाचे असते? ते देखील खालील परिच्छेदांमध्ये अभ्यासणार आहेत.

## ३अ.३ प्रमाणभाषा म्हणजे काय?

प्रमाण म्हणजे ज्याला आपण शुद्ध असे म्हणतो. ही समाजामध्ये वेगवेगळ्या समाज गटाकडून प्रमाणबद्ध बोललेली भाषा या संदर्भात द. दि. पुंडे म्हणतात, "भौगोलिक किंवा सामाजिक कारणांमुळे निर्माण झालेल्या विविध भाषा भेदांना सामावून घेणारी त्या त्या समाजाची अशी जी एकसंघ भाषा मानली जाते. तिला 'प्रमाणभाषा' म्हणता येईल. (सुलभ भाषाविज्ञान पृ. १२१) समाजामध्ये अनेक वेगवेगळ्या जातीचे समूह गट असतात. त्यांच्या भाषांना देखील हा नियम लागू करता येईल. उदा. लेवा पाटील समाजाची लेवागण बोली खानप्रदेशातील आहिराणी, चित्तपावन ब्राह्मणांची भाषा इत्यादी. बोली तिच असते फक्त समाज गट वेगळा असतो. याला आपण 'स्थानिक भेद' असेही संबोधतो.

उदा. एखाद्या ग्रामीण माणसाला आपण शुद्ध मराठी भाषा बोला, असे म्हटले तर त्याला प्रयत्न करुनही शुद्ध प्रमाण भाषेत संवाद साधता येऊ शकत नाही. यालाच 'स्थानिक भेद' असे आपण बोलीला भाषाभेद म्हणतो.

हा स्थानिक भेद उच्चारन, शब्द, व्याकरण यातीन प्रकारांतून दिसतो.

| | **वऱ्हाडी बोली** | **प्रमाण भाषा (शुद्ध)** |
|---|---|---|
| उच्चार प्रक्रिया | आगुदर | अगोदर |
| | टुडली | पाटी |
| | डोया | डोळा |
| | खिसळी | खिचडी |

शब्दसंग्रह

| | | |
|---|---|---|
| | हाड्या | कावळा |
| | गदादणे | उकाडा होणे अथवा गरम होणे |
| | भेटणे | मिळणे |
| | साली | मेहुणी |
| | दादला | नवरा |

व्याकरण भेद

| | |
|---|---|
| द्वितीय-चतुर्थी प्रत्यय 'ले' मानसाले, आम्हाले, तुम्हाले | द्वितीय - चतुर्थी प्रत्यय ला माणसाला, तुम्हाला, आम्हाला |
| सहाय्यक धातू म्हणून 'राह' चा वापर जास्त होतो. करुन राह्याला खाऊन राह्याला | 'अस' चा उपयोग करीत आहे, खात आहे |

वरील उदाहरणावरुन आपणास साम्यभेद स्पष्ट होतो.

## ३अ.४ प्रमाण भाषेचे स्वरूप

समाज गटामध्ये असंख्य प्रकारच्या भाषा बोलल्य जातात. यामधील प्रत्येक भाषेमध्ये आपल्याला भाषिक भेद देखील जाणवतो. कारण प्रमाण म्हणजे शुद्ध; हे व्याकरणावर आधारित असणारी भाषा आहे. मात्र बोलीला कोणतेही व्याकरण लागू करता येत नाही. कारण ती जेव्हा निर्माण होते. तेव्हा व्याकरणिक भेदापेक्षा त्या बोली भूगोल जास्त प्राधान्य दिले जाते. मूळात कोणत्याही एका भाषेत अनेक भाषा भेद असतात. उदा. बेळगावची भाषा, पुण्याची पुणेरी, विदर्भातील वऱ्हाडी इ. वरील विवेचनावरुन आपणास बोली आणि प्रमाणभाषेतील फरक लक्षात घेता येतो.

प्रमाणभाषेची व्याख्या करताना या ठिकाणी सर्वमान्य असणारी व्याखेचा आपण विचार करणार आहोत. ऐतिहासिक परंपरा आणि रूढी (समाजातील वेगवेगळ्या परंपरांना मान्य असणारी) यांना केंद्रस्थानी ठेवून एखाद्या प्रदेशातील अथवा राज्यातील सुशिक्षितांच्या (शुद्ध) बोलण्याला 'प्रमाणभाषा' असे म्हटले जाते.

प्रमाणभाषेचे स्वरूप अभ्यासताना सर्वप्रथम तिचा वापर कोण-कोणत्या ठिकाणी अथवा कार्यालयामध्ये, शासनाच्या नियमावलीमध्ये, सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये प्रमाणभाषेचा वापर करणे अधिक सोईचे असते. म्हणून या भाषेचा दर्जा उच्च स्वरूपाचा असतो.

उदा. आकाशवाणी वरील विशिष्ट कार्यक्रमाचे अभिवाचन, वृत्तपत्र, दूरदर्शन, सभा-संमेलने या क्षेत्रात सरास प्रमाणभाषेचा वापर केला जातो. प्रमाणभाषेच्या वापरामुळे भाषिक व्यवहारामध्ये कोणताही अडथळा निर्माण होत नाही. ती भाषा सहज समजावून घेता येते, इतके तिचे स्वरूप साधे सरळ स्वरुपाचे असते.

थोडक्यात प्रमाण भाषेच्या वापरामुळे लेखनात फारशा चूका आढळत नाही. यातून दिल्या जाणारा संदेश समोरच्यांना सहज आकलन करता येण्याजोगा असतो. म्हणून ग्रंथनिर्मितीसाठी प्रमाणभाषेचा वापर केला जातो. यातून आपल्या विचाराशी आदान प्रदान अधिक विस्ताराने करता येण्यास सहकार्य होते.

## ३अ.५ प्रमाण भाषेची आवश्यकता

समाजामध्ये जी एक संघ भाषा बोलली जाते तिला आपण प्रमाणभाषा संबोधतो. या भाषेचा ऐतिहासिक राजकीय, सांस्कृतिक माध्यमामध्ये कशा प्रकारे उपयोग होतो. याचा देखील आपण मागील मुद्यांमध्ये विचार केलेला आहे. प्रस्तुत मुद्यांमध्ये प्रमाणभाषेची आवश्यकता कधी आणि कुठे भासते ? याचा विचार करणे म्हणजेच प्रमाण भाषेची आवश्यकता समजावून घेणे होय.

दैनंदिन जीवन व्यवहारामध्ये स्थानिक बोलीचा वापर केला जातो. मात्र प्रमाणभाषा जेव्हा विशिष्ट जाती गटासाठी आपापसात व्यवहारासाठी वापरली जाते. प्रमाणभाषेत अनेक स्थानिक बोलीचा समावेश होतो. या भाषेमुळे समाजातील एकत्त्व (एकसंघ) टिकून राहण्यास देखील मोलाची मदत होते. प्रत्यक्षात मात्र बोली पेक्षा प्रमाणभाषा अधिक स्थिर असते. प्रसारमाध्यमे, दूरसंचारा मध्ये अधिक वेगाने प्रमाणभाषेचा वापर केला जातो. म्हणून काही भाषावैज्ञानिक प्रमाण भाषेला आदर्श भाषा असेही संबोधतात. म्हणून या भाषेचा उपयोग समाज गटातील विविध पातळ्यांवर केला जातो.

आताच्या काळाचा तर विचार केल्यास प्रमाणभाषेमध्ये असंख्य नवनवीन संज्ञाची भर पडताना दिसते. आपण महाजाला सोबत आपली भाषा देखील जोडताना दिसतो. महाजालामुळे भाषा प्रसार, माध्यमा सोबत चित्रपट, Blog, फेसबुक अशा अनेक सोशल मिडियामध्ये तिचा उपयोग सरास होताना दिसतो. वरील मुद्यांतून आपणास प्रमाणभाषेची आवश्यकता भाषेसाठी किती महत्त्वाची असते याचे महत्व आपणास वरील विवेचनावरुन समजावून घेता येईल.

## ३अ.६ प्रमाणभाषा आणि बोली यांच्यातील फरक

१) प्रमाण भाषेपेक्षा बोली कशी आणि किती वेगळी असू शकते. याचा आपणास अंदाज लावता येत नाही. मात्र बोली ही प्रमाण भाषेची जवळीक साधणारी आणि विविधा दाखवणारी असते.

२) प्रमाण म्हणजे शुद्ध आणि बोली म्हणजे मागासलेले असा आपण विचार केला तर कोणत्याही बोलीला उच्च दर्जा प्राप्त होऊ शकणार नाही.

३) बोलीच्या तुलनेत प्रमाणभाषेचा वापर जास्त प्रमाणात अनेक ठिकाणी कोशवाङ्मय, व्यवहार उपयोगी शासन कार्यामध्ये केला जातो. म्हणून प्रमाणभाषा श्रेष्ठ आणि बोली भाषा कनिष्ठ असे म्हणणे चुकीचे ठरेल.

४) प्रमाणभाषा ही लिपीबद्ध असते. तिला स्वतःची अशी वेगळी वैशिष्ट्ये असतात. मात्र बोलीचा स्वतःची स्वतंत्र लिपी नसते.

५) प्रमाणभाषा ज्या ज्या सीमाक्षेत्रावर वापरली जाते. त्यामध्ये संमिश्र (काही प्रमाणात) बोली भाषेचा वापर केला जातो.

६) प्रमाणभाषा आणि बोली यांचा अभ्यास केंद्रस्थानी ठेवून काही भाषावैज्ञानिकांनी ध्वनीविचार, स्वनिमविचार, पदिमविचार, वाक्यविचार यांचा वर्णनात्मक पद्धतीने व्याकरण दृष्टीकोनातून यथार्थपणे अभ्यास केला पाहिजे.

**आपली प्रगती तपासा :**

१) प्रमाणभाषा व बोलीभाषा यांच्या साम्य भेदाची चर्चा करा.

## ३अ.७ भाषा : एक संकेत प्रणाली

भाषा हा मानवी जीवनातील अतिशय अविभाज्य असा घटक आहे. कारण भाषेच्या माध्यमातून आपण आपले विचार सर्वांसमोर मांडत असतो. भाषेतुन आपण अपल्या मनातील भावना, कल्पना, विचार यांची सांगड एका विशिष्ट संकल्पनेतून तयार करून जोड देत असतो. त्यामुळे या प्रत्येक क्षेत्रामध्ये आपण आपले विचार मांडण्यासाठी भाषेचा वापर करत असतो. एवढेच काय मनामध्ये विचार करण्यासाठी देखील आपण भाषेचा वापर करत असतो. नकळतपणे, आपल्या जीवनातील भाषा एक अविभाज्य घटक बनून जाते. या भाषेचा प्रमाण भाषेमध्ये कसा अभ्यास केला जातो. याचा सविस्तरपणे विचार आपण या घटकांमध्ये करणार आहोत. तसेच भाषाविज्ञानामध्ये भाषा या घटकाला किंवा या विषयाला अनेक अंगाने महत्व प्राप्त झालेले. त्या बारकाव्यांसह विचार आपण या ठिकाणी करणार आहोत.

एखादा मनुष्य आपले विचार मांडण्यासाठी भाषा वापरतो. तेव्हा प्रत्येक विषयाला अनुसार भाषा ही बदलत असते. म्हणजे प्रत्येक विषयामध्ये भाषेचा शब्दसंग्रह हा वेगवेगळ्या रूपात वापरला जातो. उदाहरणार्थ, जेव्हा आपण रस्ता ओलांडताना वाहतूक नियंत्रणाचे म्हणजे वाहन प्रतिरोधक करणाऱ्या दिव्याचे रंग ही वेगवेगळी असतात. त्यानुसार आपल्याला भाषा अवगत करून घ्यावी लागते. तशीच स्काउटची भाषा ही वेगळ्या स्वरूपाची असते. आपल्या ध्वजामध्ये असणाऱ्या रंगाची देखील एक वेगळी भाषा आपल्या मनामध्ये प्रतिबिंबित झालेली असते. अलीकडे ज्या संगणकावर आपण आपल्या शब्दाच्या माध्यमातून आपले विचार मांडत असतो. त्या संगणकाची देखील भाषा आपल्या जीवनाचा एक अविभाज्य घटक झालेला आपल्याला दिसते. अशाच शब्दसंग्रहामधून आपली भाषा ही विकसित होत असते. म्हणून घरामध्ये बोलली जाणारी साधारण बोली आणि कार्यालयांमध्ये वापरली जाणारी व्यावहारिक भाषा यामध्ये बराच फरक असतो. हा बदलाचा आपण अभ्यास करताना आपल्याला लक्षात घ्यावे लागते. तेव्हाच भाषेला एक संकेतप्रणाली आहे. हे देखील आपल्याला लक्षात घ्यावे लागते. विद्यार्थी मित्रहो, आपली भाषा ज्या ध्वनी मधून उच्चारण होते. त्या ध्वनीचा उच्चारण प्रक्रिया आपल्या वागेन्द्रियांच्या रचना नुसार बादालत जाते. ही वागेन्द्रियांची रचना म्हणजे आपला कंठ आणि उच्चारण होय. आपल्या मुलाखती उच्चारण प्रक्रिया ही या ठीकाणी अतिशय महत्वाची असते. कारण जेव्हा एखादा लहान मुल ध्वनी उच्चारण करतो. तेव्हा तो कंठ स्वर, दंत स्वर, ओष्ठ स्वर अशा माध्यमातून आपण ध्वनी उच्चारला करतो. तेव्हा या उच्चारण प्रक्रियेचा देखील उच्चारण प्रक्रियेवर देखील आपणांस लक्ष ठेवावे लागते. नाही तर आपल्या बोली भाषेमध्ये थोडाफार बदल झालेला आपणांस जाणवतो.

भाषा ही विचार विनिमयाचे प्रभावी साधन आणि माध्यम आहे. ज्या माध्यमांमधून मनुष्य आपले विचार इतरांपर्यंत पोचवित असतो. त्या भाषेची संकेतव्यवस्था अभ्यासताना ती मूलतः ध्वनि संकेतावर आधारित असते. हे आपणांस मान्य करावे लागते.कारण हा ध्वनी म्हणजे मानवी मुखावटे निघणारा अतिशय लहान मूलध्वनी होय. हा मूलध्वनी जेव्हा स्वतंत्र येतो. तेव्हा त्याला विशिष्ट अर्थ प्राप्त होत नाहि. उदाहरणार्थ, क,ख,ग, या वर्णापासून कोणताही बोध आपणांस होत नाही. मात्र जेव्हा हे ध्वनी एका सांकेतिक रचनेत येता. तेव्हा त्यांना स्वतःचा अर्थ प्राप्त होत नाहि. मात्र जेव्हा हे ध्वनी एका सांकेतिक रचनेत येतात. तेव्हा स्वतःचा अर्थ प्राप्त होतो. उदाहरणार्थ, क + म+ ल = चिखलात उमलेले फूल असा आपण अर्थ बोध काढतो. अशा वर्णांना जर आपण स्वतंत्रपणे उच्चारण केले, तर त्तातून निश्चित असा अर्थ बोध आपणांस होत नाही. परंतु जेव्हा असंख्य असे अनेक मूलध्वनी एकत्र केले असता, त्यांना आपणांस निश्चित असा अर्थबोध होतो.

भाषा संकेत व्यवस्थेची काही उदाहारण पाहृय या. यावरून आपणांस प्रणाली समजून घेण्यास मदत होईल. उदाहरणार्थ, कमल म्हणजे चिखलात उमललेले सुंदर फुल अशी प्रतिमा आपल्या डोळ्यासमोर उभी राहते. म्हणुन संकेत व्यवस्थेचा जेव्हा आपण अभ्यास करतो, तेव्हा हे ध्वनी हा स्वतंत्र वापरला तर त्याचा निश्चित असा अर्थबोध होत नाही. हा मूलध्वनी हा भाषेतील सर्वात लहान मूलघटक आहे. यालाच आपण मूलध्वनी असे देखील म्हणतो. मूलध्वनी जेव्हा ैकत्र येतात, तेव्हा स्वनिम रचना तयार होते. असे खूप स्वनिम एकत्र आल्यानंतर एक विशिष्ट चित्र किंवा अर्थ किंवा त्यातून एक आशय आपल्या डोळ्यासमोर निर्माण होतो. अशी भाषेची व्यवस्था अतिशय गुंतागुंतीची असते. त्यामुळे या उच्चारण प्रक्रियेमध्ये मूनभूत ध्वनीला अतिशय महत्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. यात मूलध्वनीचा अभ्यास करणे, म्हणजे भाषेची संकेतप्रणाली समजावून घेणे हाोय.

## ३अ.८ भाषेची प्रक्रिया :

भाषेच्या बाबत काही गैरसमजुती भाषा एखाद्या पुस्तकांमध्ये ज्याप्रमाणे छापली जाते. तशीच्या तशी कोणतीही व्यवती भाषेचा वापर करत नाही. त्यामध्ये मानवी मनातील असंख्य विचारांचा मेंदूतून येणारा प्रभाव आपल्या विचारातुन भाषेतून मांडत असतो. त्यामुळे या गैरसमजुती प्ररंभापासून चालत आलेले आहेत. त्यांचा भाषेवर देखील प्रभाव आपल्याला दिसतो. उदाहरणार्थ, एखादे लहान मूल ज्या कुटुंबामध्ये वाढले. त्या कुटुंबाची मायबोली त्याला प्रथमतः बोलता येते. कारण लहानपणापासुन किंवा जन्मापासून त्याच्या कानावर त्या भाषेचे ध्वनी हे त्याच्या कानावर आघात करत असतात. या ध्वनीच्या माध्यमातून ती भाषा तो अवगत करत असतो. त्या कुटुंबाची भाषा त्या मुलाला सहजरित्या अवगत होते. त्या भाषेचे ज्ञान त्याला वेगळे असे द्यावे लागत नाहि. घाषेचा अभ्यास करताना आपल्याला या ठिकाणी दुसरी असेही सांगितले जाते. जे आपण नेहमी बोलतो, ते जसेच्या तसे लिखित भाषेचे स्वरूप हे पूर्णतः वेगळे असते. त्यामध्ये उच्चारलेल्या ध्वनीचा सविस्तरपणे शुद्ध वापर आपल्याला करावा लागतो. पण जेव्हा कोणताही मनुष्य आपले विचार बोलीतुन मांडतो. तेव्हा त्याच्या सोयीनुसार त्या भाषेचा वापर तो करत असतो. त्या ठिकाणी व्याकरण हे वापरलेच पाहिजे असे महत्वाचे असते.

भाषा ही ध्वनी उच्चारण प्रक्रियेपासुन बनलेली एक संकेतप्रणाली आहे. त्यामुळे भाषेला एक लिपीबद्ध चिन्ह व्यवस्था उच्चारण प्रक्रियेसाठी वापरावी लागते. या व्यवस्थेचे उत्तम उदाहरण आपल्याला स्वनिम विचारांमध्ये वागेंद्रियांची रचना या मुद्दयांमध्ये सविस्तरपणे अभ्यासल्या जाते. या प्रक्रियेमध्ये वागेंद्रियाच्या माध्यमातून कोणता ध्वनी कशाप्रकारे उच्चारला जातो. त्याची सविस्तरपणे माहिती दिलेली असते. ही उच्चारण प्रक्रिया भाषा या भाषेसाठी अतिशय महत्वाची अशी व्यवस्था मानली जाते. भाषा हे परंपरानिष्ठ अशी लेखन प्रणाली आहे. त्यामुळे आपण जरी उच्चारण प्रक्रियेमध्ये बदल केला तरी काही विशिष्ट शब्दांमध्ये बादल करता येत नाही.

उदाहरणार्थ, ब्रह्म या शब्दाचे उदाहरण आपण याठिकाणी घेऊ या. उच्चारण आणि लेखन या दोन्ही प्रक्रियेमध्ये तफावात असली तरी लिखित भाषेमध्ये त्याचा वापर आपल्याला ब्रह्म असाच करावा लागतो. त्याला आपण ब्रम्ह अस म्हणू शकत नाही. वरील विवेचनावरून आपणांस हे सिद्ध होते, की भाषेचे एक विशिष्ट व्याकरण असते. त्या व्याकरणानुसार भाषाही शिस्तबद्ध संकेत प्रणाली उच्चारण प्रक्रिया ध्वनी आणि उच्चारण लेखन ह्या मुद्दे यातुन अतिशय सविस्तरपणे आपण भाषेचा वापर करत असतो. यामध्ये परंपरानिष्ठ आणि आदेशात्मक या दोन्ही मुद्दयानचा विचार आपणांस भाषेमध्ये करावा लागतो. त्यामुळे भाषा कुठल्याही श्रेष्ठ, कनिष्ठ विचार नसते. त्यामध्ये कोणतीही श्रेणी एच्च किंवा निम्नस्तरीय अशा नसतात. या भाषेच्या संदर्भातील ज्या गैरसमजुती आहे. त्या आपल्याला मान्य काराव्या लागतात. भाषा ही कशा स्वरूपाची असते. ती आपण कशी वापरतो, याचा विचार आपण पुढील मुद्दयामध्ये करणार आहोत.

## ३अ.९ भाषेची लक्षणे :

भाषा एक संकेत प्रणाली आहे. मानवी जीवन अनेक अर्थाने समृद्ध आहे. मानवाच्या मेंदुला अनेक प्रश्न पडतात. तेव्हा मानवी मन वेगवेगळ्या विचारांचा, भावनांचा पाठलाग करत असतो. या शोधातून मानवी मन असंख्य घेत असतो. या शोधाच्या निर्मिती प्रक्रियेतून भाषा ही वेगवेगळ्या अंगाने अभिव्यक्त होत असते. मानवी मन आपला प्रत्येक विचार आपल्या भाषेतुन व्यक्त करत असतो. त्यामुळे माणूस जरी आपल्या समोर बोलत नसला तरी, त्याच्या मनाशी चाललेला त्याचा संवाद हा अनंतकाळ सुरू असतो. दिवसभरामध्ये कित्येक वेळा आपण आपल्या मनाशी संवाद साधत असतो. याची आपणास कल्पना करता येणार नाही. त्यामुळे या प्रक्रियेला साधननिर्मिती ( tool making capacity) देखील भाषा विज्ञानाच्या कक्षेमध्ये संबोधले जाते. याच वेगळेपणामुळे भाषेची काही लक्षणे आपणांस आढळतात. त्या लक्षणांचा खालील मुद्दयांमध्ये विचार करणार आहेत. भाषा वैज्ञानिकांनी भाषेची पुढील सात लक्षणे ही मान्य केलेली आहेत. या लक्षणांचे स्वरूप अभ्यासून त्यांचे भाषेमध्ये कितपत महत्वाचे स्थान असते. त्यावर चर्चा आपण खालील मुद्द्यांमध्ये केली आहे.

### १) स्तरीय रचना :

ही एक भाषेची लक्षण (द्विस्तरीय रचना) आहे. म्हणजे या रचनेत भाषेतील मूलद्रव्यांची संख्या कमीत कमी ३० आणि जास्तीत जास्त ७० च्या आसपास असते. या मूलध्वनींना स्वतःचे अर्थ नसतात. मूलध्वनी म्हणजे भाषेतील सर्वात लहान घटक होय. हे आपण मागील घटकांमध्ये

व्यवस्थितरित्या अभ्यासले आहे. या ध्वनींचा जेव्हा एक गट तयार होतो, तेव्हा विशिष्ट असा अर्थ प्राप्त होतो. या गटाचे स्वरूप कशा स्वरूपाचे असते, ते पुढील उदा. मधये पाहूया.

उदाहरणार्थ, कान = क + आ + न थोडक्यात या ध्वनींच्या गटामुळे आपल्याला निश्चित असा एक अर्थ बोध होतो. त्यामुळे द्विस्तरीय रचना हा भाषेचे एक महत्वाचे लक्षण मानावे लागते.

**२) नवनिर्मित :**

निर्मितीशीलता हे देखील भाषेचे एक महत्वाचे लक्षण मानले गेले आहेत. भाषेमध्ये असंख्य नवनवीन प्रयोग मनुष्य करू शकतो. आणि मनुष्याकडे ही प्रतिभा उपलब्ध असल्यामुळे तो अमर्यादित रचना निर्माण करून आपले विचार विनिमयाचे माध्यम अतिशय प्रभावी करू शकतो. त्यामुळे भाषा संदर्भामध्ये हे लक्षण अतिशय महत्वाचे असे आहे.

**३) यादृच्छिकता :**

अर्थ दृष्ट्या एखाद्या रूपिमला साचेबद्ध अर्थामध्ये बसविण्याचे कार्य यादृच्छिकता करत असते. यामुळे भाषा नेहमी नव संकेत मान्य करत असते. त्यामुळे भाषेमध्ये विविधता आणि आशय सूचकता प्राप्त होते. अर्थपरिवर्तन आणि ध्वनीपरिवर्तन हे यादृच्छिकतामुळे निर्माण होते. त्यामुळे हे भाषेचे लक्षण अतिशय महत्वाचे असे आहे.

**४) अदलाबदल :**

भाषा ही नेहमीच नवनवीन कल्पना स्वीकारत असते. बोलणाऱ्या भाषिक रचना ऐकुन आपण नवनवीन संकल्पना शिकत असतो. मानव हे अनुकरणातुन यामुळेच करतो. त्यामुळे या बदलामुळे भाषा ही अधिक समृद्ध होऊन आदान प्रदान करण्यामध्ये सक्षम होते.

**५) विशिष्टता :**

प्राण्यांच्या तुलनेमध्ये मनुष्य हा नेहमीच आपल्या कृतीतुन अनेक चांगल्या बऱ्या-वाईट घटनांची संदेश निर्मिती करत असतो. त्यामुळे एक विशिष्ट अशी रचना या लक्षण आतून विकसित होत जाते.

**६) स्थलकालातीत :**

भाषा हे स्थलकालानुसार बदलत असते. जर ती नाही बदलली तर त्यामध्ये तोच तोचपणा आणि साचलेपणा निर्माण होू शकतो. त्यामुळे भाषेच्या अभिवृद्धीसाठी ही बाब अतिशय महत्वाची मानली गेलेली आहे.

**७) सांस्कृतिक पदार्पण :**

हा वारसा भाषेच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्वाचा असा आहे. कारण एका पिढीकडुन दुसऱ्या पिढीकडे आदानप्रदान करण्याची जी काही संस्कृती आहे. ती पूर्वापार चालत आलेली आहेत. संस्कृतीचे जतन करण्यासाठी हे विचार अतिशय महत्वाचे मानले गेलेले आहेत. अगोदरच्या पिढीने काही ज्ञानसंचय निर्माण करून पुढील पिढीला त्याचे ज्ञान उपलब्ध करून देणे. हा वारसा आपल्याला प्रत्येक मनुष्याच्या जीवनामध्ये घडत असलेला दिसतो.त्यामुळे हे लक्षण भाषेच्या विकासासाठी अतिशय महत्वपूर्ण ठरते.

## ३अ.१० प्रमाण भाषा म्हणजे काय ?

प्रमाण म्हणजे ज्याला आपण शुद्ध असे म्हणतो ही समाजामध्ये वेगवेगळ्या समाज गटाकडून प्रमाणबद्ध केलेली भाषा असते. याच प्रमाण भाषेचे स्वरूप अतिशय सविस्तरपणे अभ्यास करणार आहोत. ही प्रमाणभाषा बोलीभाषेपेक्षा वेगळ्या स्वरूपाची असते. कोणताही व्यक्ती समाजामध्ये वावरताना प्रमाण भाषेतुन आपल्या विचारांची देवाण-घेवाण करतात. एकाच प्रदेशात राहणारी सर्व माणसे एक सारखी भाषा बोलतात असे नाही. तर प्रत्येक गटानुसार भाषा वेगवेगळी वापरली जाते. यामध्ये वर्णभेद, जातिभेद याचा देखील प्रभाव परिणाम दिसून येतो. उदाहरणाथ। लेवागण बोली, बागलाणी बोली याचे उदाहरण आपणास याठिकाणी सांगता येईल.

भाषा ही बारा कोसावर बदलत असते. प्रत्येक प्रातातील भाषेच्या भाषेची लकबी वेगळी असते. बोलण्याची शैली वेगळी असते. भाषाही कालपरत्वे, स्थानपरत्वे, प्रसंगानुसार, व्यक्तिनुसार बदलत असते. थोडक्यात भौगोलिक अंतरामुळे ज्याप्रमाणे एकाच भाषेचे वेगवेगळे स्वरूप आपल्याला दिसते. तसेच सामाजिक अंतरामुळे देखील दिसले. यामागे भाषाभेद अभ्यासणे हा देखील एक महत्वाचा मुद्दा या ठिकाणी आपणांस दिसतो. भाषा भेदामध्ये त्या प्रमाणभाषेचा रीतसर अभ्यास केला जातो. त्या अभ्यास पद्धतीला भाषाभेद असेही म्हटले जाते. ही भाषेच्या संदर्भातील महत्वाची यंत्रणा असते. जी भाषेला एका वेगळ्या शिस्तबद्ध स्वरूपामध्ये उपयोजन केली जाते. यासंदर्भात द. दि. पुंडे म्हणतात, भौगोलिक किंवा सामाजिक कारणांमुळे निर्माण झालेल्या विविध भाषा वेदांना सामावून घेण्यारी त्या त्या समाजाची अशी जी एकसंघ भाषा मानली जाते, तिला प्रमाणभाषा म्हणता येईल. (सुलभ भाषाविज्ञान पृष्ठ क्रमांक १२१.) समाजामध्ये अनेक वेगवेगळ्या गटाचे समुह असतात. प्रत्येक समुहाची वेगवेगळी भाषाही असते. त्या भाषांना देखील एक वेगळा नियम लागू करता येईल.

उदाहरणार्थ, प्रत्येक गटाच्या बोलीला एक वेगळे असे व्याकरणिक भेद आपल्याला दिसतात. त्या व्याकरणिक भेदाला नियम असेही संबोधले जाते. उदाहरणार्थ, जळगावकडे लेवा पाटील समाजाची लेवा गणबोली ही भाषा प्रचलित आहेत. तर दुसरीकडे खानदेशात अहिराणी भाषा बोलली जाते. त्यात सोबतीला अहिराणी बोली देखील बोलली जाते. चित्पावन ब्राह्मणांची भाषाही वेगळ्या स्वरूपाची असते. असा या भेदाला स्थानिक भेद असेही म्हटले जाते.

उदाहरणार्थ, एखाद्या ग्रामीण माणसाला आपण शुद्ध मराठी भाषा जेव्हा बोलायला सांगतो. तेव्हा प्रयत्न करून देखील त्याला शुद्ध प्रमाण भाषेमध्ये आपला संवाद साधता येऊ शकत नाही. कारण त्याच्या मनावर किंवा त्या भाषेवर स्थानिक भाषा भेदाचा हा प्रभाव पडत असतो. या घटनेला स्थानिक भेद असेही म्हटले जाते. बोली भाषेमध्ये हा संपूर्ण जो अभ्यास आहे. तो स्थानिक वेळेनुसार केला जातो. हा स्थानिक भेद उच्चारण आणि शब्दसंग्रह आणि व्याकरण या तिन्ही प्रकारांमधून दिसतो. याचा सविस्तर विचार आपण खालील तक्त्यामध्ये करणार आहोत. जेव्हा प्रमाणभाषेचा आपण अभ्यास करतो. तेव्हा उच्चारण आणि भेद या दोन्हीही गोष्टी आपणांस लक्षात घ्याव्या लागतात. त्याशिवाय आपल्याला प्रमाणभाषेचा अभ्यास हा सूतबद्ध पद्धतीने करता येत नाही. कोणत्याही भाषेचा अभ्यास करताना या बारीक गोष्टींचा वोचार करावा लागतो.

प्रमाण भाषा आणि बोली यांचे स्वरूप अभ्यासकांना उच्चारण, व्याकरण, व शब्दसंग्रह ह्या तीनही बाबी महत्वाच्या ठरतात. कारण आपल्या आकलन क्षमतेमध्ये कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊ नये. यासाठी या तीन गोष्टींचा वापर आपण करत असतो. तेव्हा उच्चारण आणि शब्दसंग्रह प्रकारांमध्ये प्रांत बदलल्यानंतर थोडा भाषेच्या लकबीमध्ये त्याचा परिणाम आपणास दिसतो.

म्हणुन वरील मुद्यामध्ये आपण स्पष्ट केलेले आहे की, समूह गटानुसार प्रत्येक जातीची बोली ही वेगवगळी असते. आणि हा नियम सर्व भाषांना लागू पडतो. उदाहरणार्थ, ग्रामीण माणुस आपण नेहमी शुद्ध बोलण्याचा प्रयत्न करतो. परंतु सरावामुळे त्याला ती गोष्ट व्यवस्थित रित्या बोलता येणे शक्य होत नाही. कारण त्याच्या भाषेवर तेथील बोलीचा प्रभाव जबरदस्त असतो. यालाच भाषाविज्ञानाच्या किंवा प्रमाण भाषेमध्ये "स्थानिक भेद" असेही आपण म्हणतो. हा भेद बोलीभाषेला अतिशय महत्व प्रप्त करून देतो. कोणत्याही बोलीचा आपणांस अभ्यास करायचा असल्यास तिचे व्याकरणिक स्थानिक भाषाभेद अभ्यासून तिचे स्वरूप आपणांस उलगडून दाखविता येते.

| | वऱ्हाडी बोली | प्रमाण भाषा (शुद्ध) |
|---|---|---|
| उच्चारण प्रक्रीया | | |
| | आगुदर | अगोदर |
| | टुडली | पाटी |
| | वसरी | ओसरी |
| | डोया | डोळा |
| | खिसळी | खिचडी |
| शब्दसंग्रह | | |
| | हाड्या | कावळा |
| | गदादणे | उकडा होणे अथवा गरम होणे |
| | भेटणे | मिळणे |
| | साली | मेहूणे |
| | दादला | नवरा |

अशी त्या-त्या प्रांतानुसार तेथील शब्द हे बदलत असतात. म्हणून मराठीमध्ये प्रचलित असलेल्या सर्व बोलींचा स्वतंत्रता शब्दसंग्रह उपलब्ध असलेला आपणास दिसरो. या शब्दसंग्रह करून आपण त्ता त्या बोलीचा वापर करू शकतो. या बोली मध्ये व्याकरणिक भेद कशा स्वरूपाचा असतो, तो खालीलप्रमाणे-

**१) वऱ्हाडी बोली -** द्वितीया-चतुर्थी प्रत्यय'ले'उदा. मले, गोविंदाले, मानसाले

या धातूचे प्रथमपुरूषी एकवचनी रूप मी आहे. साहाय्यक धातू म्हणून'राह'चा वापर करून राह्यला निजून राह्यला असा व्याकरणिक फरक जाणवतो.

**२) प्रमाण भाषा(शुद्ध)** -द्वितीया-चतुर्थी प्रत्यय'ला' उदा.मला,गोविंदाला,माणसाला या धातूचे प्रथमपुरूषी एकवचनी रूप मी आहे.

साहाय्यक धातू म्हणून 'अस'चा वापर करीत आहे. निजला आहे, असा व्याकरणिक फरक जाणवतो.

प्रमाणभाषा आणि बोली यांचा अभ्यास करताना मुख्य भाषा आणि तिच्या बोलीचे चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे राहिले की, एखादी वस्तू किंवा तिच्या अवतीभावती असता असणारे चित्र मिळते. असे दृश्य आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. या संपूर्ण दृश्याचे चित्रण करण्यासाठी मानवी मन आपल्या भाषेचा उपयोग करतो. हा वापर करताना त्याला सवय झालेली असते. ज्याप्रमाणे आपण श्वास घेतो, तेव्हा आपण प्रत्येक श्वासावर नियंत्रण ठेऊ शकत नाही. तसाच भाषेचा देखील वापर आपण जेव्हा करतो, तेव्हा प्रत्येक शब्दावर, वाक्यावर आपण नियंत्रण ठेऊ शकत नाही. ही घटना सहज घडत असते. मात्र जेव्हा आपले श्वास घेण्याची प्रक्रिया बंद होते, तेव्हा मात्र आपण त्या घटनेला अधोरेखित करतो. तेव्हा आपल्या आपले श्वास घेण्याच्या कृतीकडे जाणीवपूर्वक लक्ष जाते. जेव्हा भाषा पण भाषेचा वापर करत असतो. तेव्हा आपण कोणत्या शब्दाचा कोणत्या उच्चारणाचा कोणत्या ध्वनीचा कशाप्रकारे वापर करतो. हे देखील तितकेच महत्वाचे असते. या संपूर्ण बाबीचा भाषेमध्ये अतिशय बारकाईने विचार केला जातो. म्हणून आपण जे बोलतो तेव आपणांस लिहिता येत नाहि. यालाच प्रमाण किंवा शुद्ध असेदेखील म्हटले जाते.

## ३अ.११ बोली संकल्पना

मूलतः बोली ही मोठ्या समाजगटामध्ये बोलली जाते. समाजाच्या एका गटाकडून दुसऱ्या समाज गटाशी भाष्य करण्याचे साधन म्हणजे 'बोली भूगोल' किंवा 'बोली' होय. यावरुन 'बोली' ची व्याख्या साधारणतः अशा स्वरूपात केली जाते.

दैनंदिन व्यवहारांसाठी वापरल्या जाणाऱ्या समूह गटाला 'बोली' असे संबोधतात. डॉ. ना.गो. कालेलकर या संदर्भात म्हणतात. 'बोली' हे दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन आहे. परिस्थितीला अनुरुप असा भाषिक सामुग्रीचा ती उपयोग करते. मुख्य परंपरेने आल्यामुळे तिच्या अंगी एक प्रकारचा जीवंतपणा असतो. ती साधी पण परिणामकारक असते. तिची स्वाभाविकता हेच तिचे वैशिष्ट्य. (ना. गो. कालेलकर, भाषा : इतिहास आणि भूगोल, मुंबई- १९६४, पृ.९१)

वरील विवेचनावरुन आपणास बोलीची संकल्पनाबद्दल स्पष्ट होण्यास मदत होईल. सारांश, बोलीचा उपयोग प्रशासकीय कामकाजामध्ये करता येत नाही. म्हणून बोलीला स्वतंत्र अस्तित्व निर्माण करता येणार नाही. मात्र बोली जेव्हा आपल्या व्याकरणिक भेद सादर करते. तेव्हा तिचा निर्देश आपण करु शकतो. उदा. खानदेशी बोली, वागलापणाची बोली (नाशिक मध्ये ही भाषा मोठ्या प्रमाणात वापरली जाते) इ.

या मुद्यांची चर्चा बोली भाषेच्या प्रकरणामध्ये आपण सविस्तर या विषयावर चर्चा करणार आहोत.

बोली संकल्पना अभ्यासताना त्यांच्या संदर्भात मूलभूत कारण मीमांसा आपल्याला लक्षात येतात.

आपण ज्या समाज व्यवस्थेमध्ये राहतो. त्या समाज मनाचा आपल्यावर नकळत पडसाद दिसत असतात. उदा. स्थळ, काळ, परिस्थिती यांचे या ठिकाणी आपण उदाहरण घेऊ शकतो. काव्यानुसार समाज जीवन बदलते तशी भाषा ही बदलते.

सारांशः बोलणाऱ्या जास्तीत जास्त लोक समूह गटांची बोली मोठ्या प्रमाणात वापरली जाते. म्हणून डॉ. कालेलकर बोलीच्या स्वरूपाविषयी सांगतात, 'बोली' हे दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन आहे. परिस्थितीला अनुरुप अशा भाषिक सामग्रीचा ती उपयोग करते. मुख्य परंपरेने असल्यामुळे तिच्या अंगी एक प्रकारचा जीवंतपणा असतो. ती साधी पण परिणामकारक असते. आपले रूप प्रतिष्ठेच्या आरशात पाहून इतरांना ते आकर्षण वाटेल असे करण्याचा प्रयत्न करायला तिला वेळ नसतो. तिची स्वाभाविकता हेच वैशिष्ट्य. (भाषा इतिहास, भूगोल - १९६४, पृ. ९१)

**आपली प्रगती तपासा :**

१) प्रमाण भाषा म्हणजे काय ?

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

मूलतः बोली समाज गटांमध्ये बोलली जाते. दैनंदिन व्यवहारासाठी आपण बोलीचा वापर करत असतो. त्याच भाषिक रूपाला बोली असे म्हणतात. माणूस समाजव्यवस्थेमध्ये वावरतो. त्या समाजव्यवस्थेमध्ये आपले विचार मांडण्यासाठी तो आपली बोली भाषा वावरत असतो. त्यामुळे साहजिकच स्थल, काल आणि परिस्थिती या तीनही बाबींचा पडसाद त्याच्या विचारसरणीवर दिसतो. प्रत्येक गटामध्ये बोलली जाणारी भाषा ही वेगवेगळ्या स्वरूपाची असते. त्यामुळे राजकिय, सामाजिक, आर्थिव। व्यावहारिक, शैक्षणिक अशा कोणत्या गटांमध्ये ती भाषा बोलली जाते. तेव्हा त्या भाषेतील शब्दसंग्रह आणि तिच्या बोलण्याचे स्वरूप हे वेगवेगळ्या प्रकारचे असते. समाजाच्या एका गटाकडून दुसऱ्या समाजगटाशी भाष्य करण्याचे साधन म्हणजे 'बोली भूगोल' किंवा 'बोली' होय. यावरून 'बोली'ची व्याख्या साधारणतः अशा स्वरूपात केली जाते.

दैनंदिन व्यवहारांसाठी वापरल्या जाणाऱ्या समूह गटाला 'बोली' असे संबोधतात. 'बोली' हे भाषेच्या दृष्टीने अतिशय महत्व पूर्ण बाब आहे. डॉ. ना.गो.कालेलकर या संदर्भात म्हणतात. 'बोली' हे दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन आहे . परिस्थितीला अनुरूप असा भाषिक सामुग्रीचा ती उपयोग करते. मुख्य परंपरेने आल्यामुळे तिच्या अंगी एक प्रकारचा जिवंतपणा असतो. ती साधी पण परिणामकारक असते. तिची स्वाभाविकता हेच तिचे वैशिष्ट्य. (ना.गो.कालेलकर, भाषाःइतिहास आणि भूगोल, मुंबई-१९६४, पृ.९१)

वरील विवेचनावरून आपणांस बोलीची संकल्पनाबद्दल स्पष्ट होण्यास मदत होईल. सारांश, बोलीचा उपयोग प्रशासकीय कामकाजामध्ये करता येत नाही. म्हणून बोलीला स्वतंत्र अस्तित्व निर्माण करता येणार नाही. मात्र बोली जेव्हा आपल्या व्याकरणिक भेद सादर करते.

तेव्हा तिचा निर्देश आपण करू शकतो. उदा. खानदेशी बोली,बागलाणची बोली(नाशिक मध्ये ही भाषा मोठ्या प्रमाणात वापरली जाते.) इ. मुद्यांची चर्चा बोली भाषेच्या प्रकरणामध्ये आपण सविस्तर या विषयावर चर्चा केली.

बोली संकल्पना अभ्यासताना त्यांच्या संदर्भात मूलभूत कारण मीमांसा आपल्याला लक्षात येतात. आपण ज्या समाजव्यवस्थेवर राहतो. त्या समाज मनाचा आपल्यावर पडसाद दिसत असतात.उदा. स्थळ, काळ, परिस्थिती यांचे ठिकाणी आपण उदाहरण घेऊ शकतो. काव्यानुसार समाज जीवन बदलता तशी भाषा ही बदलते. साराशः बोलणाऱ्या जास्तीत जास्त लोकसमूह गटांची बोली मोठ्या प्रमाणात वापरली जाते. म्हणून डॉ. कालेलकर बोलीच्या स्वरूपाविषयी सांगतात,'बोली' हे दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन आहे. परिस्थितीला अनुरूप अशा भाषिक सामग्रीचा ती उपयोग करते. मुख्यतः बोलीची संकल्पना भाषेच्या क्षेत्रातील महत्वाची संकल्पना आहे. बोलीचा वापर अनेक स्थानिक स्तरावार केला जातो. त्यामुळे बोलीमध्ये विविधता दिसून येते. इतकेच काय तर भौगोलिक सीमापर्यंत बोली व्यवहार विनिमयाचे साधन म्हणून वापरले जाते. त्यामुळे त्यामध्ये जीवंतपणा हे विशेष दिसून येते. मूळातच तिचे क्षेत्र खूप कमी क्षेत्रामध्ये व्याप्त असते. थोडक्यात, प्रमाण भाषेच्या संदर्भात महत्वाचे निकष नोंदवायचे असल्यास (अभ्यासाअंती) प्रमाणभाषा विस्तृत परिसरात वापरली जाते. तिला सीमांचे बंधन पाळावी लागतातबिभन्न-भिन्न समान गटांमध्ये बोली भाषा बोलली जाते. कार्यालयीन स्तरावर आपण नेहमी प्रमाणभाषेचा उपयोग करतो. तर दैनंदिन व्यवहारासाठी आपणांस बोली भाषा अतिशय जिव्हाळ्याची वाटते.

## ३अ.१२ प्रमाण भाषेचे स्वरूप आणि आवश्यकता :

समाज गटांमध्ये असंख्य प्रकारच्या भाषा बोलल्या जातात. यामधील प्रत्येक भाषेमध्ये आपल्याला भाषिक भेद देखील जाणवतो. कारण प्रमाण म्हणजे शुद्ध; हे व्याकरणावर आधारित असणारी भाषा आहे. मात्र बोलीला कोणतेही व्याकरण लागू करता येत नाही. कारण ती जेव्हा निर्माण होते. तेव्हा व्याकरणिक भेदापेक्षा त्या बोली भूगोल जास्त प्राधान्य दिले जाते. मूळात कोणत्याही एका भाषेत अनेक भाषा भेद असतात. उदा. बेळगावची भाषा, पुण्याची पुणेरी, विदर्भातील वऱ्हाडी इ. वरील विवेचनावरून आपणांस बोली आणि प्रमाणभाषेतील फरक लक्षात घेता येतो. प्रमाणभाषेतील फरक लक्षात घेता येतो. प्रमाणभाषेची व्याख्या करताना या ठिकाणी सर्वसामान्य असणारी व्याख्येचा आपण विचार करणार आहोत. ऐतिहासिक परंपरा आणि रूढी (समाजातील वेगवेगळ्या परंपरांना मान्य असणारी) यांना केंद्रस्थानी ठेऊन एखाद्या प्रदेशातील अथवा राज्यातील सुशिक्षितांच्या (शुद्ध) बोलण्याला'प्रमाणभाषा'असे म्हटले जाते. प्रमाणभाषेचे स्वरूप अभ्यासताना सर्वप्रथम तिचा वापर कोण-कोणत्या ठिकाणी अथवा कार्यालयामध्ये प्रमाणभाषेचा वापर करणे अधिक सोईचे असते. म्हणून या भाषेचा दर्जा उच्च स्वरूपाचा असतो. उदा. आकाशवाणी वरील विशिष्ट कार्यक्रमाचे अभिवाचन, वृत्तपत्र, दूरदर्शन,सभा संमेलने या क्षेत्रामध्ये सर्रास प्रमाणभाषेचा वापर केला जातो. प्रमाणभाषेच्या वापरामुळे भाषिक व्यवहारामध्ये कोणताही कोणताही अडथळा निर्माण होत नाही. ती भाषा सहज समजावून घेता येते, इतके तिचे स्वरूप साधे सरळ स्वरूपाचे असते.

थोडक्यात प्रमाणभाषेच्या वापरामुळे लेखनात फारशा चुका आढळत नाही. यातून दिला जाणारा संदेश समोरच्यांना सहज आकलन करता येण्याजोगा असतो. म्हणून ग्रंथ निर्मितीसाठी प्रमाण भाषेचा वापर केला जातो. त्यातून आपल्या विचारांची आदानप्रदान अधिक विस्ताराने करताना सहकार्य होते. प्रमाणभाषेची आवश्यकता समाजामध्ये जी एकसंध भाषा बोलली जाते. तिला आपण प्रमाणभाषा संबोधतो. या भाषेचा इतिहास, राजकीय,सांसकृतिक माध्यमांमध्ये कशा प्रकारे उपयोग होतो. याचा देखील मागील मुद्यांमध्ये आपण विचार केलेला आहे. प्रस्तुत मुद्यांमध्ये प्रमाणभाषेची आवश्यकता कधी आणि कुठे भासते? याचा आपण सविस्तरपणे विचार करणार आहोत. दैनंदिन जीवन व्यवहारांमध्ये स्थानिक बोलीचा वापर केला जातो. मात्र प्रमाणभाषा जेव्हा विशिष्ट जाति गटासाठी आपापसात व्यवहारासाठी वापरली जाते. प्रमाणभाषते अनेक स्थानिक बोली चा समावेश होतो. या भाषेमुळे समाजातील एकत्व, एकसंध टिकून राहण्यास देखील मोलाची मदत होते. प्रत्यक्षात मात्र बोली पेक्षा प्रमाणभाषा अधिक स्थिर असते. प्रसारमाध्यमे, दूरसंचार यामध्ये अधिक वेगाने प्रमाण भाषेचा वापर केला जातो. म्हणून काही वैज्ञानिक प्रमाणभाषेला आदर्श भाषा म्हणून देखील संबोधतात. म्हणून या भाषेचा उपयोग समाजगटातील विविध पातळ्यांवर केला जातो. आत्ताच्या काळाचा विचार केल्यास प्रमाणभाषेमध्ये असंख्य नवनवीन साधनांची भर पडताना आपणांस दिसते.

उदाहरणार्थ, महाजाला सोबत आपण संगणकावर जेव्हा आपण भाषा वापरतो. तेव्हा प्रत्येक फोनच्या माध्यमातून भाषा ही आपण वापरत असतो. त्यामुळे त्यातील वेगळेपण आपल्यात आपल्याला दिसून येते. आजच्या काळाचा विचार केलयास आपल्याला प्रमाण भाषेमध्ये नवनवीन संकल्पना या काळानुसार रूजू झालेल्या दिसतात. या सर्व संकल्पना महाजाल म्हणजेच इंटरनेटमुळे जगाशी जोडले गेलेले आहेत. त्यामुळे साहजिकच भाषेच्या संदर्भामध्ये नवनवीन संकल्पनांची भर पडलेली आपणांस दिसते. उदाहरणार्थ, सोशल मिडियावर जेव्हा आपण भाषेचा वापर करतो, त्यामध्ये नवनवीन कल्पना आपण वापरत असतो.

उदाहरणार्थ, वेगवेगळे निर्माण केलेले फॉण्ट, ब्लॉग, फेसबुक. सोशल मिडियावर आपण देखील आपल्या भाषेचा वापर सर्रास करत असतो. वरील मुद्यांवरून प्रमाणभाषेची आवश्यकता आपणांस कधी आणि कुठे भासते, हे आपणास समजावून घेणे अतिशय सोपो ठरते. प्रमाणभाषा आणि बोलीभाषा यांच्यातील फरक समजून घेताना प्रमाणभाषेपेक्षा बोली कशी आणि किती वेगळी असू शकते? याचा आपण अंदाज लावता येत नाही. मात्र बोली ही प्रमाणभाषेची जवळीक साधणारे आणि विविधता दाखवणारी भाषा आहे असे आपण म्हणू शकतो. कारण प्रमाणभाषेला एक शास्त्रशुद्ध प्रमाण असते. प्रत्येक प्रदेशानुसार, देशानुसार, प्रातानुसार बोली ही बदलत असते. बोलीचे स्वतंत्र व्याकरण असते. त्यामुळे त्यामध्ये आपण प्रमाणभाषेनुसार बदल करू शकत नाही.

### ३अ.१२.१ प्रमाणभाषा आणि बोली यांच्यातील फरक :

- प्रमाणभाषेनुसार बदल केल्यास त्यात या बोलीचे भाषिक कौशल्य भाषिक महत्व कमी होणार आणि जगामध्ये प्रचलित असलेल्या बोली ह्या लुप्त होणार , जगामध्ये बोलल्या जाणाऱ्या बोली जर आपण नाहीशा केल्या तर भाषेचा अभ्यास बऱ्याच प्रमाणात खुंटू शकतो. या बोलीमुळे भाषा विकसित झालेली आपणांस दिसते.
- प्रमाण म्हणजे शुद्ध व आपल्या मनामध्ये एक प्रकारचा ग्रह झालेला आहे. बोली म्हणजे मागासलेले पण असा विचार मात्र बोलीला उच्च दर्जा प्राप्त करून देऊ शकत नाही. त्यामुळे

दोन्ही भाषा आपापल्या ठिकाणी तितक्याच महत्वपूर्ण आणि दर्जेदार आहेत. असे अभ्यास केल्यानानतर आपणांस जाणवते. बोलीच्या तुलनेमध्ये प्रमाणभाषेचा वापर जास्तीत जास्त प्रमाणात केला जातो. हा वापर साहित्यासाठी पोषक, व्यवहारोपयोगी शासन कार्यालयांमध्ये वापरल्या जाणाऱ्या कामकाजामध्ये देखील केला जातो. म्हणून प्रमाणभाषा श्रेष्ठ आणि कनिष्ठ असे म्हणणे चुकीचे ठरेल.

- प्रमाण भाषाही लिपिबद्ध असते. तिला स्वतःचे वेगळे वैशिष्ट्य असते. मात्र बोलीला स्वतःची स्वतंत्र लिपि नसते.
- प्रदेशानुसार प्रातानुसार प्रमाणभाषा बदलत असते. त्यामुळे बोली याला महत्व नाही असे आपण म्हणु शकत नाही. बोली हा प्रांतातील एक महत्वाचा भाग आहे.
- प्रमाणभाषा ज्याच्या क्षेत्रावर वापरली जाते. त्यामध्ये संमिश्र प्रमाणात बोलीचा वापर देखील केला जातो. कारण मनुष्य हा समाजप्रिय असल्यामुळे समाजामध्ये असलेल्या बोलींचा परिणाम त्याच्या बोलण्यावर वागण्यावर दिसून येतो. ही भूमिका आपल्याला ऩाकारता येत नाही.
- प्रमाणभाषा आणि बोली यांचा अभ्यास केंद्रस्थानी ठेऊन काही भाषा वैज्ञानिकांनी वाक्यविचार याचा वर्ण़नात्मक पद्दधतीने व्याकरण एक दृष्टीकोनातून यथार्थपणे अभ्यास केला आहे. या अभ्यासातून भाषाविज्ञानाच्या कक्षा अधिक समृद्ध झालेल्या आपणास दिसतात. त्यामुळे प्रमाणभाषा बोली ह्या दोन्ही संकल्पनांना तितकेच महत्वाचे स्थान भाषाविज्ञानाच्या कक्षेमध्ये दिल्या गेल्या आहेत. त्यामुळे प्रमाणभाषेची जशी आवश्यकता आपणांस भासते. तशी बोलीची देखील भासते.
- थोडक्यात भाषावैज्ञानिकांनी प्रमाणभाषेला अधिक महत्वाचे स्थान दिले आहे. कारण प्रमाणभाषे मध्ये शुद्ध ज्या भाषेला व्याकरण भाषाभेद स्थानिक भेद सामावून घेऊन एकसंध राहून सांस्कृतिक दर्जा सांभाळून घेते. असा निष्कर्ष आपणांस अभ्यासाअंती नोंदवता येते. उच्चारण लेखनानुसार काही शब्दप्रयोग केले जातात. तेव्हा त्या भौगोलिक परिसराचा प्रभाव त्या भाषेवर आपणांस दिसतो. हे देखील आपल्याला यामध्ये दिसुन येते.

## ३अ.१३ सारांश

बोलीचा वापर अनेक स्थानिक स्तरावर केला जातो. त्यामुळे बोलीमध्ये विविध दिसून येते. इतकेच काय तर भौगोलिक सीमापर्यंत बोली व्यवहार विनिमयाचे साधन म्हणून वापरले जाते. त्यामुळे त्यामध्ये जीवंतपणा हे विशेष दिसून येते. मूळातच तिचे क्षेत्र खूप कमी क्षेत्रामध्ये व्याप्त असते.

थोडक्यात प्रमाण भाषेच्या संदर्भात महत्त्वाचे निकष नोंदवायचे असल्यास (अभ्यासाअंती) प्रमाणभाषा विस्तृत परिसरात वापरली जाते. तर बोलीचे क्षेत्र मर्यादित असते. तिला सीमांचे बंधन पाळावी लागतात. भिन्न-भिन्न समान गटांमध्ये बोली भाषा बोलल्या जाते.

कार्यालयीन स्तरावर आपण नेहमी प्रमाणभाषेचा उपयोग करतो. तर दैनंदिन व्यवहारासाठी आपणास बोली भाषा अतिशय जिव्हाळ्याची वाटते.

भाषावैज्ञानिकांनी प्रमाण भाषेला अतिशय महत्त्वाचे स्थान दिले आहे. कारण प्रमाण म्हणजे शुद्ध ज्या भाषेला व्याकरणिक भेद, भाषाभेद, स्थानिक भेदांना सामावून एकसंघ राहून आपला सांस्कृतिक दर्जा देखील सांभाळते असा निष्कर्ष आपणास अभ्यासाअंती नोंदविता येतो. उच्चारन, लेखनानुसार काही स्थानिक शब्द प्रयोग केले जातात. तेव्हा त्या भौगोलिक परिसराचा प्रभाव त्या भाषेवर आपणास दिसतो. हे देखील आपल्याला यामध्ये दिसून येते.

भाषा अभ्यास करण्याच्या अनेक पद्धती आहेत. प्रत्येक दृष्टीकोनातून अभ्यास हा वेगळा ठरतो. त्यामुळे आपण प्रारंभी भाषेच्या संकेतप्रणाली आणि उच्चारण व्यवस्था अभ्यासूया. त्यानंतर भाषा क्षेत्रामध्ये अनेक स्थित्यंतरे देखील पडलेले आहेत. त्यामुळे प्रत्येक सीमाप्रांताचा परिणाम किंवा प्रभाव त्या भाषेवर पडत असतो. म्हणून एकाच प्रांतात ज्या अनेक भाषा बोलल्या जातात. त्यांच्या सीमेवरील सीमेचा त्यांचा एकमेकांवर  कसा परिणाम होतो, याचीही कारणं आपण याठिकाणी अभ्यासणार आहोत. प्राण्यांच्या भाषांच्या तुलनेत मानवाची भाषा ही वेगळ्या स्वरूपाची असते.कारण मनुष्य हा समाज व्यवस्थेचा एक महत्वाचा घटक असल्यामुळे त्याला आपल्या विचारांची देवाण-घेवाण भाषेच्या माध्यमातून करावी लागते. मात्र प्राणी हे अबोल, मुकाप्राणी असल्यामुळे त्यांना त्यांची भाषा ही हाव भावाने करता येते. प्रत्येक भाषेला वेगळा असा भाषिक भेद असून तिची स्वतंत्र अशी एक उच्चारण व्यावस्था आणि व्याकरण असते. व्याकरणानुसार तिचा स्वत:चा स्वतंत्र असा शब्द संग्रह असतो. त्याशिवाय त्या भाषेचा वापर आपण सविस्तरपणे करू शकतो. प्रमाणभाषेमध्ये असंख्य स्थानिक भेद असतात. कारण भाषा ही प्रत्येक प्रदेशांमध्ये अथवा प्रांतामध्ये भिन्नभिन्न स्वरूपात भाषा बोलली जाते. भाषेसाठी का एक महत्वाचा दस्तऐवज असतो. यासाठी आपण प्रमाण भाषेचा वापर महत्वाचा ठरतो. समाजाचे एकसंध स्थान टिकण्यासाठी अथवा तिचे पालन करण्यासाठी देखील भाषा ही वापरली जाते. इत्यादी या सर्व उद्दिष्ट मधून आपणांस तिच्या स्वरूपाचा अभ्यास करता येईल.

## ३अ.१४ वरील घटकांवरील संभाव्य प्रश्न

१) प्रमाणभाषा आणि बोली यांचा परस्पर संबंध स्पष्ट करा.

२) प्रमाण भाषेचे स्वरूप स्पष्ट करा.

३) प्रमाणभाषा आणि बोली यांचा परस्पर संबंध स्पष्ट करा.

४) भाषेची लक्षणे सांगा ?

५) भाषा एक संकेतप्रणाली आहे, हे स्पष्ट करा ?

६) प्रमाणभाषा आणि बोली यांच्यातील साम्यभेद स्पष्ट करा.

७) टीप लिहा.

  १) बोलीबाषा

  २) प्रमाणभाषा

  ३) बोली भूगोल अथवा बोलीची संकल्पना

## ३अ.१० संदर्भ ग्रंथ


१) वर्णनात्मक भाषा विज्ञान : स्वरूप आणि पद्धती - कल्याण काळे, अंजली सोमण

२) भाषा आणि भाषाशास्त्र - श्री. त. गजेद्रगडकर

३) भाषा विज्ञान : वर्णनात्मक आणि ऐतिहासिक स.ग. मालशे, हे. वि. इनामदार.

४) काळे, कल्याण, सोमन, अंजली : वर्णनात्मक भाषा विज्ञान : स्वरूप आणि पद्धती.

५) श्री. न. गजेद्रगडकर : भाषा आणि भाषाशास्त्र.

६) मालशे, स.ग., इनामदार, हे. वि. : भाषा विज्ञान : वर्णनात्मक आणि ऐतिहासिक.

७) वर्णनात्मक भाषा विज्ञान : स्वरूप आणि पद्धती कल्याण काळे, अंजली सोमण

८) भाषा आणि भाषाशास्त्र - श्री. त. गजेंद्र गडकर

९) भाषा विज्ञान वर्णनात्मक आणि ऐतिहासिक स.ग.मालशे, हे. वि.इनामदार

१०) मु.श्री. कानडे - मराठीचा भाषिक अभ्यास


❖❖❖❖

# ३आ

# बोलीच्या अभ्यासाची गरज व महत्त्व

**घटक रचना :**

३आ.० उद्दिष्टे
३आ.१ प्रास्ताविक
३आ.२ बोलीविज्ञान
३आ.३ बोलींच्या अभ्यासाची दिशा - बोलीचा विजनात्मक अभ्यास
३आ.४ सामाजिक-सांस्कृतिक अभ्यास
३आ.५ बोलीच्या अभ्यासाची साधने
३आ.६ सामाजिक-सांस्कृतिक अभ्यास
३आ.७ बोलींचे व्याकरणे व कोशरचना यांचे महत्व
३आ.८ बोलींसमोरील आव्हाने, जतन व संवर्धन यांसाठी करावयाच्या प्रयत्त्नाची दिशा
३आ.९ सारांश
३आ.९ संदर्भग्रंथसूची
३आ.१० प्रश्न

## ३आ.० उद्दिष्टे

१) बोली म्हणजे काय हे अभ्यासणे.
२) बोलींच्या अभ्यासाची दिशा - बोलीचा विजनात्मक अभ्यास.
३) बोलींचा सामाजिक-सांस्कृतिक अभ्यास करणे.
४) बोलींचा अभ्यासाची साधने अभ्यासणे.
५) बोलींचे व्याकरण व कोशरचना यांचे महत्त्व अभ्यासणे.
६) बोलीं समोरील आव्हाने, जतन व संवर्धन यासाठी करावयाच्या प्रयत्त्नांची दिशा अभ्यासणे.

## ३आ.१ प्रास्ताविक

भारत हा बहुभाषिक बहुसांस्कृतिक देश आहे. अनेक जाती, धर्म, पंथ, संस्कृती, परंपरा तसेच प्रादेशिक भाषा आणि बोली प्रचलित असणारा भारत एकमेव देश आहे. त्यामुळेच सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि भाषिक ऐक्याचे प्रतिक म्हणून जगात भारत ओळखला

जातो. एकंदरित या भौगोलिक जीवनपद्धती, संस्कृती, इतिहास या प्रदेश वैशिष्ट्यांचा समाज जीवनावर परिणाम होऊन भारतीय भाषा जीवन संस्कृतीमध्ये प्रादेशिक विविधता आली आहे. समस्त भारतीय समाजजीवन सामाजिक, भौगोलिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक, भाषिक अशा विविध अंगांनी बहुभाषिक व बहुसांस्कृतिक बनले आहे. तथा भौगोलिक संपत्ती भाषा व संस्कृती याने देशाची समृद्धी व एकता वाढतना दिसून येते. कोणतीही समाजभाषा लोक माणूस घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत असते. भाषा मानवाने मानवाच्या विकासासाठी बनविलेली एक सामाजिक संस्था आहे. पण देश, प्रदेश, स्थान, भाग, परिसर, समाज, समूह, व्यक्तिपरत्वे भाषेला भिन्नत्व आले आहे. या शिवाय भाषा ही जातीय व्यवस्था एक भौगोलिक प्रदेश बहुआयामी रूप धारण केल्याने हजारो बोलीभाषा आज समाज व्यवहारात प्रचलित आहेत. परंतु आधुनिक विकास क्रांतीमुळे काळाच्या ओघात काही भाषा लुप्त होत आहेत. त्यांचा धोका संभवत व वाढत आहे. तसेच भाषेची काही नवीन रुपेही निर्माण होत आहेत. तेव्हा भाषिक परिवर्तनाची रूपे पहावयास मिळत आहेत. आज जागतिकीकरणामुळे बोलीचा सांस्कृतिक भौगोलिक अस्सलपणा धूसर होत आहे. इतके बोलींमध्ये गतीने परिवर्तन घडून येत आहे. बोलीं संपल्या तर सांस्कृतिक विविधता नष्ट होण्याचा मोठा धोका संभवतो. दोन्ही प्रदेशाच्या सामाजिक, सांस्कृतिक, इतिहासाचा आणि भाषिक संपत्तीचा ठेवा संवर्धन आणि संक्रमणासाठी बोली अभ्यासाचे नितांत गरज भासते. त्यामुळे भाषा बोलींचा अभ्यास चिंतन आणि संशोधनाचा विषय होत आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता बोलींचा अभ्यास अतिशय महत्त्वाचा आहे हे स्पष्टपणे जाणवते तो अभ्यास करताना वरील दृष्टिकोनातून बोलींचा अभ्यास करता येतो.

## ३आ.२ बोलीविज्ञान (DIALECTOLOGY)

एका निश्चित भागात किंवा भौगोलिक क्षेत्रात जी भाषा बोलली जाते तिला बोलीभाषा असे म्हणतात. बोलीचे उच्चारण, व्याकरण, वाक्यप्रचार, म्हणी यांच्यात वेगळेपणा असतो. त्यामुळेच प्रमाण भाषेपेक्षा तिचे वेगळेपण जाणवते. अलीकडे काही बोलीभाषेत लेखनही होताना आढळते. प्रादेशिक साहित्य ग्रामीण साहित्याच्या शाखाचाच एक भाग आहे. दर बारा कोसावर भाषा बदलते अशी म्हण आहे. ती निश्चितच अर्थपूर्ण आहे. राष्ट्र, स्वर, भेद, जातीपरत्वे निरनिराळे भेद आढळतात.

खरे पाहता भाषा आणि बोली यांना एकच अर्थ आहे. बोलली जाते ती भाषा किंवा बोली अर्थाच्या दृष्टीने त्यात अंतर नाही सर्वच भाषा प्रथम बोली असतात. पण व्यवहारात भाषा आणि बोली यात फरक केला जातो. प्रामुख्याने प्रमाण भाषा म्हणजे भाषा आणि अन्यत्र बोलली जाणारी विविध रूपे म्हणजे बोली असा साधारण समज प्रचलित आहे. म्हणजे भाषा आणि बोली हे उत्पत्तीनुसार प्रत्यक्षात समानार्थी शब्द असले तरी त्यांना वेगळी अर्थछटा प्राप्त झालेल्या आहेत. उदाहरणार्थ भाषा म्हणजे मराठी आणि बोली म्हणजे अहिराणी, कोकणी, डांगी वगैरे म्हणजेच भाषा अधिक व्यापक तर बोली ह्या थोड्या लहान परिघात सामावलेल्या अशी साधारण समजूत दिसते. परंतु बोली म्हणजे काय हे समजून घेण्यासाठी येथे बोलीच्या व्याख्या पाहणे योग्य ठरेल.

### ३आ.२.१ बोलीच्या व्याख्या :

मराठी भाषा अभ्यासकांनी मांडलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे :

**१) तर्कतीर्थ श्री. लक्ष्मण शास्त्री जोशी विश्वकोश खंड :**

"व्यक्तीसमूहाला आपण पूर्णपणे एक रूप याचे भाषिक रूप वापरतो असे वाटते त्याची भाषा म्हणजे बोली. येथे व्यक्तीसमूह व त्यांची भाषा त्याला गृहीत धरुन व्याख्या केल्याचे दिसते."

**२) ना. गो. कालेलकर :**

"बोली हे दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन आहे. परिस्थितीला अनुरूप अशा भाषिक सामग्रीचा ती उपयोग करते. मुख्य परंपरेने आल्यामुळे तिच्या अंगी अनेक प्रकारचा जिवंतपणा असतो, ही साधी पण परिणामकारक असते. आपले रूप प्रतिष्ठेच्या आरशात पाहून इतरांना ते आकर्षक वाटेल असे करण्याचा प्रयत्न करायला तिला वेळ नसतो तिची स्वाभाविकता हेच तिचे वैशिष्ट्य होय."

काहींना ते मोहक वाटेल काहींना ते ओंगळ वाटेल हा ज्याच्या त्याच्या मनोवृत्तीचा आणि संस्काराचा प्रश्न आहे. खरे म्हणजे यातील मतितार्थ कुठल्याही प्रतिष्ठेच्या जोखडात न अडकता स्वाभाविकपणे व्यक्त होणारी व व्यक्तीच्या व्यवहारातील मौखिक परंपरेने प्रचलित असणारी भाषा ही बोली असते. मौखिक परंपरा, जिवंतपणा, साधेपणा, परिणामकारकता, स्वाभाविकता इत्यादी वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

**३) सं.ग. मालसे :**

"एखाद्या विशिष्ट लोकसमुदायात किंवा भौगोलिक प्रदेशातील व्यक्तींच्या अंगवळणी पडलेले आणि त्यामुळे प्राय मुद्दाम शिकावे न लागणारे व विचारांची देवाण-घेवाण करण्यासाठी सहजगत्या उपयोगी पडणारे साधन म्हणजे बोली." वरील व्याख्येत एक भाषक समाजाच्या एका गटाकडून किंवा एक भाषक समाजाच्या एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोकांकडून देवाणघेवाणीसाठी दैनंदिन व्यवहारासाठी वापरल्या जाणाऱ्या विशिष्ट भाषिक समूहांना वाटणाऱ्या मतांचा विचार केल्याचे दिसते.

**४) सु.बा. कुलकर्णी :**

"महाराष्ट्राच्या विस्तीर्ण प्रदेशात निसर्गनिर्मित असे विभाग पडले आहेत. त्या त्या विभागात ही स्वतंत्र भाषिक वैशिष्ट्ये दिसतात. येथे एका विस्तृत भागाच्या फार मोठ्या समूहाकडून एकाच भाषेच्या आधाराने विचार विनिमय होत असतो त्या भाषेलाच बोली असे म्हणतात. सामान्यता ज्या भेदांना लेखन परंपरा नाही व जे आपल्या अस्तित्वात केवळ मौखिक परंपरेवर अवलंबून असतात अशा भाषा भेदांना बोली डायलेक्ट अशी संज्ञा आहे."

**५) दत्तात्रय पुंडे :**

"एक भाषक समाजाच्या एका गटाकडून किंवा एक भाषक समाजाच्या एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोकांकडून देवाणघेवाणीसाठी दैनंदिन व्यवहारासाठी वापरल्या जाणाऱ्या विशिष्ट भाषेस बोली असे म्हणता येईल. इथे ही विशिष्ट प्रदेशांनी समाजातील गटांचा विचार करुन दैनंदिन वापरली जाण्याला महत्त्व दिल्याचे दिसते."

**६) सोनाली देशपांडे गुजर :**

"बोलीभाषा या आजच्या काळातील नव्हे तर शेकडो वर्षाच्या प्रवासातून रोजच्या व्यवहारांतून विकसित झालेल्या आहेत. त्यामुळे बोलीभाषा ह्यातल्या समाजाची आणि प्रदेशाची अभिव्यक्ती आहे."

**७) डॉ. मु. श्री. कानडे :**

"समाजाच्या एका गटाकडून किंवा एक भाषक समाजाच्या एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोकांकडून देवाणघेवाणीसाठी दैनंदिन व्यवहारासाठी वापल्या जाणाऱ्या विशिष्ट भाषेस बोली असे म्हणता येईल."

अशाप्रकारे भाषा अभ्यासकांनी आपापल्या परीने बोलीच्या विविध व्याख्या केल्याचे दिसते. काहींनी समाजातील एखाद्या गट आणि विशिष्ट भूप्रदेशात महत्त्व दिले. तर काहींनी परंपरेला महत्त्व दिले, तर काहींनी दैनंदिन व्यवहारात वापरल्या जाणाऱ्या भाषिक रूपाला महत्त्व दिले. एकंदरीत या सर्व व्याख्यांवरुन बोली म्हणजे काय हे समजू शकेल तसेच बोलीची विविध वैशिष्ट्येही समजून घेतात.

बोलींच्या अभ्यासाचे शास्त्र ज्यावेळी उदयास आले, त्यावेळी भाषा वैज्ञानिकांनी भूगोल शास्त्रातील अनेक संज्ञाचा उपयोग आपल्या कल्पना मांडण्यासाठी केला व बोलींच्या प्रादेशिक भाषा भेदासंबंधीचा अभ्यास 'बोली भुगोल' या नावाने ओळखला जाऊ लागला. भौगोलिक आधारावर बोली, बोलीतील साधर्म्य यांचे दिग्दर्शन करणारे नकाशे तयार केले गेले. अशा नकाशांना बोली मानचित्र 'डायलेक्ट' अशी संज्ञा आहे.

'बोलीभाषाविज्ञान' याचेच दुसरे नाव 'भाषिक भुगोल' असे आहे. सामान्यतः प्रत्येक व्यक्ती निदान एकातरी भाषेचा उपयोग करते. व्यवहाराची भाषा म्हणून मराठी माणसाला प्रमाण मराठी अवगत असली पाहिजेच. भाषा वापरणाराला भाषा म्हणजे काय हे माहीत असतेच, असे नाही. एवढेच नव्हे तर स्वतःच्या भाषेची घडण, तिचे स्वरूप व कार्य यांविषयी बहुतेक लोकांना काहीच ठाऊक नसते. भाषा ही संज्ञा ज्या अनेक बोली एका विशिष्ट विनिमय साधनाचे पोटभेद आहेत. अशा एका सामाजिक साधनाला लागू केली जाते, तर पोटभाषा ही संज्ञा भाषेच्या महत्त्वाच्या प्रादेशिक भेदांना लागू होते. अशाप्रकारे पाहिले तर मराठी ही एक भाषा असून वऱ्हाडी, देशी, खानदेशी, कोकणी इ. प्रकार या तिच्या पोटभाषा होतील. या पोट भाषांच्या ठळक स्थानिक भेदांना 'बोली' असे नाव देता येईल. हे भेद भौगोलिक आहेत. त्यांना क्षेत्र मर्यादा आहेत. पण याशिवाय काही जातिनिष्ठ व समाजनिष्ठ भेद ही आढळतात, या भेदांना ही बोली म्हणता येईल.

बोली कोणकोणत्या भौगोलिक क्षेत्रांमध्ये कशा बोलल्या जातात. याचे सर्वेक्षण करुन बोलींच्या प्रदेशनिष्ठ व रचना संबंधित निरीक्षणे मांडणाऱ्या अभ्यासक क्षेत्रात 'बोली भुगोल' असे म्हटले जाते. याचा अर्थ बोलीचे भूगोल असते. भौगोलिक विशिष्टता असते. बोलींचे काही विशेष बोली या प्रमाणभाषांपेक्षा भिन्न असतात. बोली भाषेच्या प्राचीन स्वरूपाचे अवशेष भरपूर असतात. रुग्णांची व स्त्रियांची बोली ही भिन्न असते.

प्रमाण मराठीला तिच्या परिघात बोलल्या जाणाऱ्या बोली समृद्ध करीत असतात. या संदर्भात प्रमाणभाषा बोली भाषांची ऋणको असते, असे म्हणावयास हरकत नाही. प्रमाण मराठीचा मूल स्त्रोतच तिच्या बोलींमध्ये असल्याने बोलींमधले शब्दभांडार आणि त्या शब्दांमधलं शहाणपणाचं संचित अत्यंत मोलाचं आहे. भाषेच्या अभ्यासकांनी भाषा अभ्यासाच्या ज्या कक्षा ठरवल्या त्यापैकी बोलीभूगोल ही एक कक्षा आहे. इंग्रजीत 'डायलेक्ट जिओग्राफी' असे त्यास म्हणतात. आपण जी भाषा वापरतो कुठून कुठवर कशी पसरली आणि तिने बोलीची कोणती रुपे धारण केली याचा अभ्यास या बोली भूगोलात केला जातो. खरेतर आपण प्रमाण भाषेलाही बोलीभाषाच समजतो. भाषाभूगोल ही अलीकडे विकसित झालेली भाषेच्या अभ्यासाची महत्त्वाची शाखा आहे. देश-काल प्रदेशाच्या सीमा असतात. भाषेच्या याही अंगाचा अभ्यास होणे आवश्यक असल्याने भाषाभूगोल ही शाखा उदयास आली यालाच बोली भूगोल असे म्हणतात. तरीही या दोन्ही पद्धतीत सूक्ष्म भेद आहेत. भाषा भूगोलात जागतिक भाषांच्या सीमा निश्चित करुन अभ्यास केला जातो. उलट बोली भूगोलात एखाद्या भाषेच्या विविध बोलींच्या सीमा निश्चित करुन अभ्यास केला जातो. बोली एखाद्या भाषिक परिसरातच वापरल्या जाणाऱ्या बोलीचा अभ्यास होत असतो. उदाहरणार्थ : मराठी भाषेच्या प्रादेशिक परिसरात अहिराणी मराठी सारख्या बोली बोलल्या जातात. या बोलींच्या सीमारेषा निश्चित करुन त्यांचा अभ्यास केला जातो. बोलीमध्ये भेद निर्माण झालेले असतात. ते प्रादेशिक म्हणजे भौगोलिक असतात. त्यांची कारणे या पद्धतीत तपासली जातात. कोकणी माणूस समुद्रकिनारी वास्तव्य करीत असल्याने नाकात बोलतो. उदाहरणार्थ : सापडलो ऐजवी सांपडले असे तो म्हणतो. अशा पद्धतीने होतात ते कोणत्या कारणांनी होतात हे तपासले जाते. अहिराणी बोली गुजरात जवळ असल्याने गिअर्सन अभ्यासकाने तिला गुजरातीची बोली म्हणून संबोधले. याचे कारण गुजरातीचा तिच्यावर असलेला प्रभाव आहे. ही वस्तुस्थितीदर्शक विधाने बोलींच्या सीमा ठरवताना शोधलेल्या कारणांची द्योतक आहेत. बोलींचे क्षेत्र भाषेच्या मानाने सीमित असते. भौगोलिक प्रदेशाची वैशिष्ट्ये बोलीमध्ये असतात.

## ३आ.३ बोलींच्या अभ्यासाची दिशा - बोलीचा विजनात्मक अभ्यास

बोलींच्या अभ्यासासाठी शब्द, रूप, वाक्य, गद्यपाठ इत्यादी स्वरूपातील साहित्य जमा करावे लागते. हे साहित्य ज्या भाषकाकडून जमा केली जाते त्या भाषकास निवेदक, विज्ञापक वा सूचक अशी संज्ञा आहे. निवेदक हे एक वा अनेक, स्त्री वा पुरुष, बाल वा वृद्ध अशा अनेक परींचे असू शकतात. बोलींच्या अभ्यासाचे काम सुरु झाले म्हणजे संशोधक व निवेदक यांची युती तो अभ्यास पूर्ण होईपर्यंत कायम असते. त्यामुळेच संशोधक व निवेदक यांच्या अंगी भाषाअध्ययनास पूरक असे गुण असणे आवश्यक ठरते. प्रत्यक्ष संकलनास प्रारंभ करण्यापूर्वी संशोधक हा विशिष्ट बोली व तिचा भाषक समाज यांच्याविषयी उपलब्ध असलेले सर्व लिखाण नजरेखालून घालतो व त्यासंबंधी प्राथमिक टाचणे तयार करतो. बोलीच्या ज्या अंगाचा अभ्यास अभिप्रेत असेल त्यास आवश्यक अशा साहित्याच्या संकलनासाठी प्रश्नावली, रूपावली, शब्दावली, वाक्यावली, तक्ते, कोष्टके इत्यादी साधनांची तो जमवाजमव करतो.

प्रश्नावलीच्या आधारे क्षेत्रातील निवेदकांकडून साहित्य जमा करण्याचा क्रियेपासून प्रत्यक्ष क्षेत्रकार्यास प्रारंभ होतो. क्षेत्रकार्यात विचारलेल्या प्रश्नाला निवेदकाकडून मिळणारा प्रतिसाद संशोधकांकडून अंतरराष्ट्रीय ध्वनीलिपी वा तत्सम अन्य लिपीत लेखनिविष्ट केले जाते.

टेपरेकॉर्डरच्या साह्याने आवश्यक त्या सामग्रीचे ध्वनिमुद्रण केले जाते. विविध तंत्राच्या सहाय्याने निवेदकाकडून भाषक सामग्री काढून घेण्याच्या या क्रियेला निष्कर्षण असे म्हणतात. निष्कर्षणातून मिळालेली सामग्री विषयवार विभागून संग्रहित करावी लागते. यासाठी संकलित साहित्याचे समपरीक्षण करावे लागते. ध्वनीव्यवस्था, रूपव्यवस्था, वाक्यव्यवस्था, अर्थव्यवस्था इत्यादी. संरचनेच्या विविध अंगाशी संबंधित असलेले साहित्य स्वतंत्रसंचायिका वापरून ठेवल्यास ते हाताळण्यास सोयीचे होते. आता संगणक आणि अन्य इलेक्ट्रॉनिक साधने मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झालेली असल्याने त्यांचा योग्य तो वापर करुन निवेदकाचे साहित्य ध्वनींच्या रूपात आणि ध्वनि-चित्रफिती यांच्या रूपातही जतन करता येते. त्यातून जगात अन्यत्र कुठेही असणाऱ्या संशोधकाला त्या त्या बोलीची संबंधित सामाजिक घटकांचाही विचार करता येतो. संकलन व संप्रेषण यांच्या नंतरची प्रक्रिया विश्लेषणाची होय. वस्तुतः या तिन्ही प्रक्रिया निष्कर्षणास प्रारंभ केल्यापासून सतत सुरुच राहतात. येथे आपल्या उपयोगाची माहिती तेवढीच ठेवून बाकीची माहिती काढून टाकणे गरजेचे असते. वेळोवेळी संकलित साहित्याचे विश्लेषण करुन तात्पुरते निष्कर्ष काढावे लागतात. पुढे जमा केलेल्या साहित्याशी ते विसंवादी असल्यास त्यात सुधारणा करावी लागते व कधीकधी त्यांचा पूर्णपणे त्यागही करावा लागतो. त्यानंतरची प्रक्रिया म्हणजे ठामपणे हाती आलेल्या निष्कर्षाचे विशिष्ट भाषावैज्ञानिक प्रणालीस अनुसरुन सोदाहरण विवेचन करणे ही होय. असे केले म्हणजे संशोधनाचे फलित आकार घेते. अशाप्रकारे संकलन, संपरिक्षण, विश्लेषण व वर्णन या चार टप्प्याने बोलींचा अभ्यास पुरा होत असतो.

### ३आ.३.१ बोलीं अभ्यास आणि साहित्य संकलन :

बोलींच्या अभ्यासाचे प्रकार अनेक असल्याने त्यातील एका प्रकारास उपोदबलक व आवश्यक असणारे साहित्य दुसऱ्या प्रकारात उपयोगात पडेलच असे नाही. यामुळे नियोजित अभ्यासास कोणत्या स्वरूपाचे साहित्य उपयुक्त ठरेल व त्यासाठी कोणती तंत्रे वापरणे जरुर आहेत त्यांचे भान ठेवणे आवश्यक होते. सामान्यतः बोलींचे अध्ययन त्यांची ध्वनीव्यवस्था व व्याकरण यांचे वर्णन करण्याच्या हेतूने संकलन होत असते. व्यक्त होणारा सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ हा ही अभ्यासाचा विषय होतो. कधी कधी बोलींची ऐतिहासिक व तौलनिक व्याकरणे लिहिण्याचे वा त्यांचे मानचित्र बनविण्याचे कार्यही केले जाते. गरजेनुसार बोलींचे अध्यापन करण्यासाठी त्यांमध्ये पाठ्यपुस्तके बनविले जातात. त्यांच्या लेखनासाठी लिपी नसल्यास लिपीही बनविली जाते. क्वचित बोलीतील लोककथा, लोकगीते, वाकप्रचार, म्हणी, उखाणे, प्रहेलिका, गद्य-पद्य वाक्ये, शब्द यांचे निरंतर संग्रहाच्या हेतूने संकलन होत असते. या अभ्यासासाठी भाषिक साहित्य पायाभूत ठरत असल्याने त्यांचे संकलन योग्य प्रकारे होणे अत्यावश्यक मानले जाते.

बोलींच्या ध्वनी व्यवस्थेच्या अभ्यासाचाच विचार केला असता असे आढळून येईल की प्रयोजनानुसार त्याचे अनेक उपप्रकार संभवतात. नियोजित अभ्यास हा कधी तो भाषा वैज्ञानिकांच्या सखोल शास्त्रीय निरीक्षणासाठी, परीक्षणासाठी वा चर्चेसाठी असू शकेल. कधी तो एखाद्या तांत्रिक विधान असलेल्या तळटीपेचे रूप धारण करेल तर कधी एखाद्या परिशिष्टाचे. कधीकधी तो शोधनिबंधाच्या वा प्रबंध-प्रबंधिकेच्या स्वरुपात सादर केला जाईल. एखाद्यावेळेस तो ध्वनी पाठमालिकेच्या स्वरूपात बाहेर येणे इष्ट ठरेल. अशा विविध वर्णन प्रकारांना उपयोगी पडणारे भाषिक साहित्य साहजिकच कमी वा जास्त, स्थूल वा सूक्ष्म, सामान्य वा तांत्रिक अशा अनेक प्रकारचे व नमुन्यांचे असू शकेल. एखाद्या ध्वनीसंबंधी लिहिताना, त्याचे उच्चारण स्थान कोणते, उच्चारण प्रकार कोणता एवढी माहिती त्यांनी दिली तरी पुरेशी होईल. एखाद्या तांत्रिक

लेखात मात्र, त्याच ध्वनीचे भौतिक ध्वनिविज्ञानाच्या आधारे वर्णन करुन त्याचा तालुल्लेख, तरंगलेख, दोलनालेख किंवा वर्णपट द्यावा लागेल.

ध्वनीसंबंधीचे साहित्यसंकलन बोलींच्या ध्वनिसंरचनेच्या गुंतागुंतीवर व अपरिचित ध्वनींच्या अस्तित्वावरही अवलंबून राहील. अनेक भाषांतून स्पर्शसंघर्षी, अंतःस्फोटक, हिक्कित, कणित इत्यादी क्वचित आढळणारे ध्वनीही वापरले जातात. काही भाषांतून उच्चारण-काल, आघात, ताण इत्यादींना महत्त्व असते. सामान्यतः बोलींच्या ध्वनीव्यवस्थेच्या वर्णनात पुढील गोष्टींचा अंतर्भाव करावा लागतो.

१) प्रथम बोलीतील एकंदर स्वनिमास्वनिमांतीत विरोध स्पष्ट करण्यासाठी अल्पतम युग्मे गोळा करावी लागतात. उदा. मराठीतील / ब / आणि / भ / या स्वनिमांतील विरोध स्पष्ट करण्यासाठी / वारा / आणि / भारा / हे युग्म पुरेसे आहे. स्वनिमांचे व त्यांच्या स्थानांतराचे वितरण स्पष्ट करण्यासाठी त्यांची स्थानशः उदाहरणे जमवावी लागतात. स्वनिमांची शब्दातील विन्यासात्मक वर्तणूक दर्शवण्यासाठी स्वरगुच्छ आणि व्यंजन गुच्छ यांची जातिपर उदाहरणे मिळावावी लागतात.

२) ध्वनींच्या खंडाधिष्ठित व सहउच्चारणात्मक वर्तणुकीचेही दिग्दर्शन करावे लागे. यांत- ह्स्वदीर्घत्व, बलाघात, तान, अनुतान, महाप्राणत्व, नासिक्यरंजन, औष्ठिकरण, मुर्धन्यीकरण, तालव्यीकरण, काकलीकरण इत्यादी अनेक प्रकारांचा समावेश करावा लागतो. शेवटी विरामाधिष्ठेत अक्षरव्यवस्थेचे वर्णन करण्यात येते. या सर्व अभ्यासात लागणारे प्रचंड साहित्य जमविण्यात खूपच परिश्रम करावे लागतात.

भाषा व बोली या बहूंशी ढोबळ कल्पना आहेत. परस्पर आकलनीय व संरचना साधर्म्य युक्त व्यक्ती बोलींचा समुदाय बोली म्हणून ओळखला जातो. याच स्वरूपाचा बोलींचा समुदाय भाषा म्हणून ओळखला जातो. विभेद, निर्णायक तत्त्वानुसार बोलींचेही अनेक प्रकार संभवतात. नैसर्गिक भिन्नता, सामाजिक स्तर, व्यवसाय, लिंग इत्यादी कारणांनी ही एकाच बोलीमध्ये अनेक विभाजित असू शकतात. त्यामुळे बोलींच्या अभ्यासासाठी संकलित करावयाचे साहित्य एकाच वेदाचे प्रातिनिधिक असणे योग्य ठरते. वराडी किंवा खानदेशी ही भौगोलिक तत्त्वावर स्वतंत्र बोली असली तरी त्या भाषणांमध्ये आढळणाऱ्या सामाजिक व व्यावसायिक घटनेनुसार तिच्या अनेक उपबोली असू शकतात. साहित्य संकलन व विश्लेषण ही भाषा अभ्यासाची अंगे परस्परावलंबी व परस्पर पूरकच असतात. विश्लेषण हे संकलनावर अवलंबून असते तर संकलनाची दिशा विश्लेषण दर्शविते. यामुळे आदी साहित्य संकलन पुरे करुन मग त्याचे विश्लेषण करीन असे कोणी म्हणेल तर ते अशक्य होय. ध्वनीचे विश्लेषण झाल्याशिवाय रचनेचे सम्यक ज्ञान होत नाही आणि रचनेच्या अध्ययनाशिवाय वाक्य रचनेचा उलगडा होत नाही. अर्थरचना तर या सर्वांनाच पायाभूत ठरत असते. विश्लेषण यामुळे भाषेच्या भिन्न संरचना स्तरावरील कोटी समजून येतात. विश्लेषण न करता शब्द संकलित होत जाणाऱ्या साहित्याचे परीक्षण करणे, विश्लेषण करणे व वर्णन करणे या तिन्ही प्रक्रिया एकाच वेळी चालू राहतात. साहित्याचे प्राथमिक निरीक्षण करुन त्याची संगती लावणे, त्यातील विषय व कोटी यांचे अभीनिर्धारण करुन त्यांचे वर्गीकरण करणे व वर्गीकृत साहित्याचा योग्य प्रकारे संचय करणे या कृती होत असतात. प्रश्नावलीच्या साह्याने प्रारंभ होतो. ध्वनी लिपीत निष्कर्ष झालेले शब्द, वाक्य यांचे लेखन होत असते. प्रश्नावली समोर सोडलेल्या रिकाम्या जागी हे लेखन प्रारंभी केले जाते. सोयीच्या दृष्टीने ते त्याच दिवशी पुस्तकांवर ठिकाणांवर स्थानांतरित होणे आवश्यक ठरते.

चिठ्ठीकाचा संचय, व्यवस्था व तुलना करण्याच्या दृष्टीने फार उपयुक्त ठरतात. बरोबरच तालिका याद्या आलेख यांचाही उपयोग संशोधक करत असतो.

थोडक्यात बोलींचा अभ्यास ही गांभीर्याने करण्याची गोष्ट आहे. वरवर पाहून निष्कर्ष मांडण्यासारखी ही प्रक्रिया नाही. तेथे भाषिक शिस्त पाळावी लागते अन्यथा समाजातील भेदांमध्ये अजून भर घालण्याचे काम अशा अभ्यासकांकडून होण्याचा धोका संभवतो. भाषेचा किंवा बोलीचा अभ्यास करताना संशोधकाने वर उल्लेखलेली अभ्यास पद्धती वापरली आणि प्रामाणिकपणे सर्व नोंदी ठेवल्या तर भाषेचा अभ्यास परिपूर्ण होईल. असा परिपूर्ण अभ्यास आपल्याला भवितव्याचा नव्या वाटाही मिळवून देऊ शकेल.

## ३आ.४ सामाजिक - सांस्कृतिक अभ्यास

समाज ही एक सामाजिक संस्था आहे. मनुष्य हा समूहप्रिय प्राणी आहे. समाज व्यवहार चालवण्यासाठी भाषा या संस्थेचा उपयोग समाजाला होत असतो. भाषावर संस्थेमुळे माणसांची संस्कृती टिकण्यास मदत होते. एकूणच भाषेचे अस्तित्व समाजाकडून होणाऱ्या वापरावर अवलंबून असते. सहयोग सहकाराच्या विनिमयाचे साधन म्हणून भाषेचे महत्त्व फार मोठे असते. भाषा कोणा एका व्यक्तीच्या मालकीची नसून समाजाच्या मालकीची असते. तिचा वारसा परंपरेने सर्वांनाच मिळालेला असतो. परंपरागत संकेत मोडले तर, समाजाला ते मान्य नसतात. परस्पर विनिमय होण्यासाठी समाजमान्य संकेत असलेली भाषा वापरावी लागते. भाषा आणि संस्कृती यांचा परस्परसंबंध किती घनिष्ठ आहे हे सर्वश्रुत आहे. 'संस्कृतीचे व्यक्त रूप म्हणजे त्या समाजाची बोली होय.' (कालेलकर १९६४, पृष्ठ ५८) प्रत्येक समाजाची विशिष्ट संस्कृती असते, विशिष्ट सामाजिक प्रथा, परंपरा, लोकसंकेत, रीतिरिवाज असतात. विशिष्ट लोकधर्म असतो. त्यांतून त्याची बोली वेगळेपण धारण करीत असते. 'बारा कोसांवर भाषा बदलते' असे विधान जेव्हा केले जाते, तेव्हा त्यात 'भौगोलिकता' अधोरेखित होते, तसेच 'प्रत्येक समाजाची किंवा जातीची बोली वेगळी असते', असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा त्यात 'सामाजिकता' अनुस्यूत असते. म्हणून भाषेच्या वर्णनात्मक अभ्यासापेक्षा ही दिशा वेगळी ठरते. भाषा अर्जित वस्तू आहे. भोवतालच्या समाज परिस्थिती स्वतःची आई यासारख्या घटकांकडून मूल भाषा शिकते. सर्वसामान्य असलेले दोन्ही संकेत अर्थासह ते मुल आत्मसात करते. समाजाच्या वृत्ती-प्रवृत्ती व्यक्तीत उतरवतात, तर व्यक्तीवर सवयीचा परिणाम भाषेवर होत असतो. भाषा सामाजिक संबंध प्रस्थापित करीत असते. मानव मिश्रित असूनही समाजसापेक्ष असल्यामुळे भाषा स्वयंसिद्ध सामाजिक संस्था आहे. मात्र ती अर्जित असल्यामुळे भाषेत परिवर्तनशीलता शक्य असते. मानव आणि समाज यांच्या गरजेनुरुप भाषा नवनवीन रूपे धारण करते. त्यातूनच स्थळ काळानुरुप भाषा बदलत जाते. त्यामुळे भाषेचे परिपूर्ण व अंतिम रूप असू शकत नाही. (भाषाविज्ञान परिचय पृष्ठ क्रमांक ७) एक सहजक्रिया म्हणून भाषेचा वापर केला जातो. प्रामुख्याने भाषा हा एक संस्कार आहे. भाषा समजण्यापूर्वीच अनुकरणाने आणि निरीक्षणाने ती आत्मसात केलेली असते. विविधता हे भाषेचे वैशिष्ट्य असून परिवर्तनशीलता हा भाषेचा धर्म आहे. एकच भाषा बोलणाऱ्या समाजात व्यवसाय, धंद्याच्या निमित्ताने वर्ग निर्माण होतात, तेव्हा भाषेचे बहुरुप प्रकट होते. संकेत हा भाषेचा आधार असतो नि संकेताच्या बाबतीतील समानता भाषेच्या संवादाच्या दृष्टीने आवश्यक आहे. प्रमाण भाषेच्या आधार असतो नि संकेताच्या बाबतीतील समानता भाषेच्या संवादाच्या दृष्टीने आवश्यक आहे. प्रमाण भाषेच्या आधारे अनेक

बोली वावरत असतात. सांस्कृतिक परंपरा आणि स्थानिक रितीरिवाज अशा अनेक कारणांनी भाषा या संकल्पनेमध्ये भाषिक व्यवहार आणि भाषिक व्यवस्था यांचा अंतर्भाव होतो. भाषेचे संदेश भाषेत व्यवस्थेवर अवलंबून असते अनेक व्यक्तींच्या भाषेतून भाषिक व्यवस्था सिद्ध होत जाते. मात्र भाषीक व्यवस्था आणि एखाद्या व्यक्तीची भाषा यात फरक असतो. भाषा आणि भाषण यात फरक असतो. व्यक्तीच्या बोलण्यातून भाषा घडते. भाषण हे व्यक्तीशी निगडित असेल तर भाषा समाजाचे, त्या व्यक्ती समूहाशी निगडित असते. बोली हे केवळ विचार विनिमयाचे साधन नसून विचार करण्याचे हे साधन आहे. त्यामुळे ज्ञाननिर्मिती, ज्ञानरक्षण, ज्ञानसंवर्धन याकरिता भाषा उपयुक्त ठरते. भाषेमुळे प्राणी जगतापासून माणसांचे वेगळेपण दिसून येते. मानवी समूहजीवन व संस्कृती भाषेमुळे शक्य झाले आहे. भाषा हे संस्कृती संरक्षण विकासाचे साधन आहे. शिक्षण, धर्मकारण, समाजकारण, राजकारण, इतिहास, भूगोल, भौतिकशास्त्रे ही सारी समाजाच्या संस्कृतीचे अंगे असतात आणि त्यांचे जतन भाषा करीत असते. भाषा ही बोली स्वरूपात असली काय किंवा लिखित असली काय ज्ञान सुरक्षित ठेवण्याचे तसेच त्यांचे संवर्धन विकसन करण्याचे काम भाषा करते.

भाषेद्वारे आज ज्ञानाचा वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असतो. म्हणून भाषे खेरीज मानवी संस्कृतीची कल्पना करता येत नाही. (भाषाविज्ञान परिचय पृष्ठ क्रमांक ११) म्हणून व्यक्ती व समाजजीवनात भाषेचे स्थान अनिवार्य आहे. भाषा आणि विचार यांचा अतूट संबंध असल्याने भाषेशिवाय विचार करणे अशक्य आहे. भाषेला एक स्वतंत्र मूल्य आहे. मनातल्या मनात विचार म्हटला तरी या मानसिक क्रियाचा आधार भाषाच असते. व्यवहार पूर्ततेसाठी आणि व्यवहार सुकरतेसाठी भाषा हेच प्रमुख साधन होय. हे आपल्या मनातील भाव इतरांना कळविणारे आणि व्यक्तिमत्त्वाला मूर्त रूप देणारे भाषा आहे. सामाजिक विनिमयाचे साधन आहे. समाज व्यवहारात भाषा अनेक पातळीवर वापरली जाते. भाषेतून मानवी व्यवहार प्रतिबिंबित होत असल्यामुळे व्यक्ती व समूह मनाचा आरसा म्हणजे भाषा असे म्हणता येईल कारण भाषेने मनुष्य निर्माण केला आणि मनुष्याने भाषा निर्माण केली.

बोली नाही अशी भाषा असू शकत नाही आणि भाषा नाही अशी बोली असू शकत नाही म्हणून कोणती ही भाषा श्रेष्ठ असत नाही आणि बोली कनिष्ठ वा हिणकस ठरत नाही ती भाषा असते. त्यामुळे कोणत्याही भाषेला नाकारणं हे काही प्रतिष्ठेचं लक्षण मानता येणार नाही. हे नाकारणं त्या बोली भाषक समूहाच्या संस्कृतीवरचा आघात ठरतो. कुठलीही भाषा केवळ व्याकरण व शब्दांच्या आदानप्रदानातून विकसित होत नाही, तर त्या परिसराची भौगोलिकता आणि त्यातून तयार होणारी उत्पादन व श्रमव्यवस्थाही तितकीच कारणीभूत असते. या राजकीय सत्तांबरोबरच या प्रदेशात जन्म घेतलेला लिंगायत, जैन धर्म, शिवाय कश्मिरी आणि दक्षिणी ब्राह्मणी शैव परंपरा; या सगळ्याचाच गोष्टी या भाषेवर सांस्कृतिक परिणाम घडविणाऱ्या आहेत. दर बारा कोसांवर भाषा बदलते, या नियमानुसार या बोलीतही वेगवेगळ्या भागांत काही वेगळे शब्द आहेत. इंग्रजीचा प्रभाव या बोलीवरही पडतो, भाषेवर तिच्या भूगोलाचा आणि इतर घटक पर्यावरणाचा इतका प्रभाव पडतो आणि त्यातून त्या भाषेचे तिथले सांस्कृतिक रूप आकार घेते. हा आकार घेण्यात भाषेचा एक मूळ साचा कायम असतो.

बोली ही लोकभाषा असते. मानवी जीवनाच्या आविष्कार इतिहासाचा मागोवा घेतला, तर 'बोली' हेच शब्दब्रह्माचे प्रथम नैसर्गिक रूप दिसते. हे रूप अपौरुषेयच असते. बोलीतून संस्कारपूर्ण, व्याकरणशुद्ध प्रमाणभाषांचा उद्भव होतो. बोलीत व्यवहार, व्यवसाय, भावभावना

यांसह समग्र जीवनसारणी समाविष्ट असते. मानवी जीवनप्रवाहाबरोबरच बोली चैतन्यशालीत्वाने प्रवाही झालेली असते. बदलता काळ, बदलते संदर्भ, बदलता संपर्क यांचा परिणाम स्वीकार केलेले असतात.

समाजाच्या वेगवेगळ्या घटकांची ओळख करुन घेणे, वेगवेगळ्या प्रदेशांत विखुरलेल्या समाजातील वर्गांची ओळख करुन घेणे, म्हणजे त्यांच्या जीवनाचा, त्यांच्या सवयींचा अभ्यास करणे होय. अमुक ठिकाणचे, अमुक जातीचे, वर्गाचे लाक कसे वागतात, पोशाख कसा करतात, काय जेवतात, चरितार्थ कसा चालवतात, त्यांची कुटुंबपद्धती कशी आहे, त्यांच्या विवाहसंस्थेचे स्वरूप कसे आहे, त्यांचे सण-उत्सव, लोकदैवते कोणती आहेत, त्यांच्या नवस-सायासाच्या पद्धती, मर्तिक प्रथा इत्यादींबाबत ते कोणत्या रूढी पाळतात, संस्कृतीच्या या सर्व अंगांचे स्वरूप ज्यातून व्यक्त होते ते अपरिहार्य माध्यम, म्हणजे बोली होय.

बोली आणि समाज यांतील परस्परसंबंध अतिशय घनिष्ठ असतात. त्यामुळे बोलणाऱ्या व्यक्तीच्या बोली भाषेतून त्याचा समाजच प्रकट होत असतो. शिक्षण, व्यवसाय, जाति-जमाती, धर्म इत्यादी अनेक कारणांमुळे वेगवेगळे स्तर निर्माण होतात. या स्तरांची भाषापद्धती भिन्न-भिन्न असते. काही बाबतीत जाणवण्याइतपत वेगळेपण असते. एकाच गावातील किंवा परिसरातील बोलीभाषा जाति-जमातींनुसार ‘वेगळेपण’ धारण करते. प्रत्येक जातीची विशिष्ट अशी सामाजिक व्यवस्था असते.

अनेकविध संस्कृती परंपरा रीतिरिवाज प्रदेशानुसार बदलताना दिसतात. संस्कृतीत बदलांचा परिणाम भाषेवर होत असतो. त्या प्रदेशाच्या भौगोलिक वातावरणाचा परिणाम व्यक्तीवर होत असतो. मानवी व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीवर पर्यायाने भाषेवर संस्कृतीत बदलांचा परिणाम होत असतो. मानवाच्या भाषिक व्यवहारावर विविध घटक परिणाम करीत असतात. अनेकविध घटकांमधून व्यक्तीचा पिंड घडत असतो.

आपण जीवनव्यवहार ज्या भाषेतून करीत असतो, ती भाषा व्यक्तिगत नसून, समाजाची निर्मिती असते, जन्मतःच आपले समाजीकरण ज्या भाषेतून सुरु होते, ती आपली भाषा. तिलाच आपण आपली मातृभाषा म्हणतो. कोकणी, मालवणी, खानदेशी, अहिराणी, तावडी, वऱ्हाडी, चंदगडी, कोल्हापुरी, सोलापुरी, पुणेरी या प्रदेश विशिष्ट आणि वेगवेगळ्या जाती, जमातींच्या भाषा, व्यावसायिकांच्या भाषा या सर्व व्यवस्थांनी मिळून बोली बनते. भाषा प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. भाषा ही सामाजिक संस्था असल्याने इतर संस्था प्रमाणे तिच्यातही परिवर्तन होत राहणे अपरिहार्य आहे. भाषेत अनेक सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक संकेत घेतलेले असतात. समाज जसा बदलत जाईल तसे संकेतही बदलत असतात. अशा परिवर्तनशील भाषेचे भाषिक संकेत हे विशिष्ट मानव समूहाने निर्माण केलेले असतात. या संकेतानुसार भाषेत परिवर्तन होत असते. संकेतांनी भाषा निर्माण झालेली असली तरीही भाषेचेही काही संकेत असतात, अर्थात हे संकेत परिवर्तनशील असतात. विशिष्ट प्रदेशातील विशिष्ट भाषा बोलली जाते.

## ३आ.५ बोलीच्या अभ्यासाची साधने अभ्यासणे

बोली नाही अशी भाषा असू शकत नाही आणि भाषा नाही अशी बोली असू शकत नाही. म्हणून कोणती ही भाषा श्रेष्ठ असू शकत नाही आणि बोली कनिष्ठ वा हिणकस ठरत नाही ती भाषा अशते. त्यामुळे कोणत्याही भाषेला नाकारणं हे काही प्रतिष्ठेचं लक्षण मानता येणार नाही. कुठलही भाषा केवळ व्याकरण व शब्दांच्या आदानप्रदानातून विकसित होत नाही, तर त्या परिसराची भौगोलिकता आणि त्यातून तयार होणारी उत्पादन व श्रमव्यवस्थाही तितकीच कारणीभूत असते. या राजकीय सत्तांबरोबरच या प्रदेशात जन्म घेतलेला लिंगायत, जैन धर्म, शिवाय कश्मिरी आणि दक्षिणी ब्राह्मणी शैव परंपरा; या सगळ्याच गोष्टी या भाषेवर सांस्कृतिक परिणाम घडविणाऱ्या आहेत.

### ३आ.५.१ भौगोलिक रूप साधने :

दर बारा कोसांवर भाषा बदलते, या नियमानुसार बोलीतही वेगवेगळ्या भागांत काही वेगळे शब्द आहेत. भाषेवर तिच्या भूगोलाचा आणि इतर घटक पर्यावरणाचा इतका प्रभाव पडतो आणि त्यातून त्या भाषेचे तिथले सांस्कृतिक रूप आकार घेते. हा आकार घेण्यात भाषेचा एक मूळ साचा कायम असतो. मराठी ही साधारण 'संस्कृतोद्‌भव' भाषा आहे असा सांगण्याचा अशास्त्रीय अट्टहास असतो. पण, तिचे जवळचे नाते हे संस्कृत भाषा आणि तिच्या व्याकरणापेक्षा लोकभाषा म्हणून चालत आलेल्या प्राकृतच्या मूळ प्रवाहाशी आहे, त्यामुळे मराठीच्या वेगवेगळ्या भौगोलिक स्वरूपांचा अभ्यास करताना प्राकृतचा प्रचंड प्रभाव, तिचा प्रत्यय आणि क्रियापदात्मक मांडणी अत्यंत ठाशीवपणे सांगता येते. म्हणजे वैदर्भी 'जाऊन राहिले' कोकणातले 'जावचे झाले' किंवा बेळगाव मराठीमधील 'जाऊस झाले' या साऱ्याचा अर्थ एक आहेच, पण त्यांची क्रियापद मांडणी जवळपास समान आहे. 'श्रवणबेळगोळ' येथे 'बाहुबलीच्या' मूर्तीच्या पायाशी अकराव्या शतकात कोरलेले 'चांमुडराय करबियले' या वाक्यातील क्रियापद रचना हेच दर्शविते. त्या अर्थाने या भौगोलिक पर्यावरणाचा नीट अभ्यास करुन बोलीभाषा म्हणून त्यांना दुय्यमपणे न पाहता एखाद्या भाषेचे त्या त्या परिसरातील भौगोलिक रूप असा समदृष्टीने विचार व्हायला हवा. पर्यावरण घटकांशी सुसंगत राहणे, भाषेला जिवंत राहण्यास आवश्यक असते. त्यामुळे या साऱ्याचा अभ्यास हा बोलीभाषेच्या अभ्यासाची साधने होत.

### ३आ.५.२ मौखिक साधने :

बोली ही लोकभाषा असते. मानवी जीवनाच्या आविष्कार इतिहासाचा मागोवा घेतला, तर 'बोली' हेच शब्दब्रह्माचे प्रथम नैसर्गिक रूप दिसते. हे रूप अपौरुषेयच असते. बोलीतून संस्कारपूर्ण, व्याकरणशुद्ध प्रमाणभाषांचा उद्भव होतो. बोलीत व्यवहार, व्यवसाय, भावभावना यांसह समग्र जीवनसारणी समाविष्ट असते. मानवी जीवनप्रवाहाबरोबरच बोली चैतन्यशालीत्वाने प्रवाही झालेली असते. हे बोलीचे सेंद्रिय रूप लक्षात घेऊन, बोलींचे संरक्षण-संवर्धन घडले पाहिजे. बदलता काळ, बदलते संदर्भ, बदलता संपर्क यांचा परिणाम स्वीकारुन; समग्र जीवनात अपरिहार्यपणे आणि साभिनिवेश प्रयत्नपूर्वक; तसेच नैसर्गिक प्रक्रिया व स्वरूप सांभाळत; जी वाणी होऊन बोलली जाते ती 'बोली'. तोच शब्दब्रह्माचा आविष्कार होय. म्हणूनच बोलींचा अभ्यास मानवी इतिहास, संस्कृती आणि मानवी जीवन या दृष्टीने या साऱ्याचा अभ्यास हा बोलीभाषेच्या अभ्यासाची साधने होत. गावरहाटीतील विविध देवतांना घातली जाणारी गाऱ्हाणी, म्हणी, वाक्प्रचार आणि लोकोक्ती यातून या बोलीचे सामर्थ प्रत्ययाला येते. अनेक लोककथा,

विविध समाजांची लोकगीते आणि लोकनाट्ये बोलीची अभ्यास साधने असलेली दिसतात. धाला, मिधा, देसरूढ (अशुभनिवारण विधी) यासारखे लोकविधी या बोलीतील लोकगीतांच्या आधाराने साजरे केले जातात. इथल्या कृषिसंस्कृतीचे दर्शन बोलीतील अनेक लोकगीत ही बोलीची आभ्यास साधनेच होत. 'गोंधळ' या विधीनाट्यातील 'नाईक' या गोंधळ्याच्या मुखातील संवाद बोलीतच असतात. इथल्या माणसांकडे असणारे संवादचातुर्य, कृतिउक्तीमधील तिरकसपणा बोली भाषेतून प्रत्ययाला येतो. त्यामुळे त्या त्या प्रदेशातील सामान्य बहुजनांच्या जीवनाचे भाषिक अंगाने प्रतिनिधित्व करणारे हे लोकसाहित्य बोली इतिहासाच्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण ठरावे असे आहे. बोलीत अधिक शिव्या असतात असे म्हटले जाते. वास्तविक शिवी हा एक सहज भाषिक आविष्कार असल्यामुळे आणि बोलीरूप प्रमाणभाषेपेक्षा अधिक नैसर्गिक, रांगडे असल्यामुळे प्रत्येक बोलीतच शिव्या असतात. बोलीही याला अपवाद नाही. ही सर्व बोली अभ्यासाची मौखिक साधने होत.

### ३आ.५.३ सामाजिक बोली साधने :

प्रत्येक समाजाची विशिष्ट संस्कृती असते, विशिष्ट सामाजिक प्रथा, परंपरा, लोकसंकेत, रीतिरिवाज असतात. विशिष्ट लोकधर्म असतो. त्यातून त्याची बोली वेगळेपण धारण करीत असते. 'बारा कोसांवर भाषा बदलते' असे विधान जेव्हा केले जाते, तेव्हा त्यात 'भौगोलिकता' अधोरेखित होते; भाषा आणि संस्कृती यांचा परस्परसंबंध किती घनिष्ठ आहे, हे सर्वश्रुत आहे. 'संस्कृतीचे व्यक्त रूप म्हणजे त्या समाजाची बोली होय.' कालेलकर १९६४, पृष्ठ ५८ तसेच 'प्रत्येक समाजाची किंवा जातीची बोली वेगळी असते', असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा त्यात 'सामाजिकता' अनुस्यूत असते. म्हणून भाषेच्या वर्णनात्मक अभ्यासापेक्षा ही दिशा वेगळी ठरते. त्यामुळे समाजाचा आभ्यास हे बोलीभाषेच्या अभ्यासाचे साधन होय.

कृषिजीवनात वस्तुविनिमयाची पद्धती रूढ होती. त्यामुळे धान्य मोजण्यासाठी कुडव, पायली, शेर, पावशेर, नवटाक इत्यादी धान्य मोजण्याची परिमाणे वापरली जात. आज वस्तुविनिमयाची पद्धत संपुष्टात आल्यामुळे धान्याच्या संदर्भात येणारी खंडी, भरो हे शब्द त्या त्या वस्तूंसह नाहीसे होऊ लागले आहेत. शेतीच्या यंत्राधिष्ठिततेमुळे अनेक अवजारे आज कालबाह्य होऊ लागली आहेत. उथव (भिजलेली कांबळी वाळत घालण्यासाठी चुलीच्या धगीवर बांधण्यात येणारी ताटी), इरले हा शब्द अंकलिपीतूनही गायब झाला. व्हायन (धान्य सडण्यासाठी करण्यासाठी दगडात कोरलेला खोलगट भाग), जाते, झारंग्या, कुडती (हातोडी), डीपळो (शेतातील ढेकळे फोडण्यासाठी केलेले अवजार) तसेच भात भरडण्यासाठी घीरट होती. या वस्तू काळाच्या ओघात संपत चालल्या आहेत. गाई-म्हैशी अर्धालीवर सांभाळण्यासाठी दिल्या जात. मात्र आता या पद्धतीही बंद पडत चाललेल्या दिसतात.

हिंदू समाजाचा विचार केला तर प्रत्येक ठिकाणी 'जात' आणि 'व्यवसायसाम्य' यांवर आधारलेले अनेक वर्ग आपल्याला दिसतात. समान रूढी, चालीरीती त्याचप्रमाणे इतर अनेक बंधनांनी एकत्र सहजीवन जगावे लागत असल्यामुळे, एका जातीतील व्यक्तींना जी वैशिष्ट्ये प्राप्त होतात, त्यांतली काही भाषिक स्वरूपाची असतात. या संदर्भात ना. गो. कालेलकर (१९८२, पृष्ठ ५८) म्हणतात, "जातिबाह्य प्रवृत्तींचा निषेध, प्रसंगी त्याविरुद् होणारे कडक इलाज आणि जातीच्या पंचांकडून होणारे नियमन, यांमुळे जातिसंस्था संघटित आणि चिवट झाली. याचा परिणाम म्हणून इतर अनेक वैशिष्ट्यांप्रमाणे अंतर्गत विनिमयासाठी काही बाबतीत वापरला जाणारा 'शब्दसमूह' हे प्रत्येक जातीचे काही प्रमाणात वैशिष्ट्य ठरले."

आधुनिक स्वयंपाकघराचे स्वरूपही अमूलाग्र बदलले. पूर्वी मातीची भांडी आणि लाकडाच्या वस्तू स्वयंपाकासाठी वापरल्या जात. मात्र आज या वस्तू व भांडी स्वयंपाकघरातून हद्दपार झाल्या. डवली शिजवलेले पदार्थ वाढण्यासाठी नारळाच्या करवंटीपासून तयार केलेले डाऊल, दोनो शिजवलेल्या भात गाळण्यासाठीचे लाकडी कोरीव भांडे, शिब्या, वाळन, रवळी, गोली, मातीची घागर, कुण्डले मातीचे भगुने, या वस्तुंबरोबर त्यांची नावे लुप्त होत असलेली दिसतात. पूर्वी विडीऐवजी गुडगुडी ओढली जात असे. चुलीला वायल होते. अशा अनेक गोष्टी काळाच्या ओघात संपत चालल्या आहेत. त्यासह त्यांचे शब्दही नष्ट होत आहेत.

नवी जीवनशैली बोलीवर आघात करते. मात्र त्या त्या प्रदेशातील माणसांच्या जीवनव्यवहाराचे साधन आणि क्रीडा करमणुकीचे माध्यम असलेल्या बोली काळाच्या ओघात नष्ट होऊ लागल्या तर प्रमाणभाषेतील शब्दांची मूळ भूमी निश्चित करणे हे कठीण कर्म होऊन बसले. म्हणून या बोलीच्या साधनाचा आभ्यास करणे हे भाषिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या जबाबदारीचे कार्य आहे. समाजाच्या वेगवेगळ्या घटकांची ओळख करुन घेणे, वेगवेगळ्या प्रदेशांत विखुरलेल्या समाजातील वर्गांची ओळख करुन घेणे, म्हणजे त्यांच्या जीवनाचा, त्यांच्या सवयींचा अभ्यास करणे होय. अमुक ठिकाणचे, अमुक जातीचे, वर्गाचे लोक कसे वागतात, पोशाख कसा करतात, काय जेवतात, चरितार्थ कसा चालवतात, त्यांची कुटुंबपद्धती कशी आहे, त्यांच्या विवाहसंस्थेचे स्वरूप कसे आहे, त्यांचे सण-उत्सव, लोकदैवते कोणती आहेत, त्यांच्या नवस-सायासाच्या पद्धती, मर्तिक प्रथा इत्यादींबाबत ते कोणत्या रूढी पाळतात, या साऱ्याचा अभ्यास हा बोलीभाषेच्या अभ्यासाची साधने होत. संस्कृतीच्या या सर्व अंगांचे स्वरूप ज्यातून व्यक्त होते त्या अपरिहार्य माध्यमाचा, म्हणजे बोलीभाषेचा अभ्यास मात्र होत नाही. ज्यांना आपण मागासलेले समजतो, त्या व्यक्तींच्या तोंडी असणारी शब्दसंपत्ती, त्यांच्याविषयी उत्सुकता दाखवून जर आपण अभ्यासली तर नवल वाटल्याशिवाय राहणार नाही.

बोली आणि समाज यांतील परस्परसंबंध अतिशय घनिष्ठ असतात. त्यामुळे बोलणाऱ्या व्यक्तीच्या बोलीभाषेतून त्याचा समाजच प्रकट होत असतो. समाजात अनेक कारणांमुळे वेगवेगळे स्तर निर्माण होतात. या स्तरांची भाषापद्धती भिन्न-भिन्न असते. काही बाबतीत जाणवण्याइतपत वेगळेपण असते. एकाच गावातील किंवा परिसरातील बोलीभाषा जाति-जमातींनुसार 'वेगळेपण' धारण करते. प्रत्येक जातीची विशिष्ट अशी सामाजिक व्यवस्था असते. या सामाजिक व्यवस्थेचे विवाहप्रथा, मर्तिक प्रथा, लोकदैवते, लोकधर्म, व्यवसाय, अन्नप्रकार, कपडे, सण-उत्सव इत्यादी घटक आहेत. या घटकांचे आकलन त्या जातीच्या बोलीतून होते. त्या अर्थाने बोली म्हणजे वैशिष्ट्यपूर्ण शब्दांचे भांडार आहे.

घरे, कपडे, व्यवसाय, नवस-सायास, भगताचे विधी, लोकदैवते, सण-उत्सव, लोकधर्म इत्यादी संदर्भातील बोली शब्दसंपत्ती समाजाच्या वापरात आहे. धर्मांतरातून, पाली भाषेतून शाब्दिक नवस्कीकृती बोलीत झालेली आढळते. बोलीभाषांचा अभ्यासाची साधने ही त्या बोलीचा प्रदेश, त्याची व्याप्ती, तेथील खाद्यसंस्कृती, कृषिसंस्कृती, लोकजीवन, सण उत्सव, अर्थकारण, सामाजिक-सांस्कृतिक प्रथा परंपरा, गावगाडा गावरहाटी, दैवत संकल्पना, सामाजिक-सांस्कृतिक प्रथा-परंपरा या साऱ्याचा अभ्यास हा बोलीभाषेच्या अभ्यासाची साधने होत. इथली कुळागार रचना, गावरहाटी, दैवत संकल्पना देवदेवस्कीतील चालीरीती, त्यातून उद्भवणारी अधिकार वर्चस्वाची स्पर्धा त्यातले मानपान, अलुतेदार-बलुतेदार यांच्यातील संबंध निसर्गाचे विभ्रम, इथले सण-उत्सव-जत्रा, या साऱ्याचा अभ्यास हा बोलीभाषेच्या अभ्यासाची प्रमुख साधने होत.

**३आ.५.४ क्षेत्रीय कार्य :**

बोली अभ्यासाची गरज आवश्यकता एखाद्या समाजाची स्थिती काय आहे. समाजाची संपन्नता, प्रगती, अज्ञान, सुसंस्कृतपणा, असंस्कृत इत्यादी गोष्ट भाषेच्या जोरावर जोडता येतात. धर्मशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास तसेच लोकसाहित्य या विद्यार्थ्यांना हा महत्त्वाचा आधार आहे. बोलीचा एका विशिष्ट पद्धतीने अभ्यास किंवा संशोधन करीत असताना त्या अभ्यासाचे सामान्य स्वरूप काय असते ते समजावून घेणे गरजेचे आहे. समान्यता बोलीचा अभ्यास हा निगमनात्मक प्रक्रियेवर आधारलेला असतो. यामुळे साहित्याचे संकलन करणे व पुढे त्याचे विश्लेषण करणे हे या अभ्यासाचे प्रमुख टप्पे मानले जातात. हे दोन्ही टप्पे समान महत्त्वाचे व परस्परावलंबी असतात. संकलनाचा प्रारंभ विश्लेषण ठरवित असते. बोलीच्या अभ्यासाची मौलिकतास खोलता व विस्तार ही सर्व संशोधकाने संकलित केलेल्या साहित्याच्या गुणवत्तेवरच प्रातिनिधिकतेवर व विश्लेषण आतील काटेकोरपणा व अचूकता यावर अवलंबून असतात. बोलीच्या अभ्यासाची मौलिकताही भाषिक सामग्री संकलनातील क्षेत्रीय कार्याच्या अभ्यासकांच्या अभ्यासावर अवलंबून असते. म्हणून अभ्यासकास क्षेत्रीय कार्याचे कौशल्य आत्मसात असणे गरजेचे ठरते. बोलीच्या अभ्यासासाठी शब्द, वाक्य इत्यादी स्वरूपातील साहित्य जमा करावे लागते. हे साहित्य रसिकांकडून जमा केले जाते, त्यामध्ये स्त्री, पुरुष व वृद्ध अशा अनेक परिचय भाषिक असू शकतात. बोलीच्या अभ्यासाचे काम सुरु केले जाते, त्यामुळे स्त्री, पुरुष व वृद्ध अशा अनेक परिचय भाषिक असू शकतात. बोलीच्या अभ्यासाचे काम सुरु झाले म्हणजे संशोधक व निवेदन त्यांची युती तो अभ्यास होईपर्यंत अंगाचा अभ्यास अभिप्रेत असेल त्यास आवश्यक अशा साहित्याच्या संकलनासाठी प्रश्नावली, रूपावली, शब्दावली, वाक्यावली, तक्ते, कोष्टके इत्यादी साधनांची अभ्यासकाला जमवाजमव करणे गरजेचे असते. अशा विविध निवेदकाकडून भाषिक सामुग्री काढून घेण्याच्या या क्रियेला निष्कर्षण असे म्हणतात. या निष्कर्षणाने जमा होत राहिलेली भाषिक सामग्री पद्धतशीरपणे विभागून संग्रहित करावी लागते. यासाठी संकलित साहित्याचे समपरीक्षण करावे लागते. ध्वनीव्यवस्था, वाक्यव्यवस्था, अर्थव्यवस्था इत्यादीचे संरचनेच्या विविध रंगाची संबंधित असलेले साहित्य अथकपणे स्वतंत्र संचयीका वापरुन ठेवावे लागते. यानंतरची प्रक्रियाही विश्लेषणाची असते. वेगवेगळ्या संकलित साहित्याचे विश्लेषण करुन तात्पुरते निष्कर्ष काढावे लागतात. पुढे जमा केलेल्या सामुग्रीशी ते विसंवादी असल्यास त्यात सुधारणा करावी लागते. कधीकधी हे हातचेही निसटते नंतरची प्रक्रिया म्हणजे हाती आलेल्या निष्कर्षाचे भाषावैज्ञानिक प्रणालीस अनुसरुन सोदाहरण विवेचन करणे ही होय. यावरुन खऱ्या अर्थाने शोधप्रबंध हे संशोधनाचे फलित आकार घेते. अशा प्रकारे संकलन, समपरीक्षण, विश्लेषण, वर्णन या चार टप्प्यांवरुन बोलीचा अभ्यास करावा लागतो. जिल्ह्यातील, तालुक्यातील गावांमध्ये त्या त्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष क्षेत्र पहाणी करणे, मुलाखती घेऊन भाषिक नमुने मिळविणे, त्यांचे प्रतिमांकन आणि भाषावैज्ञानिक विश्लेषण करणे. ह्या टप्प्यांतून हे काम पूर्ण करण्यात येते. बोलींचा अभ्यास हा विगमनात्मक प्रक्रियेवर आधारलेला असतो. यामुळे साहित्याचे संकलन करणे व पुढे त्याचे विश्लेषण करणे हे या अभ्यासाचे प्रमुख टप्पे होत. हे दोन्ही टप्पे समान महत्त्वाचे व परस्परावलंबी असतात. संकलनाचा प्रारंभ विश्लेषणाअगोदर होत असला तरी त्याची दिशा विश्लेषण ठरवित असते. बोलींचे अभ्यासाची मौलिकता, सखोलता व विस्तार ही सर्व संशोधकाने संकलित केलेल्या साहित्याच्या गुणवत्तेवर प्रातिनिधिकतेवर व विश्लेषातील काटेकोरपणा व अचूकता यावर अवलंबून असतात. साहित्य संकलनातील सरसता ही क्षेत्रकार्याच्या कुशलतेवर अवलंबून असते. यामुळेच बोलींच्या संशोधकास क्षेत्रकार्याच्या पद्धतींचे व तंत्रांचे सखोल ज्ञान असणे आवश्यक होय. सामान्यतः संशोधक हा स्वतःच क्षेत्रात जाऊन साहित्य संकलन करतो; परंतु कधीकधी क्षेत्रीय कामासाठी कुशल व प्रशिक्षित अशा

व्यक्तींची नेमणूक करावी लागते. अशा व्यक्तींना क्षेत्रांन्वेषक किंवा क्षेत्रसंशोधक अशी संज्ञा आहे. क्षेत्रकार्य हे त्या क्षेत्रातच होते असे नाही कित्येकदा संशोधक स्वतः अभ्यासविषय झालेल्या बोलींचा भाषक असतो. कधीकधी तो भाषकांना आपला कार्यस्थानी व निवासस्थानी घेऊन येतो. असे असले तरी सर्वकष व प्रमाण संशोधनासाठी प्रत्यक्ष भाषेत समाजात राहून साहित्य संकलन करण्यास अन्य पर्याय नाही.

## ३आ.६ सामाजिक-सांस्कृतिक अभ्यास :

भाषा प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. भाषा ही सामाजिक संस्था असल्याने इतर संस्था प्रमाणे तिच्यातही परिवर्तन होत राहणे अपरिहार्य आहे. भाषेत अनेक सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक संकेत घेतलेले असतात. समाज जसा बदलत जाईल तसे संकेतही बदलत असतात. अशा परिवर्तनशील भाषेचे भाषिक संकेत हे विशिष्ट मानव समूहाने निर्माण केलेले असतात. या संकेतानुसार भाषेत परिवर्तन होत असते. संकेतांनी भाषा निर्माण झालेली असली तरीही भाषेचेही काही संकेत असतात, अर्थात हे संकेत परिवर्तनशील असतात. विशिष्ट प्रदेशातील विशिष्ट भाषा बोलली जाते.

जन्मतःच आपले समाजीकरण ज्या भाषेतून सुरु होते, ती आपली भाषा. तिलाच आपण आपली मातृभाषा म्हणतो. आपण जीवनव्यवहार ज्या भाषेतून करीत असतो, ती भाषा व्यक्तिगत नसून, समाजाची निर्मिती असते. समाज, भाषा आणि संस्कृती अभ्यासाच्या दृष्टीने ज्या मराठीतून आपण व्यवहार करतो, ती कोणती मराठी, तिची परंपरा काय? असे प्रश्न आपल्याला व्यवहार करताना पडत नाहीत. कोकणी, मालवणी, खानदेशी, अहिराणी, तावडी, वऱ्हाडी, चंदगडी, कोल्हापुरी, सोलापुरी, पुणेरी या प्रदेशविशिष्ट आणि वेगवेगळ्या जाती, जमातींच्या भाषा, व्यावसायिकांच्या भाषा या सर्व व्यवस्थांनी मिळून मराठी बनते.

मानवी विकास प्रक्रियेमध्ये माणसाला जोडणारा खरा दुवा हा त्यांच्यातील बोलीभाषा हाच होय. माणसाची खरी उच्च भाषा असते. त्या भाषेतून तो अधिक प्रगत होतो. अशा या ग्रामीण भागामध्ये असे अनेक अनुभवी व त्यांच्या पद्धतीने संशोधन करणाऱ्या अनेक व्यक्ती असतात. त्यांचे हे अनुभव त्यांनी त्या समाजाचा अभ्यास करुनच हा सर्व खटाटोप ते आपल्या बोलीमुळे यशस्वी करु शकलेली दिसून येतात अशा अनेक भाषा आजही बोलीभाषा म्हणून आपण त्यांचा प्रचार करतो परंतु त्यांची कोणतीही लिपी नाही, त्यामुळे खऱ्या अर्थाने या भाषेतून आपल्याला साहित्य निर्मिती झालेली दिसून येत नाही. परंतु या बोलीचे महत्त्व मानवी जीवनामध्ये अनन्यसाधारण आहे. मानवाला खऱ्या अर्थाने जोडणारी भाषा ही त्यांची बोलीभाषा आहेत. त्या बोलीभाषेतून तो आपले विचार अधिक प्रगल्भतेने मांडू शकतो. यासाठीच्या बोलीभाषांचा अभ्यास होणे गरजेचे आहे तसेच या भाषा कशा प्रकारे जिवंत राहतील याचाही विचार करणे गरजेचे आहे.

जगात अनेक भाषा बोलल्या जातात प्रत्येक समूहाची भाषा वेगळी आहे. जागतिकीकरणामुळे जग जवळ आलेले आहे. त्यामुळे व्यावहारिक आदान-प्रदानासाठी माणसाला दुसऱ्याच्या भाषेची माहिती असणे आवश्यक झाले आहे. त्यादृष्टीने बोलल्या जाणाऱ्या बोलीभाषांचा अभ्यास महत्त्वपूर्ण आहे. पूर्वीपासूनच जगभरात भाषेचा अभ्यास केला जात

असताना फक्त आपण बोलतो त्या भाषेचा अभ्यास केला जात नाही तर सर्वच भाषांचा अभ्यास केला जातो. जगात अभ्यासल्या जाणाऱ्या प्रमाणभाषे इतकाच बोली भाषांचा अभ्यास महत्त्वपूर्ण आहे. जागतिक स्तरावर बोलीभाषेचा अभ्यास होणे गरजेचे आहे. प्रत्येक बोली ही वैशिष्ट्यपूर्ण आहे या अभ्यासाने मिश्र संस्कृतीचा अभ्यास झाला व तो महत्वपूर्ण ठरेल.

भारतात वेगवेगळ्या संस्कृती, जाती, धर्म, भाषा यांनी समृद्ध देश आहे. येथील पोशाखाचा खाण्यापिण्याच्या आचार विचारांच्या पद्धती वेगवेगळ्या आहेत. भारताच्या प्रत्येक राज्याची भाषा संस्कृती परंपरा वेगळी आहे. त्यामुळे या अभ्यासामुळे तेथील सामाजिकता व सांस्कृतिकता समजण्यास मदत होईल. तेथील आचार, विचार, चालीरीती, रूढी, परंपरा या दृष्टीने हे हा अभ्यास महत्त्वपूर्ण आहे.

बोली नाही अशी भाषा असू शकत नाही आणि भाषा नाही अशी बोली असू शकत नाही. म्हणून कोणतीही भाषेला नाकारणं हे काही प्रतिष्ठेचं लक्षण मानता येणार नाही. हे नाकारणं त्या बोली भाषक समूहाच्या संस्कृतीवर आघार ठरतो. कुठलीही भाषा केवळ व्याकरण व शब्दांच्या आदानप्रदानातून विकसित होत नाही, तर त्या परिसराची भौगोलिकता आणि त्यातून तयार होणारी उत्पादन व श्रमव्यवस्थाही तितकीच कारणीभूत असते. या राजकीय सत्तांबरोबरच या प्रदेशात जन्म घेतलेला जात, धर्म, शिवाय ब्राह्मणी शैव परंपरा; या सगळ्याच गोष्टी या भाषेवर सांस्कृतिक परिणाम घडविणाऱ्या आहेत.

भौगोलिकतेनुसार भाषा बदलते, या नियमानुसार या बोलीतही वेगवेगळ्या भागांत काही वेगळे शब्द आहेत. इंग्रजीचा प्रभाव या बोलीवरही कसा पडतोय, 'वेळ नाही' हे सांगण्याची वेळ प्रत्येकाला कधी ना कधी येते; पण आज हे सांगायचं झालं तर 'टाइम नाय' असं म्हटलं जात. 'वेल नाय' असं म्हणणं काही अवघड नसलं तरीही भाषेवर तिच्या भूगोलाचा आणि इतर घटक पर्यावरणाचा इतका प्रभाव पडतो आणि त्यातून त्या भाषेचे तिथले सांस्कृतिक रूप आकार घेते. हा आकार घेण्यात भाषेचा एक मूळ साचा कायम असतो. मराठी ही साधारण 'संस्कृतोद्‌भव' भाषा आहे. तिचे जवळचे नाते हे संस्कृत भाषा आणि तिच्या व्याकरणापेक्षा लोकभाषा म्हणून चालत आलेल्या प्राकृतच्या मूळ प्रवाहाशी आहे. त्यामुळे मराठीच्या वेगवेगळ्या भौगोलिक स्वरूपांचा अभ्यास करताना प्राकृतचा प्रचंड प्रभाव तिची प्रत्यय आणि क्रियापदात्मक मांडणी अत्यंत ठाशीवपणे सांगता येते. या भौगोलिक पर्यावरणाचा नीट अभ्यास करुन बोलीभाषाना दुय्यमपणे न पाहता एखाद्या भाषेचे त्या त्या परिसरातील भौगोलिक रूप असा समदृष्टीने विचार व्हायला हवा. पर्यावरण घटकांशी सुसंगत राहणे, भाषेला जिवंत राहण्यास आवश्यक असते.

गावरहाटीतील विविध देवतांना घातली जाणारी गाऱ्हाणी, म्हणी, वाक्प्रचार आणि लोकोक्ती यातून या बोलीचे सामर्थ्य प्रत्ययाला येते. अनेक लोककथा, विविध समाजांची लोकगीते आणि लोकनाट्ये मालवणी बोलीत असलेली दिसतात. धाला, मिघा, देसरूढ (अशुभनिवारण विधी) यासारखे लोकविधी या बोलीतील लोकगीतांच्या आधाराने साजरे केले जातात. कृषिसंस्कृतीचे दर्शन बोलीतील अनेक लोकगीतांमधून प्रकट झालेले दिसतात. 'संस्कृतीचे व्यक्त रूप म्हणजे त्या समाजाची बोली होय.' (कालेलकर १९६४, पृष्ठ ५८) प्रत्येक समाजाची विशिष्ट संस्कृती असते, विशिष्ट सामाजिक प्रथा, परंपरा, लोकसंकेत, रीतिरिवाज असतात. विशिष्ट लोकधर्म असतो. त्यांतून त्याची बोली वेगळेपण धारण करीत असते. 'बारा कोसांवर भाषा बदलते' असे विधान जेव्हा केले जाते, तेव्हा त्यात 'भौगोलिकता'

अधोरेखित होते; तसेच 'प्रत्येक समाजची किंवा जातीची बोली वेगळी असते.' असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा त्यात 'सामाजिकता' अनुस्यूत असते. बोली हा भाषिक आविष्कार असल्यामुळे आणि बोलीरूप प्रमाणभाषेपेक्षा अधिक नैसर्गिक आहे. बोलीचे भूसांस्कृतिक वैशिष्ट्य असे की, ही बोली समाजाप्रमाणे आणि जातीसमूहांप्रमाणे विभिन्न रूपांत दैनंदिन जीवनात वापरली जाते. बोली भाषेतील अनेक शब्द आणि त्यांचे उच्चार जातिसमूहांप्रमाणेच बदलतात. ब्राह्मणसमाज, बलुतेदारसमाज, कोळीसमाज, कुळवाडी आणि दलितसमाज यांच्यातील बोली उच्चारात काहीशी भिन्नता असलेली जाणवते. संस्कृती संपर्कातून घडणारे आदानप्रदान बोलीलाही लागू होते. खेडोपाडी झालेल्या शिक्षणाच्या प्रसारामुळे बोलीतही आज अनेक प्रकारचे शब्द अन्य भाषांमधून आलेले दिसतात. विशेषतः इंग्रजीच्या प्रभावातून काही शब्द बोलीत रूढ झालेले दिसतात. त्यांचे उच्चार वैशिष्ट्यपूर्ण आहेत. माचिस, ब्याग, बटर, गॅसबत्ती, मॅनवात, हॉस्पिटल, इस्कूल, बुका, असे शब्द या बोलीत रूढ झाले आहेत.

हिंदू समाजाचा विचार केला तर प्रत्येक ठिकाणी 'जात' आणि 'व्यवसायसाम्य' यांवर आधारलेले अनेक वर्ग आपल्याला दिसतात. समान रूढी, चालीरीती त्याचप्रमाणे इतर अनेक बंधनांनी एकत्र सहजीवन जगावे लागत असल्यामुळे, एका जातीतील व्यक्तींना जी वैशिष्ट्ये प्राप्त होतात, त्यांतली काही भाषिक स्वरूपाची असतात. या संदर्भात ना.गो. कालेलकर (१९८२, पृष्ठ ५८) म्हणतात, "जातिबाह्य प्रवृत्तींचा निषेध, प्रसंगी त्याविरुद्ध होणारे कडक इलाज आणि जातीच्या पंचांकडून होणारे नियमन, यांमुळे जातिसंस्था संघटित आणि चिवट झाली. याचा परिणाम म्हणून इतर अनेक वैशिष्ट्यांप्रमाणे अंतर्गत विनिमयासाठी काही बाबतीत वापरला जाणारा 'शब्दसमुह' हे प्रत्येक जातीचे काही प्रमाणात वैशिष्ट्य ठरले." कृषिजीवनात वस्तुविनिमयाची पद्धती रूढ होती. त्यामुळे धान्य मोजण्यासाठी कुडव, पायली, शेर, पावशेर, नवटाक इत्यादी धान्य मोजण्याची परिमाणे वापरली जात.

समाजाच्या वेगवेगळ्या घटकांची ओळख करुन घेणे, वेगवेगळ्या प्रदेशांत विखुरलेल्या समाजातील वर्गाची ओळख करुन घेणे, म्हणजे त्यांच्या जीवनाचा, त्यांच्या सवयींचा अभ्यास करणे होय. अमुक ठिकाणचे, अमुक जातींचे, वर्गांचे लोक कसे वागतात, पोशाख कसा करतात, काय जेवतात, चरितार्थ कसा चालवतात, त्यांची कुटुंबपद्धती कशी आहे, त्यांच्या विवाहसंस्थेचे स्वरूप कसे आहे, त्यांचे सण-उत्सव, लोकदैवते कोणती आहेत, त्यांच्या नवस-सायासाच्या पद्धती, मर्तिक प्रथा इत्यादींबाबत ते कोणत्या रूढी पाळतात, हा अभ्यास पुष्कळ लोक करतात. परंतु संस्कृतीच्या या सर्व अंगांचे स्वरूप ज्यातून व्यक्त होते. त्या अपरिहार्य माध्यमाचा, म्हणजे भाषेचा अभ्यास मात्र कोणी करत नाही. ज्यांना आपण मागासलेले समजतो, त्या व्यक्तींच्या तोंडी असणारी शब्दसंपत्ती, त्यांच्याविषयी उत्सुकता दाखवून जर आपण पाहिली तर नवल वाटल्याशिवाय राहणार नाही. बोलीभाषांचा तिचा प्रदेश, त्याची व्याप्ती, तेथील खाद्यसंस्कृती, कृषिसंस्कृती, लोकजीवन, सण उत्सव, अर्थकारण, सामाजिक-सांस्कृतिक प्रथा, परंपरा, गावगाडा या साऱ्याचा अभ्यास होय. त्या त्या प्रदेशातील गावरहाटी, दैवत संकल्पना, सामाजिक-सांस्कृतिक प्रथा-परंपरा याचा साक्षेपी विचार, इथली कुळागार रचना, गावरहाटी, दैवत संकल्पनाही वैशिष्ट्यपूर्ण अशीच आहे. अलुतेदार बलुतेदार यांच्यातील संबंध या साऱ्याचे दर्शन बोलीतून घडते.

## ३आ.७ बोलींचे व्याकरणे व कोशरचना यांचे महत्व

आधी भाषा मग व्याकरण भाषा ही प्रवाही आहे. जी भाषा जिवंत आहे, म्हणजे आजवर बोलली जात आहे. तिच्यात कालपरत्वे व प्रांतपरत्वे बदल होत राहणार. भाषा बदलत चालली म्हणजे तिच्या लेखन पद्धतीतही बदल होणे साहजिकच आहे. आधी भाषा बनते. मग तिचे व्याकरण ठरते. भाषेत बदल होत गेला, की व्याकरणकाराला शरणागती पत्करावी लागते व पूर्वीच्या नियमांना मुरड घालावी लागते. परिणाम थांबले लेखन विषय ठरलेल्या नियमात ही बदल करावा लागतो. अक्षरे म्हणजे आवाजाच्या खुणा असतात अक्षरांच्या खुणांनी कागदावर लिहून दाखवतो, त्यालाच लिपी असे म्हणतात.

बोलीच्या व्याकरणाचे अभ्यासाच्या दृष्टीने तीन विभाग केले जातात.

१) **पदस्वनिमिकी :** भाषेतील रूपिम हे पदादी बृहत्तर रचनांत भाग घेत असताना कधी कधी त्यांच्या ‘कर’ या धातूचे ‘के’ असे रूप होते. ‘बसला’ या ‘बस’ धातूच्या भूतकाळी रूपातील ‘ला’ हा प्रत्यय ‘कळळा’ या ‘कळ’ धातूच्या भूतकाळी रूपामध्ये ‘ळा’ असे स्थानिक रूप धारण करतो. अशा प्रकारे एक रूपिम परिस्थितीनुरूप विविध रूपे धारण करु शकतो अशा रूपांना त्या रूपी रूपिकान्तरे असे म्हणतात. बोलींच्या पदस्वमिनिकेमध्ये त्यांचा विचार होतो.

२) **रूपव्यवस्था :** रूपव्यवस्थेत पदघटना आणि रूपिमविकार यासंबंधीची असते.

३) **वाक्यव्यवस्था :** वाक्यव्यवस्थेत वाक्यांचे अंतरंग, प्रकार व शब्दविन्यास यासंबंधीची चिकित्सा होते. व्याकरणाच्या कोणत्याही अंगाचे वर्णन करण्यासाठी फार मोठ्या प्रमाणात भाषिक साहित्य जमा करावे लागते. नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद यांना लिंग, वचन, पुरुष, विभक्ती, काळ अर्थ इत्यादी विकारांपैकी एका वेळी एक वा अनेक विचार होऊ शकतात. बोलींचा अभ्यास करताना अभ्यासकांना विकारांच्या जाती व त्यांचे निदर्शक असे प्रत्यय शोधून काढावे लागतात. शेकडो सुट्टी वाक्ये व गद्यपाठांतील वाक्यरूप त्यांचे काळजीपूर्वक निरीक्षण करावे लागते. विविध पदावल्यांच्या साह्याने विकारांचे विभेद व मर्यादा निश्चित कराव्या लागतात. वाक्यांचे विभेद व त्यांच्या रचनांचे वर्णन करण्यासाठी हजारो वाक्यांचे सूक्ष्म निरीक्षण करावे लागते. हा सर्व प्रचंड खटाटोप असतो. मातृभाषेचे आयते व्याकरण अभ्यासणे आणि एखाद्या अपरिचित बोलीचे व्याकरण शोधून काढणे या दोन कृतीत महदंतर आहे.

### ३आ.७.१ बोलींचा शब्दकोश :

जेव्हा मानवी व्यवहार वाढू लागतात, तेव्हा भाषाही वाढू लागते आणि भाषेतील शब्दांचा संग्रह, परिगणना व व्यवस्थापन यांची गरज निर्माण होते. या गरजेतून शब्दकोशाची निर्मिती होते. त्यातील शब्द एका निश्चित क्रमाने सामान्यतः वर्णाक्रमानुसार - ग्रंथित केलेले असतात. शब्दकोश सुधारण्याची, तसेच नवा शब्दकोश तयार करण्याची गरज निर्माण होते. भाषेची प्रवाही प्रकृती आणि परस्परसंवादासाठी तिच्या स्थिरीकरणाची अपेक्षा, या द्वंद्वातून शब्दकोशाचा विकास होत राहतो. एखाद्या भाषेतील वापरत असलेल्या तसेच वापरातून गेलेल्या अशा यच्चयावत शब्दांचा संग्रह, त्यांच्या अर्थासहित ज्यात केलेला असतो अशा संदर्भग्रंथ. मुद्रित वाङ्मयातील शब्दांबरोबरच वाक्संप्रदाय, म्हणी यांचाही त्यांत अंतर्भाव होतो. शब्दांचा अर्थ समजावा आणि जिज्ञासूची शब्दशक्ती वाढावी, हा एक हेतू शब्दकोशरचनेमध्ये असतो. शब्दांच्या अर्थांचे संकेत

निश्चित व स्थिर होण्याचे कार्य शब्दकोशामुळे साधते आणि त्यायोगे भाषिक व्यवहार सुलभतेने होऊ शकतात.

बोलींचा शब्दकोश बनवित असताना भाषिक समाजाच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीचा अभ्यास करावा लागतो. त्या त्या भाषिकांमध्ये राहून, मिळून मिसळून जावे लागते. त्या जीवनपद्धतीची समरस व्हावे लागते. कानावर पडलेल्या प्रत्येक शब्द आणि ध्वनी टिपून ठेवावा लागतो. शब्दकोश बनविण्यासाठी गद्यपाठांचा फारसा उपयोग होत नाही. त्यातून मिळणारे नवे शब्द अत्यल्प असतात. या कामी विविध प्रकारच्या शब्दावल्या अतिशय उपयुक्त ठरतात. शब्दांच्या आशय निश्चिती कडेही फार लक्ष पुरवावे लागते. आशयावर भाषेचा संरचनेचा प्रभाव पडत असतो. मराठीत वस्तूजाताची विभागणी पुल्लिंगी, स्त्रीलिंगी व नपुंसकलिंग अशी होते, महाराष्ट्राच्या उत्तर सीमेवरील हिंदी प्रदेशाला भिडणाऱ्या अनेक मराठी बोलीत ती पुल्लिंगी व स्त्रीलिंगी अशीच आहे. अनेक परिवारीय भाषांत ती मानव मानवेतर अशी आहे. अनेक भाषात ती सजीव-निर्जीव, गतिमान-स्थिर अशीही असू शकते. अशा प्रकारच्या शब्दांच्या विविध भेदविभेदांची दाद कोशकारांना घ्यावी लागते. बोलीचा सामाजिक व सांस्कृतिक दृष्टिकोनांतून अभ्यास करणारांसही संकल्पनात्मक व व्याकरणिक विविध विभेदांच्या परस्परसंबंधाचा विचार उपयुक्त ठरतो. भाषेच्या शब्दसंग्रहात भाषिक समाजाच्या जीवनपद्धतीचे पूर्ण प्रतिबिंब पडलेले असते. यामुळे समाजशास्त्रज्ञ व मानसशास्त्रज्ञ भाषेच्या माध्यमातून समाज व संस्कृतीचे आकलन करण्याचा प्रयत्न करतात. प्रत्येक भाषिक समाजात आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक इत्यादी कारणांनी उत्पन्न झालेल्या गटांच्या विविध बोली व व्यवसाय बोली आढळून येतात. भिन्न स्तरावरील भाषक परस्परांशी बोलताना प्रसंगानुरूप आपली भाषा शैली बदलत असतात. एकच व्यक्ती पत्नीशी, नोकरांशी वरिष्ठाशी बोलताना आपली वाकशैली व शब्दांची निवड एकसारखी ठेवील असे नाही. बालकांशी व कुत्रे, मांजर आदी पशूशी बोलताना तो विशिष्ट संभाषणशैली वापरेल. व्यासपीठावरील भाषण ठोकताना, शाळा कॉलेजातील व्याख्यानांत, पुराण-कहाणी सांगताना, न्यायालयात वकिली करताना विशिष्ट वाक्यप्रचारांचा उपयोग करावा लागेल. भाषेवर आधारित अनेक खेळांसाठी (उदा. चकारी भाषा) मंत्रतंत्रासाठी, शिवागाळीसाठी, भजनपूजनासाठी भाषेचा विशिष्ट प्रकारे उपयोग करावा लागेल. अमुक एक शब्द, वा वाक्य शिष्ट, अमुक एक अशिष्ट, अमुक एक बोली वरिष्ठ, अमुक एक बोली अपभ्रष्ट अशांसारखे समज भाषिक समाजात प्रचलित असतात. भाषिक प्रामाण्य विदग्धता, द्वैभाषिकता, अशिष्टता इत्यादींविषयी भाषकांची निश्चित मते असतात. त्या सर्वांचे परिशीलन भाषेच्या सामाजिक व सांस्कृतिक अभ्यासात मोडते, व्यक्तीच्या नावावरुन, भाषणावरुन त्याची जात वा सामाजिक दर्जा ओळखता येणे शक्य असते. एखाद्या व्यक्तीच्या पाळीव प्राण्याचे नाव 'टायगर' आहे, की 'वाघ्या, मोती, विठ्या' आहे. यावरुन त्या व्यक्तीचा सामाजिक स्तर ओळखता येतो. आपल्या संभाषणात इंग्रजी व हिंदी शब्द पेरले म्हणजे आपला दर्जा वाढतो अशी ही लोकभावना असू शकते. बोलींच्या समाजशास्त्रीय अध्ययनात या सर्वांची दखल घ्यावी लागते व अध्ययन प्रकारानुरूप भाषिक साहित्य जमा करावे लागते. या प्रश्नावलीत सामान्यतः दोन प्रकारचे भाषांश समाविष्ट केले जातात. त्यातील एक म्हणजे नियोजित स्थानी विशिष्ट अर्थाचा वाचक असा कोणता शब्द वापरला जातो ते पाहणे. उदा. 'विहिरीतून रोजच्या वापरासाठी पाणी बाहेर काढण्याचे साधन' या आर्थी मराठी बोलीतून स्थानपरत्वे 'पोहऱ्या, टिपरे, घागर, बादली, बालदी, बालटी, कळशी इत्यादी' शब्द वापरात आहेत. 'डोके' या अर्थी डोके, दुसऱ्या प्रकारच्या भाषांशांत विशिष्ट शब्दाच्या अर्थात स्थानपरत्वे होणाऱ्या भेदांचे दिग्दर्शन केले जाते. उदा. 'चौक' या शब्दाचे स्थानपरत्वे 'चौकोनी अंगण, चार रस्ते घेऊन मिळणारी जागा, वृंदावन,

पोवाड्यातील कडवे, रांगोळीचा एक प्रकार' असे अनेक अर्थ होऊ शकते. ध्वनी विषयक एकरूपता या विभिन्नताचेही दिग्दर्शन मानचित्रात होऊ शकते. मानचित्र निर्मितीसाठी लागणारे भाषिक साहित्य प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे पत्रव्यवहारात ही जमा करता येते.

भाषेच्या प्रति जागतिकीकरणाचे सर्वत्र वारे वाहत आहे. अशा परिस्थितीत जागतिकीकरणाचा प्रभाव फक्त शहरा पुरताच मर्यादित नाही. त्याचे लोण ग्रामीण भाषापर्यंत पोहोचलेले आहे. सर्व क्षेत्रीय परिवर्तन झपाट्याने होत आहे. जीवनमान बदलत आहे, जीवनमूल्ये बदलत आहे. रूढी-परंपरा व प्रथांचे स्वरूप बदलत आहे. सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनातसोबत भाषिक व्यामिश्रत व संक्रमण प्रचंड प्रमाणात घडून येत आहेत. प्रत्येक प्रदेशातील, संस्कृतीतील, समाजाची स्वतंत्र भरले आहे. ते समाजातील भाषिक गटाच्या दैनंदिन व्यवहारासाठी स्वभाविक कृत्रिमपणे अविष्कृत झालेली जी बोली आहे त्या बोलींचा अभ्यास होताना दिसतो आहे. त्यांच्यावर संशोधनही होत आहे तर एकीकडे काही बोली नष्ट झाल्याचे काही बोलींचे अस्तित्व धोक्यात आलेली दिसते आहे. त्या व्यक्तीच्या तोंडी असणारी शब्दसंपत्ती, त्यांच्याविषयी उत्सुकता दाखवून जर आपण पाहिली तर नवल वाटल्याशिवाय राहणार नाही.

## ३आ.८ बोलींसमोरील आव्हाने, जतन व संवर्धन यांसाठी करावयाच्या प्रयत्नाची दिशा

स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेच्या आठव्या परिशिष्टात समाविष्ठ केल्या गेलेल्या बावीस भाषांपैकी मराठी ही महत्त्वाची भाषा आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारतात मराठी बोलणाऱ्यांची संख्या दहा कोटींवर आहे. इंटरनेटवरील विकिपीडिया या ज्ञानकोशातून मिळणाऱ्या माहितीनुसार मराठी ही जगातली १९ व्या क्रमांकाची भाषा आहे. 'जॉर्ज ग्रिअर्सन' यांच्या 'लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडिया' च्या खंड ७ व ९ मध्ये सुमारे ४० बोली व उपबोलींचे नमुने दिले आहेत. भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण या महाराष्ट्रखंडामध्ये (पद्मगंधा, २०१३) मराठीच्या ६० बोलींची माहिती येते.

### ३आ.८.१ बोलींसमोरील आव्हाने :

आधुनिकीकरण, स्थलांतर, संपर्क व दळणवळणाची वेगवान साधने, वाढते आदानप्रदान, इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा प्रभाव, इंग्रजीचे वाढते महत्त्व, रोजगाराच्या संधी यांसारख्या घटकांचा परिणाम प्रादेशिक, स्थानिक बोलींच्यावर होत आहे. पारंपारिक बोलींमध्ये प्रमाण मराठी, इंग्रजी, हिंदी वगैरे भाषांचा प्रभाव वाढत आहे. ध्वनीपरिवर्तन होत आहे. पोटबोलीतील अंतर कमी होत आहे. आगामी काळात बोली नाहीशा होण्याचा संभव युनेस्कोच्या रिपोर्टमध्ये व्यक्त झाला आहे.

बोलींच प्रदेशवार, जिल्हावार भेद आढळतात. जाततत्त्वावर ही बोलीतील भेद अवलंबून असल्याने एकंदर मराठी बोलींची संख्या शंभराहून अधिक असण्याची शक्यता आहे. वऱ्हाडी, हळवी, पोवारी, नागपुरी, अहिराणी, कोकणी, वारली, ठाकरी, डांगी, सामवेदी, कोल्हापुरी, नगरी, सोलापुरी, पुणेरी, चित्पावनी असे बोलीचे अनेक प्रकार व उपप्रकार आढळतात. आदिवासींच्या ही भौगोलिक, सामाजिक स्तरानुसार पोट बोली आहेत. महाराष्ट्रातल्या सर्व

बोलीभाषा अखेर मराठीकडेच येऊन थांबतात. मराठीच्या विविध बोलींनी मराठीला बळ दिलेले आढळते.

महाराष्ट्राच्या भाषिक व्यवहारांचे निरीक्षण केल्यास मराठीच्या पीछेहाटाची कारणे लक्षात येतात. जन्मल्यानंतर कौटुंबिक परिचितांशी संदेशनाची व्यवहाराची भाषा, स्थानिक बोली, त्या त्या विशिष्ट प्रदेशातील एक प्रादेशिक बोली, औपचारिक शिक्षणाचे माध्यम प्रमाणमराठी, न्यायसंस्था, आर्थिक संस्था, उद्योगधंदे वगैरे उपजीविकेशी संलग्न व्यवहाराची भाषा इंग्रजी, महाराष्ट्रातल्या शासन व्यवहाराची भाषा मराठी व इंग्रजी, मोठ्या शहरातील बाजाराची, विनिमयाची भाषा हिंदी, करमणूकीच्या क्षेत्रात मुख्यत्वे हिंदी, केंद्रसरकारच्या कार्यालयाची भाषा हिंदी व इंग्रजी असा भाषिक व्यवहाराचा नकाशा दर्शवता येतो.

समाजमाध्यमांवर उत्तम मराठी भाषेत लिहिणारेही अनेक जण आहेत; पण त्यांचं प्रमाण तुलनेनं कमी आहे. वाचणं, ऐकणं या माध्यमातून आपण ज्या प्रकारच्या भाषेच्या मोठ्या प्रमाणावर सान्निध्यात येतो, तीच आपली भाषा कधी बनून जाते, ते लक्षातही येत नाही. आपण ज्याच्याशी संवाद साधतो आहोत, त्याला आपलं म्हणणं कळावं, इतकाच संवाद साधणाऱ्यांचा हेतू असतो. त्यामुळे कोणत्या भाषेतले शब्द आपण दर वेळी वापरतो आहेत, याचं भान प्रत्येक वेळी असतंच असं नाही. त्यातून आपोआपच प्रत्येक जण कळत-नकळत अशी अनेक भाषांच्या मिश्रणातून तयार झालेली वेगळीच भाषा वापरु लागतो. ती धड इंग्रजीही नसते, मराठीही नसते नि हिंदीही नसते. त्यातून संवादाचा तात्कालिक हेतू साध्य होत असला, तरी भाषेच्या जपणुकीच्या दृष्टीनं मात्र हे नक्कीच चांगलं नाही. याचा फटका मराठीसह त्या त्या भागांत बोलल्या जाणाऱ्या मराठीच्या बोलीभाषांनाही बसतोय.

मूलभूत भाषावैज्ञानिक संकल्पनांची ओळख करुन देणे, भाषिक नमुने कसे गोळा करायचे, फोनेटिक स्क्रिप्ट वापरुन या नमुन्यांचे प्रतिलेखन कसे करायचे, भाषावैज्ञानिक पद्धती वापरुन व्याकरणिक विश्लेषण कसे करायचे, आदी कौशल्य व बोली भाषा विकास हा विद्यापीठाच्या केंद्रस्थानी आसावा. बोलीविज्ञान, भाषा, समाज, आणि साहित्य या धाटणींचे विषय निवडून त्यावर काही एक मौलिक संशोधन बोलीची ध्वजा उंच करायला साहाय्य करील. लोकजीवन व विचार परंपरा सशक्त चालविणाऱ्या आदिम बोलीतील परंपरा-ग्रामीण-महानगरी आणि विविध जीवन बोली नवप्रवाहांच्या मौलिक साहित्यावर, चळवळींवर संशोधन आवश्यक आहे.

अनेकोत्तम साहित्यिकांनी वैविध्यपूर्ण आणि दर्जेदार साहित्यनिर्मिती केल्यामुळे मराठी भाषा अत्यंत समृद्ध आणि संपन्न आहे. मराठीला अजून अभिजात भाषेचा दर्जा अधिकृतपणे मिळालेला नसला, तरी ती त्या दर्जाचीच भाषा असल्याचं अनेक तज्ज्ञांचं मत आहे. ही अभिमानाचीच गोष्ट आहे; मात्र गेल्या काही वर्षात जगातल्या इतर सर्व भाषांना जी समस्या भेडसावते आहे, तीच मराठीला भेडसावते आहे आणि ती म्हणजे अन्य भाषांचं आणि मुख्यतः इंग्रजी भाषेचं आक्रमण, कोणतीही भाषा वाईट नसते. एका ठराविक मर्यादेपर्यंत एका भाषेतले शब्द दुसऱ्या भाषेत वापरण्यातही काही गैर नाही; किंबहुना असे शब्द सामावून घेण्यातून भाषेचा प्रवाहीपणा दिसून येतो; पण जेव्हा हे प्रमाण वाढत जातं, तसतसं ते मूळ भाषेला मारक ठरतं.

**३आ.८.२ बोली जतन व संवर्धन यांसाठी करावयाच्या प्रयत्नाची दिशा :**

महाराष्ट्राच्या भाषिक व्यवहाराचे निरीक्षण केल्यास मराठीच्या पीछेहाटाची कारणे लक्षात येतात. जन्मल्यानंतर कौटुंबिक परिचितांशी संदेशनाची व्यवहाराची भाषा, स्थानिक बोली, त्या त्या विशिष्ट प्रदेशातील एक प्रादेशिक बोली, औपचारिक शिक्षणाचे माध्यम प्रमाण मराठी, न्यायसंस्था, आर्थिक संस्था, उद्योगधंदे वगैरे उपजीविकेशी संलग्न व्यवहाराची भाषा इंग्रजी, महाराष्ट्राच्या शासन व्यवहाराची भाषा मराठी व इंग्रजी, मोठ्या शहरातील बाजारांची, विनिमयाची भाषा हिंदी, करमणूकीच्या क्षेत्रात मुख्यत्वे हिंदी, केंद्रसरकारच्या कार्यालयांची भाषा हिंदी व इंग्रजी असा भाषिक व्यवहाराचा नकाशा दर्शवता येतो. जागतिकीकरणाच्या रेट्यात भाषेवर कितीही आक्रमणे झाली तरी इतक्या सहजासहजी कोणतीही बोलीभाषा मृत होणार नाही. कारण त्यांच्यामागे पिढ्यांपिढ्यांचा वारसा चालत आलेला आहे. बोलीभाषा जिवंत ठेवण्यासाठी ती बोलली गेली तर पाहिजेच, शिवाय तिच्यातून लेखनही व्हायला पाहिजे. तिचा विस्तृत शब्दकोश तयार व्हायला हवा. प्रमाण मराठीसह सर्व बोलींचा जतनासाठी, दस्ताऐवजीकरणासाठी, संवर्धनासाठी असे उपक्रम होण्याची गरज आहे. आजचं तंत्रज्ञानाचं युग असल्यानं माहिती साठवणं आणि प्रसारित करणं या गोष्टी खूप सोप्या झाल्यात; पण मुळात ती माहिती गोळा करणं, त्यावर संशोधन करणं, तिची अधिकृतता तपासणं या गोष्टींवर काम करण्याची गरज आहे. त्यासाठी तरुण पिढीनं पुढे येऊन ज्येष्ठ व्यक्तींकडे असलेला माहितीचा साठा जपण्याचा दृष्टीनं कार्यरत व्हायला हवं, हा निश्चय आजच्या दिवसाच्या औचित्यानं करु या! म्हणजे या बोलीभाषांचा एक दिवस किंवा एक वर्ष साजरं करण्यापेक्षा प्रत्येक दिवस बोलीभाषेच्या वापराचा, गौरवाचा होईल.

विज्ञानाच्या पाठ्यपुस्तकांमधील मराठी परिभाषा कठीण व अर्थाचे नीट वहन न करणारी आहे. बरेचसे पारिभाषिक शब्द संस्कृतोद्‌भव आहेत. वैज्ञानिक परिभाषा व विज्ञानविषयक लेखन विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिक यांना समजेल, त्यांच्यात विज्ञानविषयक आस्था व अभिरूची निर्माण होईल, अशा सोप्या भाषेत केले पाहिजे. अपरिचित प्रतिमाविश्व असलेले संस्कृत शब्द वैज्ञानिक परिभाषा रूढ करताना वापरण्याऐवजी आपल्या बोलीभाषांतील शब्द घेऊन सोपी, सुलभ वैज्ञानिक परिभाषा घडविली पाहिजे. सोप्या व परिचित प्रतिभाविश्वाच्या जवळ जाणाऱ्या परिभाषेची निकड ग्रामीण, गरीब बहुजनांतील विद्यार्थ्यांना सगळ्यांत जास्त आहे. म्हणून यादृष्टीने विचार व काम करण्याची फार आवश्यकता आहे. या थरातील आलेले शिक्षक, संशोधक, विद्यार्थी, अभ्यासक, लेखक यांची जबाबदारी सर्वाधिक आहे. आपल्याला किंवा आपल्यासारख्या लोकांना जे हवे ते आपणच तयार केले पाहिजे. त्यासाठी वैज्ञानिक संशोधनाचा, अभ्यासाचा विविध पातळ्यांवर अनुवाद आपल्या भाषेत होत राहिला पाहिजे. आधुनिक विज्ञान आपल्या भाषेत येत राहिले किंवा आले की वैज्ञानिक प्रश्नांचा आपल्या भाषेत विचार करण्याची सवय लोकांना लागेल.

कोणत्याही बोलीचे टिकून राहणे प्रामुख्याने दोन गोष्टींवर अवलंबून असते. एक म्हणजे ती प्रत्यक्ष व्यवहारात अनिवार्य स्वरूपात बोलली जाणे. त्या भाषेतून सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय, आयव्ययात्मक व्यवहार होत राहणे आणि दुसरे म्हणजे त्या बोलीला स्वतःची अशी स्वतंत्र लिपी असणे व ती लिपी उत्क्रांत होत बोलीशी एकरूप होऊन वापरात येणे. मराठीच्या बाबतीत 'देवनागरी' लिपी ही मराठी भाषेला लाभलेली लिपी आहे.

भाषा संवर्धित करायची म्हणजे प्रत्यज्ञात काय करायचे, तर पहिली गोष्ट म्हणजे आपली भाषा हिरीरीने बोलायची. जास्तीत जास्त लोकांनी जास्तीत जास्त ठिकाणी ती भाषा बोलणे हा कुठल्याही भाषेच्या संवर्धनाचा पहिला टप्पा आहे. भाषेच्या संवर्धनासाठी संख्यात्मक वाढ आणि वर्चस्व आवश्यक आहे. हिंदी व बंगालीच्या उदाहरणावरुन ते आपल्याला स्पष्ट दिसते. याबाबतीत मराठीची परिस्थिती आशादायक आहे. कारण आजच्या घडीला मराठी मातृभाषा असणाऱ्यांची संख्या सुमारे आठ ते साडेआठ कोटी आहे. पुढच्या ५० वर्षातसुद्धा ही संख्या भक्कमच राहणार आहे. त्यामुळे सर्वत्र आपण हिरीरीने मराठी बोलले पाहिजे. ती बोलायला लाजायचे कारण नाही. आपण आपल्या भूमीत भक्कम उभे आहोत, आपली भाषा ही जगातल्या प्रमुख भाषांपैकी एक आहे, आपण तिच्यात सर्व व्यवहार करु शकतो, या आत्मविश्वासाने ती बोलण्याची आवश्यकता आहे.

मराठीचे संवर्धन व्हायचे असेल तर या प्रत्येक बोलीभाषेचा विकास झाला पाहिजे. सुशिक्षितांनी आपल्या बोलीभाषांची लाज न बाळगता आपापल्या समूहात आणि प्रदेशात दैनंदिन व्यवहारांत बोलीभाषेचा वापर केला पाहिजे. याबरोबरच बोलीभाषांचे व्याकरण अद्ययावत करणे, त्यांच्यात साहित्यनिर्मिती करणे, त्या साहित्याचा गावोगावी प्रसार करणे, याही गोष्टी प्राधान्याने कराव्या लागतील. कारण मराठीचे संवर्धित भवितव्य हे बोलींच्या विविधतेत आणि त्यांच्या समृद्धीत सामावलेले आहे.

जागतिकीकरणामुळे होत असलेल्या सांस्कृतिक सपाटीकरणाचे भान बाळगतानाच या अपरिहार्य स्थित्यंतराचा लाभ घेत मराठीला संवर्धित भवितव्याच्या दिशेने नेण्यासाठी काही ठोस पावले टाकणे शक्य आहे. जागतिकीकरणात रिटेलिंग म्हणजे किरकोळ विक्री, लघुकर्ज, विमा-विशेषतः आरोग्य विमा अशा विविध क्षेत्रांतील कंपन्या त्यांच्या फायद्यासाठी लहानातील लहान खेड्यांत, वस्तींत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांना प्रत्येक माणसाशी संपर्क साधण्यात रस आहे. त्यासाठी अधिकाधिक जाहिराती, माहितीपत्रके प्रादेशिक भाषेत प्रसिद्ध व्हावीत, अशा प्रयत्नांत या कंपन्या आहेत. परदेशी संशोधक साहित्य, समाजशास्त्र, आरोग्याचे प्रश्न अशा अनेक क्षेत्रांत संशोधन करत आहेत. तेही प्रादेशिक भाषा शिकून लोकांशी संपर्क साधण्याच्या प्रयत्नात असतात. जागतिकीकरणाच्या बाजारपेठेतले आणि संशोधनातले हे प्रवाह प्रादेशिक भाषा प्रबळ करण्यासाठी पोषक असेच आहेत. याचा फायदा परकीय गुंतवणुकीत देशात प्रथम स्थानावर असणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील मराठी भाषकांना आपल्या भाषेच्या संवर्धनासाठी निश्चितच करुन घेता येईल. बांधकाम, विमा, फॅशन डिझायिनिंग, प्रसारमाध्यमे, मनोरंजन, पर्यटन, इव्हेंट मॅनेजमेंट अशा विविध सेवाक्षेत्रांमध्ये जागतिकीकरणामुळे तांत्रिक भाषेची जास्त गरज भासत नाही. अशा क्षेत्रांमध्ये मराठी तरुणांनी येऊन प्रगतीबरोबर मराठी भाषेचा प्रसार केला पाहिजे.

आजच्या काळातले टीव्ही हे सर्वात प्रभावी माध्यम आहे. आज पाच मराठी टीव्ही चॅनेल्स सक्रीय आहेत. त्यांच्या कार्यक्रमातील मराठी भाषा ही अचूक नसेल; पण इथे हे लक्षात घ्यायला पाहिजे की, आज त्यांच्यामुळेच मोठ्या प्रमाणावर मराठी भाषक समाज हा हिंदी आणि इंग्रजी टीव्ही चॅनेल्स सोडून रोज सकाळी भविष्य ऐकायला बसतो, सारेगमपमधील मराठी गाणी ऐकतो. हे माध्यम दुर्गम भागांतही पोचले आहे आणि आता तर ते सातासमुद्रापलीकडेही पाहिले जाते. ते पाहणाऱ्या लोकांची संख्या काही कोटींच्या घरात आहे. या माध्यमामुळे मराठीचा नकळत का होईना, प्रसार-प्रचार होत आहे. या प्रभावी माध्यमांमध्ये काम करणाऱ्यांनी मराठीच्या बाबतीत जाणीवपूर्वक काम केले पाहिजे.

आज संगणक-इंटरनेट युगात मराठीला जागतिक स्तरावर विस्तार पावण्यासाठी चांगल्या संधी निर्माण झाल्या आहेत. अगदी अलीकडेपर्यंत संगणकावर मराठी हे इंग्लिश भाषेसारखे रोमन लिपीतून लिहावे लागायचे. आज सॉफ्टवेअरच्या मदतीने संगणकावर देवनागरीत लिहिता येणे शक्य झाले आहे. युनिकोडमुळे तर ते आणखीनच सोपे झाले आहे. 'विकिपिडिया' सारख्या जागतिक ज्ञानकोशात इतर भाषांच्या बरोबरीने मराठीतून ज्ञानसंक्रमण करण्याचे माध्यम खुले झाले आहे. मायक्रोसॉफ्टने संगणकावर मराठीतून सर्व प्रकारचा पत्रव्यवहार, माहितीची साठवणूक, हिशेब ठेवण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. मराठी-इंग्रजी शब्दकोश, शुद्धलेखनाची आज्ञाबली आता संगणकाच्या पडद्यावर, इंटरनेटच्या महाजालावर उपलब्ध आहे. मराठी वर्तमानपत्रे इंटरनेटच्या माध्यमातून जगातल्या कुठल्याही कोपऱ्यात आता वाचता येतात. विशेष म्हणजे गुगलवर आपल्याला हवं ते सर्च केलं तर मिळतंच, पण विशेष विषयांसाठी खास साइट असेल तर अधिक सोपं. मायबोली, मराठी सृष्टी, मराठी साहित्य या वेबसाइट्स अशा प्रकारचे काम करत आहेत. यामुळे घरबसल्या जुनं-नवं साहित्य वाचायला मिळतंय. आता तर मराठी विश्वकोशाचे सगळे खंड विश्वकोशाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. वेब, ब्लॉग, रेडियो यांमुळे प्रकाशकाच्या मध्यस्थीशिवाय कुणालाही आपले लेखन, मनोगत आपल्या भाषेत व्यक्त करण्याची संधी मिळाली आहे. या बाबींचा लाभ घेत मराठी समाजाने संगणक-इंटरनेटचा वापर करताना शक्य असेल त्या ठिकाणी मराठीचाच वापर आवर्जून केला पाहिजे.

**आपली प्रगती तपासा :**

१) बोली भाषेच्या अभ्यासाची साधने कोणती ?

## ३आ.९ सारांश

बोली ही लोकभाषा असते. मानवी जीवनाच्या आविष्कार इतिहासाचा मागोवा घेतला, तर 'बोली' हेच शब्दब्रह्माचे प्रथम नैसर्गिक रूप दिसते. हे रूप अपौरुषेयच असते. बोलीतून संस्कारपूर्ण, व्याकरणशुद्ध प्रमाणभाषांचा उद्भव होतो. बोलीत व्यवहार, व्यवसाय, भावभावना यांसह समग्र जीवनसारणी समाविष्ट असते. मानवी जीवनप्रवाहाबरोबरच बोली चैतन्यशालीत्वाने प्रवाही झालेली असते. हे बोलीचे सेंद्रिय रूप लक्षात घेऊन, बोलींचे संरक्षण-संवर्धन घडले पाहिजे. बदलता काळ, बदलते संदर्भ, बदलता संपर्क यांचा परिणाम स्वीकारुन; समग्र जीवनात अपरिहार्यपणे आणि साभिनिवेश प्रयत्नपूर्वक; तसेच नैसर्गिक प्रक्रिया व स्वरूप सांभाळत; जी वाणी होऊन बोलली जाते ती 'बोली'. तोच शब्दब्रह्माचा आविष्कार होय. म्हणूनच बोलींचा अभ्यास मानवी इतिहास, संस्कृती आणि मानवी जीवन या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा ठरतो.

## ३आ.१० संदर्भग्रंथ

१) सु.बा. कुलकणी, संपादक, कल्याण काळे, अंजली सोमन : बोली भाषांचा अभ्यास, आधुनिक भाषाविज्ञान, प्रतिमा प्रकाशन, पुणे. द्वितीय आवृत्ती, २००३

२) डॉ. मालशे स.गं. भाषाविज्ञान परिचय, पुणे, संजय प्रकाशन, १९८७

३) कालेलकर, ना. गो. : भाषा इतिहास आणि भूगोल, मौज प्रकाशन गृह, मुंबई, २०००.

४) डॉ. कानडे, मु. श्री. : संपा, मराठीचा भाषिक अभ्यास ऐतिहासिक आणि वर्णनात्मक, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, २००४.

५) खैरे, विश्वनाथ : मराठी भाषेचे मूळ, समत प्रकाशन, पुणे, २००२

६) डॉ. इंगळे, विजय : मराठी भाषा भाषाशास्त्र आणि व्याकरण, श्री मंगेश प्रकाशन नागपूर, १९९९.

७) डॉ. मटकर, अलका : मराठी भाषेचा वैज्ञानिक अभ्यास, शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, २०१७.

८) देशपांडे - गुजर, सोनाली : भाषा समाज आणि संस्कृती, शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, २०१७.

९) लोंढे, महेश : मांग संस्कृती आणि भाषा, विजय प्रकाशन नागपूर, २०१७.

## ३आ.११ संभाव्य प्रश्न

१) बोलीभाषा अभ्यासाची दिशा कोणती ?
२) बोलीभाषा समोरील आव्हाने कोणती स्पष्ट करा.
३) बोलीचे मानवी जीवनातील महत्त्व.
४) बोली भाषेचा सामाजिक दृष्टीकोनातून मानवी जीवनातील स्थान स्पष्टकरा.
५) बोलीचे क्षेत्रीय कार्य स्पष्ट करा.
६) एका वाक्यात उत्तरे लिहा.
   १) बोली भाषा म्हणजे काय ?
   २) मानवी जीवनात बोलीचे महत्त्व
   ३) भाषेची मौखीक साधने कोणती ?
   ४) बोलीभाषा आणि प्रमाणभाषा फरक सांगा.
   ५) भाषा ही किती किलोमीटर वर बदलते ?

❖❖❖❖

# नमुना प्रश्नपत्रिका
## द्वितीय वर्ष कला
## सत्र - III, मराठी अभ्यासपत्रिका क्र. - III

**सूचना :**

१) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२) अंतर्गत पर्याय लक्षात घ्यावेत.
३) प्रश्नांसमोरील अंक गुण दर्शवितात.

प्र. १ मानवी भाषेचे लक्षणे सांगून भाषेचे स्वरूप स्पष्ट करा. (२०)

किंवा

मानवी भाषेच्या भाषिक व भाषेत्तर संप्रेशनाचा आढावा घ्या.

प्र. २ भाषेची कार्ये कोणती सविस्तर आढावा घ्या. (२०)

किंवा

मानवी भाषेचे महत्त्व सांगून भाषेच्या विकासाची संकल्पना स्पष्ट करा.

प्र. ३ भाषा नियोजन व भाषा विकास आढावा घ्या. (२०)

किंवा

मराठी भाषेच्या ऱ्हासाची कारणे कोणती ?

प्र. ४ टिपा लिहा. (कोणतेही तीन) (३०)

१) सर्जनशीलता
२) मानवी भाषेचे संप्रेषण पद्धती
३) यादृच्छिकता
४) सपीर - वोर्फ

प्र. ५ खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या. (प्रत्येकी एक गुण) (१०)

१) मानवी संप्रेक्षणाचे प्रमुख साधन कोणते ?
२) भाषा ही कोणी निर्माण केली ?
३) दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन कोणते ?
४) बोलीच्या प्रादेशिक भाषा भेदासंबंधीचा अभ्यास कोणत्या नावाने ओळखला जातो ?
५) बोली भाषा म्हणजे काय ?
६) प्रमाण भाषा म्हणजे काय ?
७) संस्कृतीचे संवर्धन म्हणजे काय ?
८) समाज व्यवहार चालवण्यासाठी कशाचा वापर केला जातो ?
९) संस्कृती ही कशामुळे टिकून राहते ?
१०) संस्कृती म्हणजे काय ?

❖❖❖❖